म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय चा०वा०
दा. क्र. १८९८

# साक्रेतिसचें चरित्र

अनुवादक
कै. कृष्णशास्त्री चिपळूणकर

IRBK-0101898
IRBK-0101898

म. ग्रं. सं. ठाणें
विषय
वा. नं.

म. ग्रं. सं.
विषय

A

of Socrates

*Translated From Rollin*

# साक्रेतिसाचें चरित्र

हा ग्रंथ

रोलिनसाहेबांच्या ग्रंथावरून

## कै० कृष्णशास्त्री चिपळूणकर

ह्यांनीं मराठी भाषेंत केला.

IRBK-0101898
IRBK-0101898

आवृत्ति पंधरावी ] ३

किंमत ८ आणे

म. ग्रं. सं. ठाणें.
९८९८

A

# Life of Socrates

*Translated From Rellin*

# साक्रेतिसाचें चरित्र

हा ग्रंथ

रेलिनसाहेबांच्या ग्रंथावरून

## कै० कृष्णशास्त्री चिपळूणकर

ह्यांनीं मराठी भाषेंत केला.

आवृत्ति पंधरावी ] [ सन १९४३

किंमत ८ आणे

# अनुक्रमणिका.


| अध्याय | | | | पृष्ठ. |
|---|---|---|---|---|
| पहिला | ... | ... | ... | १ |
| दुसरा | ... | ... | ... | १८ |
| तिसरा | ... | ... | ... | १२ |
| चवथा | ... | ... | ... | १४ |
| पांचवा | ... | ... | ... | २७ |
| सहावा | ... | ... | ... | ३१ |
| सातवा | ... | ... | ... | ५० |



मुद्रक व प्रकाशक

रा. रा. शंकर नरहर जोशी,

चित्रशाळा प्रेस, १०२६ सदाशिव पेठ, पुणें.

म. ग्रं. सं. [illegible]

# साक्रेतीस या नांवाचा ग्रीक लोकांमध्यें परम विख्यात व मोठा विद्वान् पुरुष होऊन गेला, त्याचा इतिहास.

## अध्याय पहिला.

[ साक्रेतिसाचा जन्म, तो प्रथमतः मूर्तिकाराचें काम शिकला; परंतु पुढें शास्त्राचा अभ्यास करून त्यांत तो मोठा प्रवीण झाला; नीतिशास्त्राची त्यास रुचि होती; त्याचें आचरण; त्याच्या बायकोचा स्वभाव फार कर्कश होता; व तिनें त्यास फार दुःख दिलें; हे विषय या अध्यायांत आहेत. ]

साक्रेतिस हा शालिवाहन शकाच्या पूर्वी पांचशें सत्तेचाळिसाव्या वर्षी ग्रीस देशांतल्या अथेन्स नामक शहरांत जन्मला. त्याच्या बापाचें नांव साफ्रोनिस्कस; हा पाषाणमूर्तिकार होता; व त्याच्या आईचें नांव फेनारिती; ही सुइणीचें काम करीत असे. ह्यावरून असें मनांत आणावें कीं, वास्तविक प्रतिष्ठा व खरें थोरपण पुरुषाच्या ठायीं येण्यास नीचकुलोत्पत्ति प्रतिबंधक होत नाहीं. साक्रेतिस आपल्या भाषणांत ज्या उपमा आणीत असे, त्यांवरून असें दिसतें कीं, त्यास आपल्या आईच्या किंवा बापाच्या धंद्याची लाज वाटत नसे. तो असें म्हणत असे कीं, मूर्तिकार मोठी मेहनत करून अचेतन पाषाणास मनुष्याचें सादृश्य आणितो, आणि मनुष्यें ज्ञानादि प्राप्त करून घेऊन पाषाणाचें सादृश्य घालविण्याविषयीं कांहींच मेहनत करीत नाहींत, केवढी अचंब्याची गोष्ट आहे ! तो असेंहि वारंवार म्हणत असे कीं, माझी आई जसा बायकांचा सुईणपणा करते, तसा मी लोकांच्या मनाचा सुईणपणा करून त्यांतलि गुप्त कल्पना उदयास आणितों. तो कोणत्याहि विषयावर बोलूं लागला असतां असें मार्मिक भाषण करी, व विषयाचें प्रतिपादन करण्याचा त्याचा क्रम इतका बालबोध व सरळ असे कीं, ज्यांशीं तो वाद करी, ते त्याच्या प्रश्नांचीं उत्तरें देतां देतां त्याचा विवक्षित अर्थ आपल्याच तोंडांनीं

वदत. ही रीति आमच्या वाचकांच्या मनांत पक्केपणीं यावयाकरितां आम्ही एक उदाहरण लिहितों.

इहलोकीं मनुष्यें जें पुण्य किंवा पाप करितात, त्याचीं इष्ट किंवा अनिष्ट फळें प्राप्त होण्याची जागा परलोक आहे, असें त्यास स्थापित करणें असल्यास तो ह्याप्रमाणें प्रश्न करीः—

**प्रश्न** : परमेश्वर सृष्टीचा नियंता आहे कीं नाहीं ?

**उत्तर** : त्यानें ती उत्पन्न केली, तेव्हां तो तिचें नियमन करितो हें उघडच आहे.

**प्रश्न** : तर ह्या नियंत्याच्या ठायीं दयालुता व न्यायिता हे दोन गुण आहेत किंवा नाहींत ?

**उत्तर** : आहेत ह्यांत काय संशय आहे ?

**प्रश्न** : दयाळू व न्यायी अशा नियंत्याचें वास्तविक लक्षण काय ?

**उत्तर** : त्याचें लक्षण हेंच कीं, तो दुष्टांस दंड करितो व साधूंचें कल्याण करितो.

**प्रश्न** : इहलोकीं साधूंचें सर्वदा कल्याण होतें काय ?

**उत्तर** : नाहीं. ह्या जगांत त्यांस बहुत वेळ फार दुःखें व संकटें भोगावीं लागतात.

**प्रश्न** : सर्व दुष्टांस तरी येथें शिक्षा मिळते काय ?

**उत्तर**: नाहीं. कित्येकांस येथें अगदींच दुःख भोगावें लागत नाहीं; आणि कित्येक पापाचीं केवळ घरें असतां त्यास ह्या जगांत मोठमोठ्या पदव्या प्राप्त होतात, व लक्ष्मी तर त्यांच्या घरीं पाणी भरीत असते.

**प्रश्न** : असें जर आहे, तर ईश्वर आपला न्यायीपणा व दयाळूपणा कोठें दाखवितो ?

**उत्तर** : मला ह्या प्रपंचांत तर त्याचें कांहीं चिन्ह दिसत नाहीं.

**प्रश्न** : बरें तर, ही जी साधूंची व दुष्टांची स्थिति आहे, हिची कधीं तरी उलटापालट झाली पाहिजे कीं नको ?

**उत्तर** : ह्यांत काय संशय आहे ? अशी एक वेळ झालीच पाहिजे. कारण, तसें न होईल तर ईश्वराच्या दयाळूपणास व न्यायीपणास बाध येईल.

**प्रश्न** : बरें तर, ही गोष्ट ते पुरुष जिवंत असतांना जर घडत नाहीं, तर ती केव्हां घडेल ?

**उत्तर** : ह्यास मला एवढाच मार्ग दिसतो कीं, मनुष्य मरण पावल्यावर त्यास कांहींएक विशेष अवस्था प्राप्त व्हावी.

**प्रश्न** : बरें तर, ह्यावरून तुमची खात्री होत नाहीं काय, कीं मरणानंतर परलोकीं मनुष्यास आपल्या पापाचा झाडा द्यावा लागेल म्हणून ?

**उत्तर** : होय; हें मला आतां स्पष्ट दिसतें कीं, जगाचा नियंता जो परमेश्वर, त्याचा दयाळूपणा व न्यायीपणा राहण्याकरितां, पापपुण्याचा जेथें निवाडा होतो असा परलोक अवश्य मानिला पाहिजे. त्यावांचून निर्वाह होत नाहीं.

असो; ह्याप्रमाणें सुगम प्रश्न करून दुसऱ्याची खातरी करून देण्याचा. हा गुण ईश्वरानें साक्रेतिसाच्या ठायीं विलक्षण ठेविला होता. तो प्रथम आपल्या बापाचा धंदा शिकून त्यामध्यें मोठा हुषार झाला होता. पाजेनियस राजाच्य वेळीं अथेन्स शहरांत त्याच्या हातची मर्कुरी नामक देवाची एक मूर्ति व ग्रेसस नामक देवीच्या एका बैठकीवर उभ्या अशा तीन मूर्ति होत्या. ह्यावरून असें अनुमान होतें कीं, त्या मूर्ति फार उत्कृष्ट होत्या; कां कीं, त्या जर तशा नसत्या, तर मोठ्या वस्ताद मूर्तिकारांनीं केलेल्या मूर्तींत लोकांनीं त्या ठेविल्या नसत्या.

असें सांगतात कीं, क्रेतो नामक गृहस्थ होता, तो साक्रेतीस लहान असतां, त्याची उत्तम बुद्धि पाहून फार आश्चर्य व समाधान पावला; आणि त्यास असें वाटलें कीं, ह्याच्या हातून मोठमोठाल्या गोष्टी व्हाव्या अशी ह्या मुलाची योग्यता आहे; तेव्हां ह्यानें हातीं टांकी घेऊन दगड घडावे हें योग्य नाहीं. मग क्रेतोनें त्याला त्याच्या बापाच्या दुकानांतून काढून विद्याभ्यास करावयास लाविलें. साक्रेतिसाच्या गुरूचें नांव आर्किलेयस होतें. त्याची साक्रेतिसावर फार ममता जडली. आर्किलेयस हा अनेक्सगोरेस नामें एक मोठा पंडित होता, त्याचा विद्यार्थी होता. त्या वेळीं ग्रीस देशांत सिद्धपदार्थविज्ञानशास्त्र,* म्हणजे ज्याच्या योगानें सृष्ट पदार्थांचें ज्ञान प्राप्त होतें तें, व ज्योतिःशास्त्र म्हणजे

---

* वाचणारांनीं हें समजलें पाहिजे कीं, साक्रेतिसाच्या वेळीं ग्रीक लोकांत जें पदार्थविज्ञानशास्त्र होतें, तें अर्वाचीन काळच्या त्या नांवाच्या शास्त्रापेक्षां फार निराळें होतें. आपल्या लोकांतल्या जुन्या न्यायशास्त्राप्रमाणें किंवा सांख्यशास्त्राप्रमाणें, सृष्टि कशी झाली, कोणत्या द्रव्यांनीं झाली, इत्यादि विचार त्यांत असत.

ज्याच्या सहाय्यानें आकाशांतील ग्रहनक्षत्रादिकांच्या गति वगैरे समजतात तें, अशीं दोन शास्त्रें मात्र लोकांस ठाऊक होतीं. त्यांचा अभ्यास साक्रेतिसानें प्रथमतः केला. आणि जेनोफान नामक इतिहासकर्त्याच्या मतें त्यास ह्या शास्त्राची चांगली माहितगारी होती; परंतु पुढें, ह्या विद्या किती अवघड, किती गहन, व त्यांतील विषय किती परस्परसंकीर्ण आहेत, आणि इतकें असून त्यांपासून थोडक्यांसच काय उपयोग होईल तो होवो, परंतु मनुष्यमात्रास म्हटला असतां त्यांचा फारच थोडा उपयोग आहे, असें त्यास वाटून, सर्वोपयोगी जें नीतिशास्त्र, ज्यांत मनुष्यानें ईश्वराशीं, इतर लोकांशीं व आपणाशीं कसें वागावें हा विषय आहे, त्या शास्त्राचा अभ्यास चालू करावा, असें त्याच्या मनांत आलें. सिसरो नामें एक ग्रंथकार होता, त्याचें ह्या विषयावर लिहिणें मोठें चमत्कारिक आहे. तो म्हणतो कीं, साक्रेतिसानें स्वर्गांचें नीतिशास्त्र भूमंडळीं आणिलें, आणि तें शहरोंशहरीं व घरोघरीं विदित करून व तें मनुष्याच्या बुद्धीच्या आटोक्यांत आणून देऊन त्यास मानवी केलें; आणि तेणेंकरून त्याची केवळ प्रापंचिक व्यवहारांत योजना करून लोकांत त्यानें विचारीपणा, प्रामाणिकपणा व सदाचरणाची आवड हीं वाढविलीं. त्याचें मत असें असे कीं, ह्या संसारांत आपलीं आवश्यक कर्में कोणतीं, सहनशीलता, नेमस्तपणा, शहाणपणा, ह्या गुणांचें स्वरूप काय, साधुपणा, खरेंपणा, प्रामाणिकपणा ह्यांस अनुकूळ व प्रतिकूळ गोष्टी कोणत्या, तसेंच लोकांत कोणत्या प्रकारची राज्यव्यवस्था असावी, राज्य स्थापण्याचें फळ कोणतें, राज्य करण्याचे नियम कोणते, लोकांत जो पुरुष हुकूम करितो व त्यावर अम्मल चालवितो, त्याच्याठायीं अवश्य पाहिजेत असे गुण कोणते, इत्यादि विषयांची माहितगारी करून घेणें सोडून देऊन अत्यंत गहन जे विषय–ज्यांत मनुष्याची बुद्धि शिरकतच नाहीं व जे समजले असतांहि त्यापासून मनुष्यास कांहीं मोठेंसें सुख होईल असें नाहीं, अशा विषयांची,* म्हणजे पदार्थविज्ञानशास्त्रादिकांची मौज वाटते म्हणून केवळ

---

* वाचणारांनीं लक्ष देण्याजोगी मोठी चमत्कारिक गोष्ट ही आहे कीं, साक्रेतिसासारख्या अलौकिक बुद्धिमान् पुरुषास जी विद्या असंभवी व निरुपयुक्त भासली, तीच विद्या ( पदार्थविज्ञान ) हल्लीं सर्वोत्कृष्ट व अत्यंत उपयोगी होऊन बसली आहे. युरोपाच्या लोकांस पृथ्वींत एवढा थोरपणा व प्राबल्य आज प्राप्त झालें आहे, त्याचें मुख्य कारण–सृष्ट पदार्थांच्या धर्मांचें ज्ञान, व

त्यांचा विचार करून त्यांत आपलें सर्व बुद्धिवैभव व सर्व वेळ घालणें हा मनुष्याचा एक मूर्खपणा आहे. असो; साक्रेतिसानें नीतिशास्त्राचा अभ्यास करून प्राप्त झालेलें ज्ञान कोणत्या कामास लाविलें, हें पुढील ग्रंथावरून वाचणाऱ्यांच्या ध्यानांत येईल. साक्रेतिसानें ह्याप्रमाणें व्यासंग चालविला होता, म्हणून तो ज्या शहरांत असे, तेथें राहणाऱ्या प्रतिष्ठित लोकांस जीं कामें करावीं लागत तीं करावयाचीं त्यानें सोडलीं होतीं काय? नाहीं. सच्छास्त्राच्या अभ्यासाच्या योगानें तो तीं कामें करण्याविषयीं इतर लोकांपेक्षां उलटा अधिक जपत असे. अथेन्स शहरांतील लोकांप्रमाणें तो हातांत शस्त्र घेऊन लढावयास × जात असे; परंतु दुसऱ्यांत आणि ह्यांत विशेष फरक इतकाच होता कीं, लढाई करण्यांत ह्याचे जे उद्देश असत, ते दुसऱ्या लोकांच्या उद्देशांपेक्षां श्रेष्ठ व चांगले असत.

त्यानें बहुत मोहिमी केल्या, व तो बहुत लढायांमध्यें गेला होता; आणि सर्व प्रसंगीं सहनशीलता व शौर्य ह्या गुणांविषयीं त्याची वाहवा होत असे. अथेन्स शहरांत सिनेट नामें एक सभा होती. तींतील हा एकदां सभाधिपति झाला होता. त्या प्रसंगीं ह्यानें मोठी न्यायपक्षपातिता प्रकट केली; आणि तसें करण्यांत जरी मोठमोठाले अनर्थ होते, तरी ते त्यानें जुमानिले नाहींत! * त्यानें लहानपणापासून मोतादीनें खाण्यापिण्याची व श्रम करण्याची आणि

---

त्या ज्ञानाची संसारसुखाकडे योजना करण्याची युक्ति—हें आहे. आगीची गाडी, तारायंत्र इत्यादि लक्षावधि कल्पना युरोपांत निघाल्या आहेत, त्यांचें बीज सृष्ट पदार्थांच्या धर्मांचें ज्ञान हेंच होय. ह्यावरून वाचणारांनीं असें मनांत आणावें कीं, कोणती गोष्ट संभवनीय किंवा असंभवनीय ह्याचा निर्णय करणें अत्यंत बुद्धिमान् पुरुषास सुद्धां पुष्कळदां अशक्य आहे.

× अथेन्सचें राज्य प्रजासत्ताक होतें. तेथें सर्व लोकांस लष्करी शिपायांचें काम करणें अवश्य असे. बहुताशीं ह्याच प्रकारची रीत हल्लीं युरोप खंडांत व अमेरिका खंडांत चालू आहे. तेथें प्रत्येक मनुष्यास कांहीं वर्षं तरी लष्करांत शिपाई होऊन चाकरी करावी लागते. अशा फौजेस इंग्रजींत '**मिलिशिया**' असें म्हणतात.

* एका प्रसंगीं अथेन्सच्या लोकांनीं शत्रूवर फौज पाठविली असतां त्या फौजेनें शत्रूचा पराभव तर केला; परंतु ती लढाई पाण्यांत झाली, व त्या प्रसंगीं मोठें तुफान होऊन कितीएक लढाऊ गलबतें फुटून त्यांवरील लोक समुद्रांत बुडून मेले. पुढें लढाईस गेलेले सरदार परत आल्यावर, गलबतें फुटून समुद्रांत बुडून शिपाई लोक मरत असतां ह्यांनीं त्यांस मदत

किती व कसेही हाल पडले असतां ते काढण्याची आपणास संवय लावली होती; आणि नगरवासी प्रतिष्ठित लोकांस जीं कामें अवश्य करावीं लागतात त्यांतून बहुतेक कामें वर सांगितलेल्या गुणांवांचून बहुधां घडत नसतात. धनाचा धिक्कार व दारिद्र्याची प्रीति हीं जितकीं साक्रेतिसाच्या ठिकाणीं होतीं, त्यापेक्षां तीं अधिक ज्याच्या ठायीं आहेत, असा मनुष्य सांपडणें कठिण. निरिच्छता हा ईश्वरी गुण होय. आणि हा गुण मनुष्याच्या ठिकाणीं जसजसा वाढतो, तसतसें त्याच्या ठिकाणीं ईश्वरी सादृश्य येतें, असें त्याचें मत असे. त्याची समजूत अशी असे कीं, ईश्वराच्या ठायीं जें परिपूर्णत्व आहे, त्याचें एक कारण हें आहे कीं, त्यास कोणत्याहि गोष्टीची अपेक्षा नाहीं; आणि ह्याकरितां मनुष्याच्या अपेक्षा जसजशा कमी होत जातात, तसतसें त्याच्या ठायीं ईश्वराचें सादृश्य विशेष येतें. लग्नादि समारंभांत लोकांस सोन्यारुप्याचे अलंकार घालून मिरवतांना, व ऐषआरामी करून थोरवी दाखवितांना त्यानें पाहिलें, म्हणजे तो आपल्या अवस्थेचा मोठा संतोष मानून असें म्हणत असें कीं, अहो, मी केवढा सुखी आहे ! मी जे हे पदार्थ पहात आहें, व जे प्राप्त होण्या-करितां, व प्राप्त झाल्यावर ज्यांच्या रक्षणाकरितां किती दुःखें भोगावीं लागतात व किती श्रम करावे लागतात. अशा ह्या पदार्थांपैकीं मला कितीएक पदार्थांची मुळींच गरज नाहीं ! साक्रेतिसाच्या बापानें मरतेवेळेस त्याकरितां सुमारें दोन हजार रुपये मागें ठेविले होते. पुढें त्याच्या एका मित्रास तेवढ्याच रकमेचें काम होतें, म्हणून त्यानें ते त्यास दिले. पुढें त्या मित्राचें काम फसून त्याची रक्कम ठार बुडाली. तथापि एवढी खोट त्याला लागली

---

करण्याची हयगय केली, असा गुन्हा त्या सरदारांवर त्यांच्या शत्रूंनीं घातला; आणि ते असें म्हणाले कीं, ह्या गुन्हेगार सरदारांस ह्या गुन्ह्या-बद्दल देहांत शिक्षा द्यावी कीं नाहीं, असा प्रश्न घालून एकंदर लोकांचें मत घ्यावें, व बहुमताप्रमाणें तजवीज करावी. ह्याप्रमाणें करणें त्या संस्थानच्या कायद्यास विरुद्ध होतें. व ही गोष्ट गैरशिस्त आहे म्हणून थोड्या लोकांनीं शंका काढली. परंतु त्या सरदारांस शत्रू फार होते, त्यांनीं अशी धमकी दिली कीं, ह्या गुन्हेगार सरदारांस बचावण्याचा यत्न कोणीं केला, तर त्यांचीं नांवें गुन्हेगारांत घातलीं जातील. ह्या धमकीस भिऊन, शंका काढ-णारांनीं आमची कांहींएक शंका नाहीं म्हणून सांगितलें. ह्या प्रसंगीं साक्रेतीस मुख्य सभासद होता. त्यानें मात्र सर्व भय सोडून साफ सांगितलें कीं, ही जी तुम्ही गोष्ट करतां, ही कायद्यास विरुद्ध आहे, व ही मला मान्य नाहीं.

असतां तिचें दुःख त्यानें आपल्या वैराग्याच्या व समाधानवृत्तीच्या योगानें सहन केलें. असें तसें सहन नव्हे, तर त्या खोटीविषयीं त्यानें चकार शब्दहि कधीं काढिला नाहीं. कानामिक्स नामक ग्रंथांत जेनोफनानें असें लिहिलें आहे कीं, त्याच्या घरांतील सर्व चीजवस्त मिळून १२० रुपयांवर नव्हती, इतका तो गरीब होता. अथेन्स शहरांतील मोठमोठे धनाढ्य लोक त्याचे मित्र होते, व आपल्या संपत्तींतून कांहीं अंश साक्रेतिसानें घ्यावा म्हणून त्यांनीं त्यास जितका पाहिजे तितका आग्रह केला; परंतु तें त्यांचें म्हणणें त्यानें कधींहि मान्य केलें नाहीं. त्यास कांहीं गोष्टीची गरज लागली असतां, ती लोकांस सांगण्यास तो कधींहि लाजत नसे. एके दिवशीं तो मित्रमंडळींत बसला असतां असें म्हणाला कीं, मजपाशीं जर पैसा असता, तर मी आपणास एक अंगरखा केला असता. ही गोष्ट तो कोणा एकास विशेषेंकरून उद्देशून बोलला असें नाहीं; पण त्यानें आपणास जी निवंता होती, ती सामान्यतः सर्व मित्रमंडळीस सांगितली. हें ऐकून त्याचे सर्व शिष्य, ही लहानशी नजर साक्रेतिसास मी देईन, मी देईन असें भांडूं लागले. रोमन लोकांत सिनेका नामें एक मोठा ग्रंथकार होता, तो असें म्हणतो कीं, साक्रेतिस ह्यास पुढें अंगरख्याची गरज लागेल, हें आपल्या बुद्धीनें पूर्वींच समजावयाजोगें असतां, तें त्याच्या विद्यार्थ्यांस न समजून त्यांनीं त्यास ती गरज तोंडानें बोलण्याचा प्रसंग आणिला, ह्यावरून ते फार मंदबुद्धि होते असें दिसतें. आर्किलेअस म्हणून मासिदोनिया प्रांताचा एक राजा होता, त्याच्या मनांत फार होतें कीं, साक्रेतिसासारखें रत्न आपल्या पदरीं असावें. म्हणून त्यानें बहुत नजरा देऊन त्यास बोलावण्यास वकील पाठविला; परंतु ही गोष्ट न स्वीकारतां साक्रेतीस असें बोलला कीं, आपण त्या पुरुषाकडे गेलों असतां तो जे उपकार करील ते फेडण्याचें जर आपल्या अंगीं सामर्थ्य नाहीं, तर आपण त्याकडे जाऊं नये असें एका इतिहासकारानें लिहिलें आहे. परंतु सिनेका हें उत्तर मान्य करीत नाहीं. तो असें म्हणतो कीं, भलत्या भलत्याच गोष्टींत थोरवी व प्रतिष्ठा हीं आहेत असें राजांस वाटत असतें; ती त्यांची भ्रांति घालविणें, संपत्तीचे वास्तविक उपयोग अमुक आहेत त्याकारितां ती पाहिजे, नुसती ती म्हटली असतां तुच्छ पदार्थ आहे, असें त्यांच्या मनांत भरवून देणें, राज्य करण्याची कला त्यांस शिकविणें, सारांश, ह्या लोकांत आपण वागावें कसें, व कोणत्या रीतीनें चाललें असतां ह्या लोकीं आपला शेवट गोड होईल, ह्या गोष्टींचा त्यांस

उपदेश करणें, हे राजांवर विद्वानांचे लहान प्रत्युपकार आहेत काय? ह्यास्तव, आपल्या हातून प्रत्युपकार होणार नाहीं, म्हणून साक्रेतिसानें त्या राजाचें बोलावणें पतकरलें नाहीं असें नव्हे; तर त्यानें असा विचार केला कीं, जेथील लोक स्वतंत्र, अशा ह्या अथेन्स शहरांत सुद्धां लोकांस आपला स्वतंत्रपणें वागण्याचा प्रकार सोसत नाहीं, इतका आपला निःस्पृहपणा आहे. तेव्हां अशा निःस्पृह स्वभावास स्वेच्छेनें दुसऱ्याची तावेदारी पतकरणें हें योग्य नाहीं, असें वाटून तो मासिदोनच्या दरबारीं गेला नाहीं. ह्याप्रमाणें तो संसारांत विलक्षण हाल काढीत असे, परंतु त्या हाल काढण्यामुळें तो त्या काळाच्या विद्वानांसारखा दुर्मुखलेला नसे. तो मंडळींत बसला असतां किंवा कोणाशीं संभाषण करूं लागला असतां, फार उल्हासवृत्ति आणि मोठा रसिक असे; आणि दुसऱ्याचें मनोरंजन करण्याविषयीं तर काय केवळ मूर्तिमान रसच होता. तो पराकाष्ठेचा दरिद्री होता, तरी तो आपलें घर व वस्त्रप्रावरण चांगलें स्वच्छ राखण्याविषयीं मोठा बाणा बाळगी. त्या काळीं अंतिस्थिनीस नामें एक विद्वान् असे. तो नेहमीं मळकट व लकतऱ्या लोंबलेलीं अशीं पांघरुणें अंगावर घेऊन, मी मोठा निःस्पृह आहें, असें मोठें उपहासास्पद ढोंग करी; तें साक्रेतिसाला अगदीं आवडत नसे. तो एकदां त्यास म्हणाला कीं, तुम्ही चिंध्या अंगावर घेतां, परंतु त्यांच्या भोंकांतून तुमचा गर्व मात्र लोकांच्या दृष्टीस पडतो. त्या पुरुषाच्या ठायीं हा एक मोठा गुण होता कीं, त्याचें मन सर्वकाळ शांत असे. ती शांति अशी कीं, कोणतेंहि अरिष्ट येवो, कोणतीहि हानि होवो, कोणताहि उपद्रव होवो अथवा कोणतेंहि दुःख किंवा अपमान भोगावा लागो, पण ती त्याच्या अंतःकरणांतून कधीं ढळलीच नाहीं. कोणी म्हणतात कीं, हा मूळचा फार तापट व हूड होता; व पुढें त्याच्या अंगीं जो उपशम आला, तो उपशम, तो विचार करीत असे त्या विचाराचें, व आपल्या चित्ताचा जय करून तें सन्मार्गीं प्रवृत्त करण्याविषयीं जो त्याचा रात्रंदिवस प्रयत्न चालला होता, त्या प्रयत्नाचेंच केवळ फळ होय; आणि हेंच जर खरें असेल, तर येणेंकरून त्याची योग्यता फारच मोठी होती असें समजावें. सिनेका असें लिहितो कीं, ' मी आतां रागावणार असें जर तुमच्या नजरेस आलें, तर तात्काळ मला त्या गोष्टीची सूचना करीत जा; आणि तुम्हांस रागावतांना मी पाहिलें, तर मीहि तुम्हांस तें कळवीत जाईन; ' असें त्याचें आपल्या शिष्यमंडळीस सांगणें असे. खरेंच, आपण जोंपर्यंत शुद्धीवर आहों, व आपल्या अंगाचा संताप झाला नाहीं, तोंपर्यंत कांहीं उपाय केल्यास

आपणास कोप आवरतां येईल, पुढें येणार नाहीं. आपणास राग येतो आहे, असें त्यास समजल्यावर, प्रथमतः मोठ्यानें बोलत असल्यास तो लागलाच आपला स्वर हलका करी, किंवा अगदींच उगा राही. एकदां त्याच्या चाकरानें त्याचा कांहीं अपराध केला होता, त्यामुळें आपणास मोठा राग आला, असें समजून तो म्हणाला कीं, 'अरे, ह्या वेळेस जर मला राग आला नसता, तर मी तुला ठोकलें असतें. एकदां कोणी एकानें त्याच्या तोंडांत मारली होती; तेव्हां त्यास राग न येतां तो हसून बोलला कीं, 'शिरस्त्राण केव्हां घालावें हें ठाऊक नसणें हें मोठ्या दुर्दैवाचेंच एक लक्षण आहे! ह्या वेळीं माझ्या डोक्यावर जर शिरस्त्राण असतें, तर मला ह्या मनुष्याच्या ताडनापासून कांहींएक व्यथा झाली नसती.' त्याच्या अंगीं जितकी सहनशीलता होती, तितकी सर्व प्रकट करण्यास त्यास घरांतच प्रसंग पडत असे; त्यासाठीं उंबऱ्याबाहेर जाण्याची त्याला गरज नव्हती. जांतपी नामें त्याची बायको होती, तिचा स्वभाव पराकाष्ठेचा तापट, छांदिष्ट व द्वाड असा असे. त्या कृत्येनें त्यास मनस्वी त्रास देऊन सहनशीलतेविषयीं त्याचें फारच सत्त्व पाहिलें. त्या स्त्रीचा स्वभाव, तिच्याशीं लग्न करण्याच्या अगोदरपासून त्याला ठाऊक होता. जेनोफनाच्या ग्रंथांत असें लिहिलें आहे कीं, बायकोनें केलेला अपमान जर आपणाच्यानें सोसवला, तर मग, ज्याबरोबर आपणास वागतां येणार नाहीं असा तर द्वाड मनुष्य राहणारच नाहीं, अशा खातरीनें दुसऱ्या बायका टाकून जाणूनबुजून मीं हिशीं लग्न केलें, असें साक्रेतीस आपल्या तोंडानें बोलत असे; आणि त्याच उद्देशानें जर त्यानें तिशीं संबंध केला असला, तर त्याचा उद्देश पूर्ण सिद्धीस गेला, ह्यांत कांहीं एक संशय नाहीं! कां कीं, ह्या जगांत हिजपेक्षां कजाग, आर्ष व दुष्ट अशी दुसरी बायको कधीं झाली नसेल. तिनें कोणती शिवी म्हणून त्याला द्यावयाची वगळली नाहीं, किंवा कोणताहि उपद्रव करावयाचा ठेविला नाहीं. कधीं कधीं ती त्यावर अशी संतापे आणि बेफाम होऊन जाई कीं, उभ्या रस्त्यांत त्याचीं वस्त्रें फाडी. एकदां तर तिनें त्वेषाच्या भिरीरींत तोंडांत ज्या शिव्या आल्या त्या सर्व देऊन, शेवटीं त्याच्या डोईवर घाणेऱ्या पाण्याची घागर ओतली! असें तिनें केलें तरी तो हंसून इतकेंच बोलला कीं, असा कडकडाट झाल्यावर पाऊस पाहिजेच होता! कोणी प्राचीन ग्रंथकार असें लिहितात कीं, साक्रेतीस ह्यास दुसरी एक बायको होती; तिचें नांव मिरतो. ती अरिस्तायजीस म्हणून ग्रीक

लोकांत एक मोठा प्रसिद्ध पुरुष होता, त्याची नात होती. त्या दोघींनीं साक्रेतिसास पराकाष्ठेची पीडा दिली. त्यांचें ऐक्यमत म्हटलें म्हणजे त्याला शिव्यांची लाखोली वाहण्यांत मात्र होत असे. ते ग्रंथकार असें म्हणतात कीं, पिलापोनीससची ऽ लढाई चालली असतां मोठी चरीमरी उठून अथेन्स शहरांतील बहुत मनुष्यें मेलीं, मग पुनः लोकांचा भरणा लवकर व्हावा म्हणून अथेन्स शहरांत असें ठरविलें होतें कीं, ज्यास पाहिजे त्यानें एका काळीं दोन बायका कराव्या. साक्रेतीस ह्यानें ह्या ठरावाप्रमाणें दोन बायका केल्या होत्या, असें ग्रंथकारांस वाटण्यास एका ग्रंथाचा आधार आहे; परंतु प्लेतो, जेनोफन् वगैरे ग्रंथकार साक्रेतिसाचे शिष्य होते, त्यांस त्याची चांगली माहितगारी होती. ते त्याच्या दुसऱ्या लग्नाची कोठें कांहींच गोष्ट लिहीत नाहींत. तसेंच जेनोफन्, दायदोरस् वगैरे ग्रिस देशाचे इतिहासकार ह्यांनीं पिलापोनिससच्या लढाईची सविस्तर हकीकत लिहिली आहे; परंतु ती लढाई चालली असतां अथेन्स शहरांत वर सांगितलेला कायदा ठरला होता, असें त्यांनीं कोठेंहि लिहिलें नाहीं. ह्यावरून साक्रेतिस ह्यानें एका काळीं दोन बायका केल्या होत्या, ही गोष्ट अगदीं खोटी आहे असें सिद्ध होतें.

---

# अध्याय दुसरा.

## साक्रेतिस ह्यास एक दीमन अनुकूल असे, हा ह्या अध्यायांतील विषय आहे.

हिंदु लोक जसे यक्ष, किन्नर, इत्यादि उपदेव मानितात, तसे ग्रिक लोक दीमन मानीत असत. साक्रेतीस म्हणत असे कीं, एका दीमनाचा मजवर प्रसाद आहे. बहुतेक कृत्यांत तो मला बुद्धिवाद सांगतो, व माझा सांभाळ

ऽ अथेन्सचें राज्य व स्पार्ताचें राज्य ह्या दोहोंमध्यें ही लढाई चालली होती. ग्रीस देशांतील सर्व संस्थानें कांहीं एका पक्षास व कांहीं दुसऱ्या पक्षास अशीं मिळालीं होतीं, ह्या लढाईस इसवी सनाच्या पूर्वी ४३१ व्या वर्षी आरंभ होऊन ती सत्तावीस वर्षे चालली होती. ग्रीस देशाच्या दक्षिणेकडील द्वीपकल्पाचा जो भाग आहे, त्यास प्राचीनकाळीं पिलापोनिसस असें म्हणत, व हल्लीं मोरिया म्हणतात. त्या भागांतील बहुतकरून सर्व लोक एका म्हणजे स्पार्ताचे लोकांच्या पक्षास असल्यामुळें ह्या लढाईस तें नांव पडलें.

करितो. ह्या दीमनाची कांहीं माहिती झाल्यावांचून साक्रेतीस ह्याचा पूर्ण वृत्तांत आमच्या वाचकांस समजणार नाहीं. म्हणून या अध्यायांत ह्याविषयींचें निरूपण करितों.

हा दीमन कोणता होता, ह्याविषयीं ग्रंथकारांचीं मतें भिन्न आहेत; बहुतेक ग्रंथांत त्याचें नांव 'साक्रेतीस ह्याचा दीमन' असें प्रसिद्ध आहे. ही देवता त्यास अमुक गोष्टी कर म्हणून सांगत नसे; परंतु जींत त्याचा नाश आहे अशी कांहीं गोष्ट तो करूं लागला असतां मात्र ती न करण्याविषयीं त्याचें मन फिरवीत असे. प्लूतार्क म्हणून प्राचीन काळच्या लोकांचा वृत्तांत लिहिणारा एक ग्रीक ग्रंथकार होता, त्यानें एका ग्रंथांत साक्रेतीस ह्याच्या दीमनाविषयीं वर्णन केलें आहे. त्यांत त्यानें त्या दीमनाविषयीं व त्याच्या अस्तित्वाविषयीं प्राचीन ग्रंथकारांचीं मतें लिहिलीं आहेत. त्या मतांतून जें मत विशेष युक्तिसिद्ध दिसतें तें येथें लिहितों. आतां ह्या मतांवर प्लूतार्क ह्याचा मोठा निर्धार आहे असें वाटत नाहीं. असो.

ही गोष्ट सर्वांस विदित व मान्य आहे कीं, पुढें काय होईल ह्याचें वास्तविक व स्पष्ट ज्ञान एका ईश्वरास मात्र आहे; मनुष्यास त्याविषयीं अटकळी मात्र करितां येतात. अटकळ, जीस शास्त्रांत अनुमान असें म्हणतात, ती बांधण्याचा असा प्रकार आहे कीं, कांहीं गोष्टीमागून कांहीं गोष्ट घडतांना बहुत वेळां पाहून, प्रथम पाहिलेली गोष्ट दुसऱ्या गोष्टीस कारण आहे, असें पाहणारास वाटूं लागतें. मग जी गोष्ट कारणरूप असते तिजसारखी दुसरी पाहिली असतां तिच्या मागून कार्यरूप गोष्ट होईलच असें जें वाटतें, त्याचें नांव अनुमान किंवा अटकळ; हें स्पष्ट मनांत येण्याकरितां एक उदाहरण सांगतों. दोन पुरुषांनीं एकास सात आठ वेळ गार पाण्यानें सकाळीं स्नान करतांना पाहिलें व तितकें वेळां त्यांस पडसें येतांनाहि पाहिलें. एकास असें वाटलें कीं, पाण्यानें स्नान करणें हेंच पडशास कारण. दुसरा विचारी होता, त्यास गार पाण्याचें सकाळचें स्नान पडशाचें कारण असें वाटलें. आतां एखाद्या दुसऱ्या मनुष्यास ऊन पाण्यानें स्नान करतांना पाहून ह्या दोघांनीं त्यास पडसें येईल किंवा नाहीं ह्याविषयीं अनुमानें केलीं असतां पहिल्याचें अनुमानापेक्षां दुसऱ्याचें अनुमान खरें होईल. सारांश, कांहीं मनुष्यांनीं केलेलें भाकीत चांगलें जमतें, याचें कारण असें असतें कीं, पुढें घडून येणाऱ्या गोष्टीस साधकबाधक जीं निरनिराळीं कारणें असतात, त्यांमध्यें, कोणतीं बलवत्तर

आहेत असा विचार अभ्यासामुळें त्यांस अगदीं बरोबर करितां येतो; आणि तेणेंकरून, अमुक काम परिणामीं सिद्धीस जाईल किंवा फसेल हें त्यांस स्पष्ट दिसतें. अशी जी भाकीत करण्याची शक्ति ही कांहींशी ईश्वरी गुणासारखी आहे; व ही ज्या मनुष्याच्या ठायीं असते, त्यास इतर मनुष्यांपेक्षां श्रेष्ठपणा येतो व ईश्वराचें कांहीं सादृश्यहि येतें. कां कीं, ईश्वरानें पुढील येणाऱ्या गोष्टीविषयीं कशी काय योजना करून ठेविली आहे, हें स्वशक्तीनें त्यास बरेंच समजतें; आणि ती शक्ति लोकांस अद्भुत वाटण्याकरितां आम्हांशीं देवता एकांतीं बोलत असते, व तिचा आम्हांवर मोठा प्रसाद आहे, अशीं ते नानाप्रकारचीं ढोंगें करितात * पण असें केल्यामुळें साक्रेतिसाचा बहुत लोक मत्सर करूं लागले.

---

## अध्याय तिसरा.

### देलफाय येथील देवानें असा कौल दिला होता कीं, इतर सर्व मनुष्यांपेक्षां साक्रेतिसाचें ज्ञान अधिक आहे. ही गोष्ट ह्या अध्यायांत सांगितली आहे.

हल्लीं हिंदु लोकांत जशीं पंढरपूर, जेजुरी, जगन्नाथ वगैरे जागृत देवस्थानें मानितात, तसें प्राचीनकाळीं ग्रीस देशांत देलफाय नामें एक मोठें विख्यात जागृत देवस्थान मानीत असत. तेथील देवाचें नांव अपालो असें होतें. त्या

---

* ह्या कलमांत रोलिन साहेबांचें मत लिहिलें आहे: परंतु ह्या मताप्रमाणें साक्रेतिसाच्या अंगीं दांभिकपणाचा दोष येतो; म्हणजे विशेष अकलेच्या योगानें त्यांस पुढील गोष्टी समजत असतां, त्या देवाकडून मला कळतात, असें तो ढोंग करी, असा भाव ह्या कलमांतून निघतो. ही गोष्ट, तो मोठा सज्जन व चांगला मनुष्य होता म्हणून ह्या ग्रंथांत जें साक्रेतिसाचें वर्णन केलें आहे, त्याशीं विरुद्ध आहे; तसेंच कांहीं दिवसांपूर्वीं ग्रोत नामक साहेबानें ग्रीस देशाच्या इतिहासाविषयीं जो मोठा ग्रंथ लिहिला आहे, त्या ग्रंथाशीं हें मत विरुद्ध आहे. ग्रोत साहेब असें स्पष्ट लिहितो कीं, तूं अमुक गोष्ट करूं नको असें देव आपणांस सुचवितो अशी साक्रेतिसाची वास्तविकच समजूत असे. तें त्याचें ढोंग नव्हतें. तो जेव्हां लहान मूल होता, व कार्यकारण भावावरून पुढील गोष्टींचें अनुमान करण्याचें सामर्थ्य त्याच्या अंगीं नव्हतें, तेव्हांपासून ती दैवी सूचना त्यास होत असे, असें साक्रेतीस म्हणे, असें प्राचीन ग्रीक ग्रंथांत लिहिलें आहे.

देवावर ग्रीस देशांतल्या सर्व लोकांची पराकाष्ठेची श्रद्धा असे; आणि त्यांस कोणतीहि गोष्ट समजून घ्यावयाची झाली तर, तें त्या स्थळीं जाऊन तेथें देवाची एक पुजारीण बाई असे, तीस विचारीत; म्हणजे ती त्यांचे प्रश्न कितीहि कठिण असलेः तरी त्यांचीं उत्तरें देई. तीं उत्तरें साक्षात् देवाच्या तोंडून आलेल्या उत्तराप्रमाणें ते खरीं मानीत असत. असो; आपल्या गुरूचा ज्यास मोठा अभिमान असा साक्रेतीस ह्याचा चिरीफन् नामें एक विद्यार्थी होता. तो एकदां सहज देलफाय येथें गेला असतां त्यानें ' साक्रेतिसापेक्षां शहाणा असा कोणी मनुष्य आहे काय ? ' म्हणून तेथील पुजारिणीस प्रश्न केला; तेव्हां तिनें सांगितलें कीं, ' कोणी नाहीं ! ' साक्रेतिसास हें उत्तर कळल्यावर तो पराकाष्ठेच्या घोटाळ्यांत पडला. त्यास ह्याचा कांहींच अर्थ समजेना, तो आपल्या मनांत विचार करूं लागला कीं, अहो, ह्या उत्तराचा अर्थ काय असावा बरें ? मजविषयीं तर मला पक्की खातरी आहे कीं, माझ्या ठायीं थोडें किंवा बहुत कांहींच शहाणपण नाहीं. बरें, कौल खोटा असेल, असाहि अंदेशा माझ्यानें घेववत नाहीं; कां कीं, देवता कधींहि खोटें बोलत नाहींत. अशी दोहोंकडून अडचण आल्यावर त्यानें ह्याविषयीं एकाग्र चित्त करून फार विचार केला; व ह्या उत्तराचा अर्थ काढण्यासाठीं मनस्वी श्रमहि घेतला; तो असा कीं, अथेन्स शहरांत एक गृहस्थ असे तो मोठा अंमलदार असून राज्यप्रकरणांत मोठा प्रवीण व मोठा मुत्सद्दी होता. त्या शहरांत जे जे मोठमोठे नामांकित शहाणे असत त्यामध्यें तो मोडत असे; व दुसरे लोक त्याच्या अंगीं जितकी योग्यता समजत तिजपेक्षां आपल्या अंगीं अधिक योग्यता आहे, अशी त्याची खातरी असे. त्यास साक्रेतिसानें प्रथमतः कांहीं प्रश्न करून पाहिले.

त्याशीं संभाषण केल्यावरून साक्रेतिसास दिसून आलें कीं, यास कांहीं समजत नाहीं. मग त्यानें हें त्याचें अज्ञान चांगलें समजावयाजोग्या शब्दांनीं त्यास व्यंगोक्तीनें सुचविलें. तेणेंकरून तो गृहस्थ, व दुसरे जे लोक तेथें होते ते साक्रेतिसाचा द्वेष करूं लागले. नंतर राज्यप्रकरणांत बाणा बाळगणारे जे आणखी दुसरे लोक होते, त्याजकडे जाऊन त्यांशीं संभाषण करून त्यांसहि कांहीं येत नाहीं असें त्यानें ठरविलें. ह्या त्याच्या शोधापासून त्यास इतकेंच फळ प्राप्त झालें कीं, त्यानें आपणांस शत्रु मात्र पुष्कळ करून घेतले. राज्य-प्रकरणीं लोक संपल्यावर तो कवींशीं संवाद करूं लागला; आणि पाहातो तों

त्यांच्या ठायीं तर राज्यप्रकरणीं लोकांच्यापेक्षां फारच अहंता भरली आहे. आणि विद्या व ज्ञातेपणा हे गुण खरोखरी म्हटलें असतां फारच कमी आहेत असें त्याच्या नजरेस आलें. पुढें त्यानें ज्ञात्याचा शोध कारागीर लोकांमध्यें चालविला. त्या लोकांत त्याच्या दृष्टीस असें पडलें कीं, एकाद्या कामांत एखादा वाकबगार असला म्हणजे तेवढ्या वाकबगारीमुळें तो कारागीर आपणांस इतरीहि सर्व कामें येतात असें समजे. सारांश, पुष्कळ बढाई करावी हा दोष अथेन्सांतील सर्व लोकांमध्यें होताच; व ते लोक मोठे डौली असत, ह्यामुळें ते आपण सर्वज्ञ आहों असा आव घालीत, व कोणताहि विषय निघाला असतां त्याच्वर पांडित्य करण्यास मागें पुढें पाहात नसत; आणि ते स्वभावतः धूर्त असत, ह्यास्तव कोणताहि प्रसंग पडला असतां आपलें अज्ञान बाहेर पडूं न देतां ते धैर्यानें तो मारून नेत. ह्याप्रमाणेंच त्यानें परदेशच्या लोकांतहि शोध केला; पण त्यास कोणी ज्ञाता सांपडला नाहीं.

नंतर साक्रेतिसानें आपणाविषयीं विचार केला व ज्यांशीं त्यानें आजपर्यंत वादविवाद केले त्यांशीं आपली तुलना केली; त्या वेळेस त्याच्या नजरेस असें आलें कीं, मजमध्यें व लोकांमध्यें भेद हाच कीं, ज्या गोष्टी त्यांस वस्तुतः समजत नाहींत, त्या मलाहि समजत नाहींत. पण मी आपलें अज्ञान प्रांजलपणें पतकरतों, आणि ते तसें करीत नाहींत. ह्या सर्व विचारावरून त्यानें असा सिद्धांत केला कीं, वास्तविक ज्ञाता म्हटला असतां एक ईश्वर मात्र आहे. आतां अपालोच्या पुजारिणीनें मला ज्ञाता म्हटलें, याचा अर्थ इतकाच कीं, मनुष्यांत वास्तविक ज्ञाता तर कोणीच नाहीं; तेव्हां जो मनुष्य साक्रेतिसाप्रमाणें आपलें अज्ञान समजतो, तोच मनुष्यांत ज्ञाता होय.

---

## अध्याय चवथा.

**साक्रेतीस अथेन्स शहरांतील मुलांस विद्या शिकविण्याच्या कामास लागला; त्याचे विद्यार्थी त्याजवर पराकाष्ठेची प्रीति करीत आणि तो धर्मसंबंधीं व राज्यसंबंधीं उत्तम नियम त्यांच्या मनांत भरवून देई; हा ह्या अध्यायांतील विषय आहे.**

साक्रेतिसाच्या जन्मांत ज्या मुख्य मुख्य गोष्टी घडल्या, त्यांपैकीं कांहीं गोष्टी इतका वेळ सांगितल्या, आतां पुढें ज्या गोष्टीनें वाचकांस त्याचें स्वरूप मुख्यत्वेंकरून समजेल, ती गोष्ट सांगण्यास आरंभ करितों. ती गोष्ट ही कीं, त्यानें

सर्व जगास विद्योपदेश करण्याविषयीं व विशेषेंकरून अथेन्स शहरांतील मुलांस सुज्ञ करण्याविषयीं श्रम घेतले. लिबोनियस असें लिहितो कीं, बापाचें मुलांच्या हिताविषयीं व उत्कर्षाविषयीं जसें लक्ष असतें, तसें त्याचें स्वदेशीय लोकांच्या कल्याणाविषयीं लक्ष होतें; परंतु ज्या भ्रांति लहानपणापासून मनुष्यांच्या मनांत शिरून, त्यांच्या काळ्या केसांचे पांढरे केस होत तोंपर्यंत त्यांच्या ठायीं राहिल्या, त्या भ्रांति त्यांच्याकडून सोडविणें कठिण, असें समजून त्यानें प्रौढ वयांत आलेल्या लोकांचे डोळे उघडणें टाकून तो मुख्यत्वेंकरून मुलांच्या मनांत आपले उपदेश भरवून देण्याविषयीं मेहनत करूं लागला; आणि हा त्याचा विचार फार चांगला होता. कां कीं, ज्या वावरांत फार रान माजलें असतें, त्याच्या पाळांनीं आंत शिरून जें व्यापून टाकिलें असतें, त्या वावरांतील सर्व रान तोडून व खोल खोल गेलेलीं मुळें खणून काढून तेथें सुंदर बाग लावण्याचा प्रयत्न करण्यापेक्षां, ज्या वावरांत मुळीं झाडझुडप व तन नाहीं, तें नांगरून तेथें तो बाग लावण्याविषयीं प्रयत्न करावा, ह्यांत फार शहाणपणा आहे; आणि रान माजलेलें वावर चांगलें करण्यापेक्षां प्रौढ वयांत आलेल्या मनुष्यास सुधारण्यांतहि एक विशेष अडचण आहे. ती ही कीं, वावर नीट करूं लागलें असतां तें प्रतिबंध करीत नाहीं; पण ह्यांच्या मनांतील भ्रांति काढूं लागलें असतां हे प्रतिबंध करितात; असो.

त्या वेळच्या इतर पंडितांच्या जशा शाळा असत, तशी साक्रेतीस ह्याची शाळा नव्हती; व त्यांच्या जशा पाठ सांगण्याच्या वेळा नेमलेल्या होत्या, तशाहि ह्याच्या नव्हत्या. भोंवतालीं विद्यार्थीमंडळी घेऊन मध्यें आपण गुरूच्या आसनावर बसून त्यांस सांगतो आहे असें त्यानें कधींच केलें नाहीं. प्रसंग आला म्हणजे जेथें पाहिजे तेथें व जेव्हां पाहिजे तेव्हां तो लोकांस विद्या शिकवित असे. रपेटीच्या वेळेस, चार मंडळींत बसून गोष्टी सांगतांना, जेवतांना, फौजेंत असतांना, फार काय सांगावें मरावयाच्या पूर्वी तो तुरुंगांत होता तेथें देखील तो उपदेश करीत असे. प्लुतार्क लिहितो कीं, त्यानें विष प्राशन केल्यावर देखील, जीव नित्य आहे, असें सिद्ध करून ती गोष्ट जगास विदित केली; व त्याच समंजस ग्रंथकारानें साक्रेतिस ह्याच्या उदाहरणावरून राज्यप्रकरणसंबंधीं एक उत्कृष्ट गोष्ट सिद्ध केली आहे. परंतु ती गोष्ट प्लुतार्काच्या मनांत प्रथम आली असें म्हणतां येत नाहीं; कारण सिनेकानें प्लुतार्काच्या पूर्वी बहुत दिवस ती स्पष्ट लिहून ठेविली आहे. ती गोष्ट

अशी कीं, मनुष्यास 'लोकनियंता' अशी संज्ञा प्राप्त होण्यास, त्याला न्यायाधिशाचें वगैरे सरकारी काम खरोखरी असलें पाहिजे असें नाहीं. असे लोक बहुत आहेत कीं, ज्यांस हीं वर सांगितलेलीं सरकारी कामें असतात, व सरकारांतून अंमलदाराचीं चिन्हें व इतमाम हीं मिळालेलीं असतात; तसेंच किताबांनीं थोरपणा येतो, असें जर कोणास वाटत असलें, तर मोठमोठे रावबहादूर वगैरे किताबहि बहुतांस असतात; तथापि वास्तविक पाहिलें असतां हे कोणी अत्यंत नीच व हलक्या पदवीचे लोक आहेत असें एखाद्या विचारी मनुष्यास वाटावें, अशी त्यांची योग्यता असते. तर दुसऱ्यांनीं कोणत्याहि कामांत आपली मसलत घेतली असतां त्यांस उत्तम शहाणपणाचा उपदेश कसा करावा, आपल्या नगरांतील लोकांस सदाचरण करण्याविषयीं उत्तेजन कसें द्यावें, व त्यांच्या मनांत प्रामाणिकपणा, देवधर्मावर भक्ति, उदारपणा, स्वदेशप्रीति इत्यादि सद्गुण कसे भरवून द्यावे, हें ज्या पुरुषास कळतें—मग तो किती कां दरिद्री असेना, किंवा मोडक्या झोपडींत कां राहीना—प्लुतार्क म्हणतो कीं तो पुरुषच खरा फौजदार, खरा न्यायाधीश, व खरा लोकनियंता होय !

साक्रेतीस हा योग्यतेचा पुरुष होता. त्यानें शिष्य तरबेज केले, व ग्रीस देशांतील लोकांच्या मुलांस शहाणपण शिकविलें; आणि तेणेंकरून त्यापासून त्या देशास जो फायदा झाला, तो इतका मोठा होता, असें शब्दांनीं पुरतेपणें सांगतां येत नाहीं. त्याच्यासारखे पुष्कळ विख्यात विद्यार्थी कोणत्याहि गुरूपाशीं नव्हते. त्याच्या विद्यार्थ्यांपैकीं एकटा प्लेतो नामें विद्यार्थीच हजारों विद्यार्थ्यांच्या बरोबरीचा होता. हा प्लेतो साक्रेतीस ह्यास किती लोकोत्तर मानीत असे, हें पुढील गोष्टीवरून समजेल. जेव्हां प्लेतो मरावयास टेंकला, तेव्हां त्यानें परमेश्वराचें स्तवन करून विशेषतः ह्या तीन गोष्टीं-विषयीं त्याचा मोठा आभार मानिला. त्या तीन गोष्टी ह्या होत्या. पहिली, त्यानें आपल्यास मनुष्यजन्मास घालून, विचार करण्यास बुद्धि दिली; दुसरी त्यानें आपल्यास अडाणी × लोकांत उत्पन्न न करितां ग्रीस देशांत उत्पन्न केलें;

---

× प्राचीन काळचे बहुतेक सर्व लोक आपणांखेरीज इतर लोकांस अडाणी समजत व नीच मानीत. ह्याच प्रकारची प्राचीन ग्रीक लोकांची समज होती. प्राचीन हिंदु लोक आपणांस आर्य म्हणजे श्रेष्ठ म्हणत, व इतर सर्व लोकांस म्लेंच्छ म्हणजे अडाणी असा शब्द लावीत. प्राचीन याहुदी लोकांचीहि अशीच समजूत होती.

आणि तिसरी गोष्ट ही कीं, साक्रेतीस जिवंत होता त्या वेळीं आपल्यास जन्मास घातलें. ह्या तिन्हीं गोष्टींचें आनुकूल्य जेनोफनासहि होतें. त्याची अशी गोष्ट सांगतात कीं, तो एक दिवस रस्त्यांतून चालला असतां त्यास साक्रेतीस भेटला, आणि त्यानें त्यास थांबवून पुसलें कीं, शिधा कोठें विकत मिळतो, हें तुला ठाऊक आहे काय? ह्या प्रश्नाचें उत्तर देणें जेनोफनास कठिण पडलें नाहीं. नंतर साक्रेतिसानें पुनः विचारलें कीं, मनुष्यास सदाचरणाचें ज्ञान कोणत्या ठिकाणीं होतें? ह्या दुसऱ्या प्रश्नानें जेनोफन निरुत्तर झाला. हें पाहून साक्रेतीस त्यास म्हणाला कीं, तें ठिकाण समजण्याची जर तुला इच्छा असली, तर माझ्याबरोबर चल, म्हणजे तें तुला मी दाखवीन. तेव्हां जेनोफनानें साक्रेतिसानें सांगितल्याप्रमाणें केलें, आणि पुढें साक्रेतिसावर त्याची इतकी भक्ति बसली कीं, त्यानें आपल्या त्या गुरूचीं संभाषणें जमा करून ग्रंथरूपानें प्रथमतः प्रसिद्ध केलीं.

आरिस्तियस हा, आपला स्नेही जो इस्कोमाकस त्याबरोबर संभाषण करीत बसला होता, त्या वेळेस इस्कोमाकसानें संभाषणांत साक्रेतिसाच्या कांहीं कोट्या आणिल्या. त्या कोट्या ऐकून आरिस्तियसचें मन मोहित होऊन साक्रेतिसाचा शिष्य होण्याविषयीं त्यास अशी उत्कंठा लागली कीं, त्या चिंतेनें तो दिवसानुदिवस वाळत चालला, व त्याचें तोंड सुकत चाललें. शेवटीं त्याचा उद्देश जेव्हां सिद्ध झाला, व ज्या गोष्टी परंपरेनें दुरून कानीं आल्या असतांहि त्यास इतक्या गोड लागल्या, त्या गोष्टी जेथून निघाल्या तेथें मुळापाशीं जाऊन मनुष्यास अनर्थ कोणता, व तो दूर करण्याचा उपाय काय, ह्याचें ज्ञान करून देणारें विद्यारूप अमृत जेव्हां त्यास पोटभर प्यावयास मिळालें, तेव्हां त्याचा सर्व चिंताज्वर निघून त्यास समाधान वाटलें.

ग्रीस देशांत मेगारा नामें एक लहानसें राज्य होतें. तेथें साक्रेतिसाचा युक्लिद नांवाचा एक शिष्य रहात होता. त्याची जी गोष्ट आहे, तीवरून त्याच्या शिष्यांस त्याचे उपदेश ऐकण्याची किती उत्कंठा होती, हें वर सांगितल्या गोष्टीपेक्षांहि चांगलें स्पष्ट दिसतें. साक्रेतिसाच्या वेळीं अथेन्स आणि मेगारा ह्या दोन संस्थानांमध्यें लढाई चालू होती. ती लढाई इतक्या आकसानें चालली होती कीं, अथेनियन लोकांनीं आपल्या सेनापतीकडून 'आम्हीं दरसाल दोन वेळ मेगारा लुटून उध्वस्त करूं,' अशी शपथ वाहून घेतली होती; व त्यांनीं कायदा ठरविला होता कीं, मेगारा येथील कोणी एकानेंहि अतिक्रांत

म्हणजे अथेन्सच्या राज्यांत पाय घालूं नये; घातल्यास त्यास प्राणान्त शिक्षा होईल! परंतु ह्या कायद्याच्या भयानें युक्लिदाच्या मनाची साक्रेतिसाजवळ विद्या शिकण्याची आस्था नाहींशी होणें तर कोठून, परंतु कमी सुद्धां झाली नाहीं! तो संध्याकाळ झाली म्हणजे जनानी पेहराव करून व तोंडावर बुरखा घेऊन आपलें शहर सोडून रात्रीं साक्रेतिसाच्या घरीं येई, आणि तेथें सर्व रात्र राहून पहाट झाली म्हणजे पुनः आलेल्या वेषानें माघारा आपल्या घरीं जाई.

अथेन्स शहरांतील मुलांस, साक्रेतीस जिकडे जाईल तिकडे त्याच्या मागें जाण्याविषयीं जो उल्हास वाटे, तो सांगितला तर एखाद्यास खरा वाटणार नाहीं. तो उल्हास इतका मोठा असे कीं, नेहमीं त्यास चिकटून राहून त्याचीं भाषणें ऐकावीं, म्हणून त्यांनीं आपलीं आईबापें सोडलीं, व ते ख्याली-खुशाली करणाऱ्या मंडळींत जाईनातसे झाले. आल्किवैदिस जो सर्व अथेन्सांत मनस्वी तापट असे, त्याची गोष्ट पुढें लिहिली आहे. तीवरून, साक्रेतिसाच्या बोलण्याची खुबी कशी होती, ह्याचा निर्णय वाचकांस करितां येईल. तो इतका जाज्वल्य होता, तरी साक्रेतिसानें कधींहि त्याचा मुलाजा केला नाहीं. त्याची रागाची उसळी शांत करण्याविषयीं तो नेहमीं झटत असे. एक दिवस आल्किवैदिस आपल्या दौलतीची व वतनाची मोठी बढाई मारीत होता; ( असेंच आहे कीं, उमेदवार बडे लोक संपत्तीनें फुगून जात असतात. ) त्या वेळेस साक्रेतिसानें पृथ्वीचा नकाशा त्याकडे नेऊन त्यावर आतिका प्रांत कोठें आहे तो दाखीव म्हणून विचारलें. परंतु तो प्रांत लहान पडला; यास्तव तो त्या नकाशावर त्यास लवकर दिसेना. मग फार श्रम करून त्यानें तो प्रांत शोधून काढल्यावर साक्रेतीस त्यास म्हणाला, आतां ह्यांत तुझी वतनी जमीन कोठें आहे ती दाखीव. आल्किवैदिस म्हणाला, ती फार लहान आहे; ती ह्या नकाशावर निराळी करून कशी दाखवितां येईल? हें ऐकून साक्रेतिसानें उत्तर दिलें, बरें तर बाबा, जमिनीचा जो तुकडा डोळ्यांनीं पुरता दिसत नाहीं, त्या क्षुल्लक तुकड्यास तूं कसा मोठा मानितोस? साक्रेतिसाचा हा विचार ह्याहूनहि पुढें चालविल्यास चालावया-जोगा आहे. आतिका प्रांत तरी सगळ्या ग्रीस देशाशीं लावून पाहिला असतां काय आहे? ग्रीस देश युरोपाशीं लाविला असतां काय आहे? आणि युरोप सर्व पृथ्वीशीं लाविलें असतां काय आहे? बरें, पृथ्वी तरी, तिजभोंवतालीं जे ग्रहरूप मोठमोठाले गोल आहेत त्यांनीं व्यापलेल्या अफाट अंतराळापुढें

कोण पदार्थ आहे? अहो, पृथ्वीवरील अत्यंत प्रतापी राजा देखील ह्या प्रमाणानें पाहतां केवळ क्षुद्र कीटकासारखा आहे.

सोफिस्त म्हणून कोणी पंडित असत; ते राजनीतींत मोठे पटाईत विद्यार्थी तयार करण्याचा मोठा बाणा बाळगीत. त्या पंडितांच्या हाताखालीं विद्याभ्यास केल्यामुळें अथेन्स शहरांतील उमेदवार लोकांच्या मनांत प्रतिष्ठा मिळविण्याची अनिवार्य इच्छा उत्पन्न झाली असे. तीमुळें, व थेमिस्तक्लीस, सैमैन व पिरिक्लीस ह्या परम विख्यात सेनापतींचा प्रताप ऐकून आपण त्याप्रमाणें व्हावें, असें त्यांस वाटत असे; त्यामुळें, पाहिजे ती गोष्ट करावयास आपण योग्य आहों, असें त्यांस वाटून ते राज्यांतील अत्यंत मोठमोठ्या जागांची आशा करीत. त्या उमेदवारांपैकीं ग्लाको नामें एक प्लेतोचा भाऊ होता. तो वीस वर्षांचा होता. त्याचें वय मोठें काम झेपतां यावयाजोगें नसतां व त्याच्या अंगीं अक्कल आणि कर्तृत्व हींहि नसतां, आपण सरकारी कामें करावीं, ह्या गोष्टीचें वेड त्याच्या डोक्यांत असें पक्कें शिरलें होतें कीं, तें मिळविण्याच्या छंदापासून त्याच्या कुटुंबापैकीं किंवा त्याच्या मित्रांपैकीं कोणाच्यानें त्याचें मन फिरवेना. हा प्लेतोचा भाऊ म्हणून त्यावर साक्रेतिसाची प्रीति असे; आणि साक्रेतिसानें शेवटीं त्याचें मन वळवून त्याजकडून कोणाच्यानें जो छंद सोडवत नव्हता, तो सोडविला. तो प्रकार असाः—

एके दिवशीं साक्रेतीस व तो भेटले असतां साक्रेतिसानें त्याशीं प्रथम अशा चातुर्यानें व अशा खुबीनें भाषण केलें कीं, त्यानें आपण काय म्हणतों हें ऐकण्यास ग्लाकोस गुंतविलें असतां, तो त्याचें भाषण ऐकावयास उभा राहिला, हीच मोठी गोष्ट त्यानें मिळविली. मग साक्रेतीस म्हणाला, का ग्लाको, ह्या आपल्या लोकसत्ताक राज्याचा कारभार चालवावा अशी तुम्हांस मोठी इच्छा आहे म्हणून मी ऐकतों. ग्लाकोनें उत्तर दिलें, होय. आहे खरी. साक्रेतीस म्हणाला, वाहवा! हा तुमचा हेतु फारच उत्कृष्ट आहे! ह्यापेक्षां उत्कृष्ट उद्देश दुसरा उरलाच नाहीं. कां कीं, तुमचा हा हेतु सिद्धीस गेल्यास तुम्हांला आपल्या मित्रांचें कल्याण करण्याची, आपल्या कुलाचा नांवलौकिक वाढविण्याची, व आपल्या देशाची मर्यादा वाढविण्याची शक्ति येईल; आणि तुम्ही ह्या योगानें केवळ ह्या लहानशा अथेन्स शहरांतच विख्यात व्हाल असें नाहीं, तर सर्व ग्रीस देशांत विख्यात व्हाल; आणि कदाचित् थिमिस्तक्लिसाच्यासारखी तुमची कीर्ति इतर देशींच्या अडाणी लोकांतहि पसरेल.

सारांश, तुम्ही कोठें कां असा ना, तुम्ही आपल्या गुणांनीं असें कराल कीं, सर्व जग तुमचा सन्मान ठेवील, व तुमची वाहवा करील.

ग्लाको हा उमेदवारच होता. त्यास हें कोमल व मनोरंजक भाषण फारच गोड लागलें; परंतु साक्रेतिसानें आपणांस बोलण्यांत पकडलें, हें त्यांस कळलें नाहीं. मग तो आग्रह करून घेतल्यावांचून संतोषानें उभा राहिला, आणि साक्रेतिसाचें व त्याचें संभाषण पुढें चाललें. साक्रेतीस पुढें म्हणाला, बरें ग्लाको, प्रतिष्ठा मिळवावी व थोरपणा मिळवावा अशी तुमची इच्छा आहे, त्या पक्षीं आपण लोकांच्या उपयोगीं पडावें, असा तुमचा उद्देश निःसंशय असेलच. ग्लाकोनें उत्तर दिलें, होय; तो उद्देश आहे, ह्यांत काय संशय? साक्रेतीस म्हणाला, ग्लाको, तुम्हांस देवाची शपथ आहे, मला एवढें कृपा करून सांगा कीं, ह्या संस्थानच्या लोकांच्या उपयोगीं पडण्यासाठीं तुम्ही प्रथम कोणती गोष्ट करणार? तो घुटमळला; व आतां उत्तर काय द्यावें, ह्याचें मनन करीत आहेसें पाहून, साक्रेतीस आपणच पुढें बोलूं लागला, ग्लाको, मला वाटतें कीं, हें संस्थान गबर करावें, म्हणजे येथील जमाबंदी वाढवावी, असा तुमचा उद्देश असेल नाहीं बरें? ग्लाको म्हणाला, तुम्ही माझ्या मनांतलीच गोष्ट बोललां. साक्रेतीस म्हाणाला, तर मग ह्या संस्थानांतल्या जमाबंदीच्या कामांत तुम्ही चांगले हुशार असालच व तिचा एकंदरीचा आकार तुम्हांस पुरतेपणीं माहीत असेलच? पूर्वी न कळून आलेल्या एखाद्या कारणानें कांहीं एखाद्या खात्यांतील पैसा उत्पन्न व्हावयाचा असल्यास, त्यामुळें पडलेली खांच दुसऱ्या कांहीं उपायानें पैसा उभा करून आपणांस भरतां यावी, म्हणून आतां सांगितलेल्या गोष्टीचा विशेषेंकरून अभ्यास करावयास चुकलां नसालच? कसें काय, बरें ग्लाको? ग्लाको म्हणाला, ही गोष्ट बाबा माझ्या मनांत आजपर्यंत कधींच आली नाहीं. साक्रेतीस म्हणाला, बरें, ह्या संस्थानांतील एकंदर खर्च तरी निदानपक्ष तुम्हांस ठाऊक असेल; कां कीं, निष्कारण जे खर्च आहेत, जे केल्यावांचून अडचण पडणार नाहीं, ते तोडल्यापासून कोणता फायदा होतो, हें राज्यकारभार करणारास समजणें आवश्यक आहे. ग्लाको म्हणाला, पहिली गोष्ट जशी मला माहीत नाहीं, तशी हीहि गोष्ट मला माहीत नाहीं, असें मी आपलें अज्ञान पतकरतों. साक्रेतीस म्हणाला, बरें तर मग हें संस्थान गबर करण्याचा बेत तुम्हांस कांहीं काळपर्यंत तहकूब ठेविला पाहिजे; कां कीं, त्याची जमा किती व खर्च किती हें तुम्हांस माहीत झाल्यावांचून तुमच्या हातून तो बेत तडीस जाणें अशक्य आहे.

ग्लाको म्हणाला, परंतु तो उद्देश सिद्धीस नेण्याचा आणखी एक मार्ग आहे; त्याचा तुम्हीं अद्यापि उल्लेख केला नाहीं. संस्थानच्या शत्रूंच्या नाशानेंहि तें गबर करतां येतें ना ? साक्रेतीस बोलला, तुम्ही म्हणतां हें वास्तविक आहे; परंतु ती गोष्ट संस्थानच्या प्रबलतेवर आहे: तें जर दुर्बल असलें, तर लढाईनें, त्याजजवळ जी काय संपत्ति असेल ती गमावून तें संकटांत मात्र पडेल. ह्याकरितां, लढाई करावी म्हणून जो इच्छितो, त्यास, आपली फौज किती आहे, हें जाणणें आवश्यक आहे. आपला पक्ष प्रबळ दिसल्यास त्यानें लढाई करण्याची मसलत बेधडक द्यावी; आणि तो जर दुर्बल दिसला, तर त्यानें बुद्धिवाद सांगून लोकांचीं मनें लढाई करण्यापासून फिरवावीं. बरें, ग्लाको, तुम्हांस आपलें व आपल्या शत्रूंचें जलमार्गानें व स्थलमार्गानें किती बल आहे हें ठाऊक आहे काय ? दोहींकडील, म्हणजे जमिनीवरील व समुद्रावरील सैन्यें किती आहेत व कशीं आहेत, ह्याचा लेख तुम्हांपाशीं आहे काय ? असला तर मला कृपा करून दाखवा बरें. ग्लाको म्हणाला, सध्यां तो मजपाशीं नाहीं. साक्रेतीस उत्तर करितो, बरें तर, मला असें दिसतें कीं, आज जर तुमच्या गळ्यांत सर्व राज्यकारभार घातला, तर तुम्हांस शत्रूंशीं लढाई करवणार नाहीं; कां कीं, ती करावी किंवा न करावी ह्याचा निश्चय करण्यासाठीं अगोदर तुम्हांस श्रम करून बहुत गोष्टींचा शोध केला पाहिजे. ह्याप्रमाणें ग्लाकोस अगदीं माहीत नाहींत, अशीं आणखी कितीएक कलमें साक्रेतिसानें त्यास पुसलीं. शेवटीं साक्रेतिसानें त्याजकडून असें कबूल करविलें कीं, जे लोक लोकांच्या उपयोगीं पडण्याची आपल्या अंगीं कांहींच तयारी न करितां, आपली लोकांत मोठी प्रतिष्ठा असावी, व आपणांस मोठमोठ्या जागा मिळाव्या व आपण उंच पदवीस चढावें, ह्याविषयीं अनिवार इच्छा करून विचार न करितां राज्यकारभारांत शिरतात, ते लोक अत्यंत उपहासास्पद होतात. साक्रेतीस ह्यानें त्यास सरतेशेवटीं असा उपदेश केला कीं, ग्लाको, तुम्हांवर माझी ममता फार आहे म्हणून सांगतों. जपा बरें, नाहीं तर प्रतिष्ठा मिळविण्याच्या इच्छेनें वेडे होऊन भलतेंच काम हातीं घ्याल; आणि त्यांतच तुमची कोती बुद्धि उजेडास येऊन तुमची लोकांत अप्रतिष्ठा मात्र होईल !

ग्लाको साक्रेतिसाच्या बुद्धिवादानें शहाणा झाला, आणि त्यानें सर्व विवक्षित गोष्टी समजून घेऊन तो मग दिवाणदरबारांत वागूं लागला. हा उपदेश सर्वांस सर्वकाळ लागू आहे. जो ग्लाकोसारखा राज्यांतील मुख्य मनुष्य होऊं इच्छित असेल, त्यासच नाहीं, तर संसारांतील गरिबी, श्रीमंती वगैरे सर्व

अवस्थांतील मनुष्यांस, व लहानमोठ्या सर्व अधिकारांच्या मनुष्यांस उपयोगीं पडावयाजोगा आहे.

साक्रेतीस आपल्या मित्रांस लहानपणीं सरकारी उद्योग धरण्यास कधीं सांगत नसे. तर उद्योगांत आपणांस यश येण्यास जें ज्ञान जरूर आहे त्याचें संपादन करण्यासाठीं प्रथमतः श्रम करावयास तो नेहमीं त्यांस सांगत असे. त्याचें म्हणणें असें असे कीं, गुरूच्या साह्यावांचून शिल्पांतील साधारण कला देखील येत नाहींत; मग जें ज्ञान प्राप्त झालें असतां मानवी ज्ञानाचा कळस झाला, असें जें राज्य चालविण्याचें ज्ञान, तें अंगीं यावयास पूर्वी कांहींहि श्रम व व्यासंग करावयास नको, असें ज्या मनुष्यास वाटतें त्या मनुष्यास किती बरें मूर्ख समजावें ? जे लोक सरकारी काम करण्याची उमेद धरितात, त्यांचीं सर्व कृत्यें न्याय व प्रामाणिकपणा एतन्मूलक असावीं, अशी आपल्या ऐकणारांची खात्री व्हावी म्हणून तो फार झटे; तसेंच स्वदेशावर प्रीति, लोककल्याण करण्याची पराकाष्ठेची हौस, व देव परम दयाळू व परम समर्थ आहेत अशी पूर्ण श्रद्धा, हीं विशेषतः त्यांच्या मनांत भरवून देण्यासाठीं तो मनस्वी यत्न करी. कारण त्याचें मत असें होतें कीं, हे वर सांगितलेले गुण जर मनुष्याच्या अंगीं नाहींत, तर इतर गुण जसजसे त्याच्या ठायीं येतात, तसतसा तो अधिकाधिक दुष्ट होत जातो. युथिदीमस व साक्रेतीस ह्या दोघांचा, देवांनीं ह्या जगाची जी व्यवस्था केली आहे तीविषयीं जो संवाद झाला, तो पुढील लोकांस कळावयासाठीं जेनोफनानें ग्रंथांत लिहून ठेविला आहे. त्या संवादाची, प्राचीन काळचे उत्तम उत्तम जे लेख आहेत, त्यांत गणना केली आहे. तो संवाद येणेंप्रमाणें:--

साक्रेतीस युथिदीमसास म्हणतो कीं, मनुष्याचें ज्या गोष्टीवांचून चालत नाहीं, अशा गोष्टींची देवांनीं तरतूद किती काळजीनें करून ठेविली आहे, त्याचा तुम्ही कधीं विचार केला आहे काय ? युथिदीमस म्हणतो, नाहीं, कधीं केला नाहीं. साक्रेतीस म्हणतो, उजेड हा प्राण्यास किती आवश्यक आहे! पहा बरें, विचार केला असतां देवांची ही देणगी किती अमोलिक आहे! युथिदीमस हें ऐकून म्हणतो, उजेड नसता तर आम्हांस डोळे असून नसून सारखेंच झालें असतें, व ही सर्व सृष्टि असूनहि नाहींसारखी झाली असती. आपणांस मध्यें मध्यें विश्रांति पाहिजे म्हणून त्यांनीं रात्रीहि केल्या आहेत. साक्रेतीस म्हणतो, तुम्ही म्हणतां हें बरोबर आहे; आणि ह्याचकरितां

आपण त्यांची स्तुति करावी व त्यांचा आभार मानावा. त्यांनीं तेजःपुंज सूर्य केला आहे, त्याच्या योगें दिवस होतो व दिवसाचे निराळे भाग आपणांस समजतात; व त्यांनीं असा नियम केला आहे कीं, सूर्याच्या प्रकाशानें सृष्टींतील सर्व चमत्कार प्राण्यांच्या दृष्टीस पडावे, व त्याच्या योगानें त्यास उष्णता प्राप्त होऊन त्यांचें प्राणधारणहि व्हावें. त्यांच्याच सत्तेनें, निष्प्रभ असा जो चंद्र तो व सर्व तारे रात्रीं प्रकाशित होतात. अहो! रात्र-दिवस, उजेड-अंधार, श्रम-विश्रांति इत्यादि द्वंद्वें उत्पन्न करून त्यांनीं सृष्टींत जें वैचित्र्य केलें आहे, त्यापेक्षां चमत्कारास्पद दुसरें कांहीं आहे काय? आणि हें सर्व मनुष्यांच्या सुखार्थ व कल्याणार्थ केलें आहे. नंतर अग्नि व पाणी ह्यांपासून संसारांतील जीं आपलीं असंख्य कामें होतात, त्यांपैकीं पुष्कळ साक्रेतिसानें युथिदीमसास सांगितलीं; आणि माणसाचा संबंध ज्या ज्या गोष्टींत आहे, त्या सर्व गोष्टींनीं त्यास सुख व्हावें, ह्याविषयीं देवांचें फार चमत्कारिक लक्ष आहे, असा विचार करीत होत्साता त्यानें युथिदीमसाशीं संभाषण पुढें चालविलें. अहो! हिवाळ्यानंतर सूर्य उत्तरेकडे येतो, व मागल्या ऋतूंतलीं फळें वाळून व कुजून गेलीं असतात, त्यांच्या जागीं नवीं फळें पिकवितो; आणि हें काम केल्यावर तो जर तसाच उत्तरेस राहिला, तर आपणास त्याच्या उष्णतेपासून उपद्रव होईल म्हणून तो पुनः दक्षिणेस परत जातो. परंतु दक्षिणेस एक मर्यादा आहे, तिच्या पलीकडे तो गेल्यास आपण उत्तरेकडील लोक थंडीनें मरून जाऊं; परंतु तो अनर्थ आपणास प्राप्त होऊं नये म्हणून तो त्या मर्यादेपर्यंत पोहोंचला म्हणजे मात्क्यान् उत्तरेकडे वळतो. असा तो आकाशांत-जेथें असल्यानें जीवास त्यापासून पीडा व्हावयाची नाहीं अशा जागीं फिरतो. ह्या सर्व गोष्टी पाहून तुम्हास काय बरें वाटतें? देव अत्यंत कृपाळू आहेत, असें वाटत नाहीं काय? दुसरें असें कीं, आपण थंडींतून उष्णतेंत किंवा उष्णतेंतून थंडींत जर एकदम गेलों तर त्यांतून एकहि आपणांस सहन करवणार नाहीं. आपली प्रकृति बिघडेल, म्हणून सूर्य आपणांकडे येतांना व आपणांकडून जातांना इतका हळू हळू चालतो कीं, होत होत पराकाष्ठेची उष्णता झाली, किंवा पडत पडत पराकाष्ठेची थंडी पडली, तरी ती बहुतकरून आपणांस कळून येत नाहीं, हें पाहून तुम्हांस मोठी मौज वाटत नाहीं काय? ऋतूंच्या व्यवस्थेवरून, परम कृपाळू व सृष्टि चालविणारे जे देव ते मनुष्यांच्या कल्याणास फार सावध आहेत, असें कोणाच्या मनांत आल्यावांचून राहील काय?

युथिदीमस म्हणतो, तुम्हीं ह्या ज्या सर्व गोष्टी सांगितल्या, त्यांवरून; मनुष्यांवर अनुग्रह करून त्यांचें कल्याण करण्याखेरीज देवांस दुसरा उद्योगच कांहीं नाहीं, असें मला वाटतें. देव मनुष्याविषयीं फार दयाळू आहेत, ह्याविषयीं माझी पक्की खात्री झाली; परंतु एका गोष्टींत माझी बुद्धि अगदीं शिरत नाहीं, कुंठित होते. ती गोष्ट अशी कीं, मनुष्यें ज्या सुखाचा अनुभव घेतात, तीं सुखें पशूंसहि आहेत, ह्यावरून, मनुष्येंच देवांचीं आवडतीं आहेत, असें वाटत नाहीं. साक्रेतीस बोलला, होय; पशु प्रायः सर्व सुखांचा अनुभव घेतात हें खरें; परंतु पशु मुळीं मनुष्यांच्याच उपयोगीं पडावयासाठीं केले आहेत, ही गोष्ट तुमच्या मनांत येत नाहीं काय? जनावरांत अत्यंत बळकट जीं जनावरें आहेत, त्यांस देखील मनुष्यें आपल्या सत्तेंत आणितात; आणि त्यास लढाईच्या, शेतकीच्या व संसारांतील दुसऱ्या अनेक प्रकारच्या कामांस लावून आपलें हित करून घेतात.

अहो, सर्व सृष्टीची गोष्ट नको, केवळ मनुष्यांचाच विचार करून पाहिलें तर पुरे. त्यांच्या शरीराची रचना देवांनीं किती कौशल्यानें केली आहे; व मनुष्यांचीं इंद्रियें–ज्यांच्या योगानें त्यांस सृष्टींतील पदार्थ समजतात, व उत्कृष्ट उत्कृष्ट वस्तूंचा उपभोग घेतां येतो; त्यांचें मन–जें आपल्या कल्पनांनीं प्रतिसृष्टि क्षणांत उभी करितें; त्यांची बुद्धि जिच्या योगानें तीं सर्व प्राण्यांपेक्षां अशा उंच पदवीस चढलीं आहेत कीं, ती पदवी किती उंच ह्याचा ठिकाण सुद्धां तुम्हांस लागत नाहीं; व चमत्कारिक वाक्शक्ति–जिच्या योगानें त्यांस आपापले अभिप्राय परस्परांस कळवितां येतात, कायदे करितां येतात, इत्यादि सर्व गोष्टींचा विचार असाच आहे.

शेवटीं त्यानें असा सिद्धांत केला आहे कीं, ह्या सर्व विचारांच्या अंतीं, देव आहेत व त्यांचें लक्ष विशेषेंकरून मनुष्यांकडे आहे, असें स्पष्ट दिसतें. आतां, देव आपल्या इंद्रियांस प्रत्यक्ष होत नाहींत, अशी कोणी शंका करील; पण त्या शंकेंत कांहीं जीव नाहीं. कां कीं, वाटेंत जें जें येईल त्यांस मोडून टाकणारा जो वारा, तो आपणांस दिसत नाहीं; पण तो नाहींसा झाला कीं काय? दूरचा दृष्टांत नको; आपला आत्मा–ज्यापेक्षां आपणांस दुसरें कोणतेंहि विशेष अंतरंग नाहीं, तो तरी आपल्या इंद्रियांस कोठें प्रत्यक्ष आहे? तो आपणांस दिसतो काय? देवांचीहि गोष्ट अशीच आहे. त्यांतील एकहि देव प्रसाद करीत असतां आपणांस दिसत नाहीं. ज्याचे सर्व भाग परस्परांशीं मिलाफ पावून मनुष्यास

सुख व्हावें अशा बेतानें केले आहेत, असें जें हें विश्व, तें त्या परमेश्वरानें रचिलें व त्याचा संभाळहि तोच करितो. ह्या स्थलीं रोलिनसाहेब असें म्हणतो कीं, येथें 'परमेश्वरानें' हा शब्द विचार करण्याजोगा आहे. ह्या शब्दावरून, एक सर्वोत्तम देव आहे, तो सर्व प्राण्यांचा कर्ता व इतर सर्व देवांपेक्षां श्रेष्ठ व इतर सर्व देव त्या मुख्य देवाचे अज्ञाधारक आहेत, असें साक्रेतिसाचें मत होतें, असें दिसतें. तो परमेश्वरच आपल्या सत्तेनें सर्व स्थावर जंगम पदार्थांस आपापलें काम करण्यास समर्थ राखून, ते कदापि न चुकतां त्वरेनें आपल्या आज्ञेप्रमाणें वागतील असें करितो, आणि ती त्वरा अशी कीं, ज्या त्वरेची आपणां जीवांस कल्पना देखील करतां यावयाची नाहीं, ह्या परमेश्वरानें आपल्या असंख्यात चमत्कारिक कामांवरून आपणांस पुरतेपणीं दृश्य करून ठेविलें आहे; परंतु तो साक्षात् म्हटला म्हणजे कोणासहि दिसावयाचा नाहीं. तस्मात्, पदार्थ आपणांस दिसत नाहीं म्हणून तो मुळींच नाहीं असें आपण म्हणूं नये. चर्मचक्षूंनीं जें दिसत नाहीं, तें आपल्या बुद्धिरूप नेत्रांनीं पहावें. चर्मचक्षूंनीं आपणांस कांहीं वस्तु दिसत नाहींत, म्हणून आपल्या ठायीं जी न्यूनता आहे, ती आपण ज्ञानचक्षूंनीं त्या वस्तु पाहून पूर्ण करावी. व परमेश्वराची पूजा करणें व त्यास सन्मान देणें हा आपणां जीवांचा धर्म होय, म्हणून मुख्यत्वेंकरून आपण सर्वांनीं ती गोष्ट शिकावी. त्या परमेश्वराची इच्छाच अशी दिसते कीं, आपणांवर तो जे उपकार करितो त्यांच्या द्वारांच आपण त्यास जाणावें, इंद्रियादिकें करून जाणण्याच्या भरीस पडूं नये. आतां, परमेश्वराची पूजा करावी म्हणून लिहिलें, ती पूजा हीच कीं, त्यास संतुष्ट करावें. त्यास संतुष्ट करण्याचा मार्ग एकच आहे. तो हा कीं, त्याच्या आज्ञेप्रमाणें वागावें.

साक्रेतीस अथेन्स शहरांतील मुलांस जें शिकवी, तें असें शिकवी; व त्यांच्या मनांत तो ज्या गोष्टी व जीं मतें भरवीत असे, तीं हींच. त्याचे मुख्य सिद्धांत दोन होते. एक हा कीं, कायदे व अंमलदारांचे हुकूम हे शिरसा मानावे; ह्यांत तो न्यायीपणाचा अंतर्भाव करी; आणि दुसरा सिद्धांत असा कीं, परमेश्वराकडे पूर्ण लक्ष, असा ह्यांतच सर्व धर्म आला. ज्या गोष्टी मनुष्यांच्या बुद्धीच्या आटोक्यांत नाहींत, त्यांविषयीं देवांचा ऽ अभिप्राय

ऽ प्राचीन ग्रीक लोकांची अशी समजूत असे कीं, देव आपल्या भक्तांस अनेक प्रकारांनीं पुढील गोष्टी सुचवितात. देलफाय वगैरे कितीएक देवळांत

ध्यावा. दुसरीं लक्षावधि कामें असलीं तरी तीं सर्व एकीकडे ठेवून त्यांस यथाशास्त्र व विचारपूर्वक अशा आपल्या आचरणानें प्रसन्न करण्यास झटावें हें फार कल्याणकारक आहे, म्हणून तो सर्वदा सांगे. तो म्हणे कीं, देव स्वतंत्र आहेत, ते कोणाचे परतंत्र नाहींत; ह्याकरितां, आपण जें त्यांच्यापाशीं मागतों, तें देणें त्यांच्या मर्जीवर आहे. मर्जीस आल्यास देतात; किंवा आपल्या मूर्ख-पणानें, आज अमुक घडूं नये म्हणून आपणांस वाटत असतें, तें ते घडवितात. तो एका प्रार्थनेचा पाठ करीत असे. ती प्रार्थना त्यानें एका कवीच्या ग्रंथांतून घेतली होती. त्या कवीचें नांव हल्लीं प्रसिद्ध नाहीं. ती प्रार्थना येणेंप्रमाणें होतीः—" हे परमेश्वरा, आम्ही तुजपाशीं हें सांगतों कीं, ज्या गोष्टींत आमचें कल्याण आहे, त्या गोष्टींची वांछा आम्हांस असो किंवा नसो, त्या गोष्टी तूं आम्हांस दे; व ज्या गोष्टींत आमचें अकल्याण आहे, त्या गोष्टी जरी आम्ही तुजपाशी मागत असलों, तरी त्या तूं आम्हां-पासून दूर कर. " त्या वेळच्या अज्ञाणी लोकांस वाटत असे कीं, देव कांहीं गोष्टींकडे लक्ष देतात, व कांहीं गोष्टींकडे लक्ष देत नाहींत; पण साक्रेतिसाचा आपल्या विद्यार्थ्यांस असा पूर्ण उपदेश असे कीं, देवांचें लक्ष आपल्या कृत्यां-कडे व सर्व शब्दांकडे आहे. अत्यंत गुप्त ज्या आपल्या कल्पना, त्यासुद्धां त्यांस समजतात; व आपण कोणताहि विचार करूं लागलों असतां ते आपल्या सन्निध असतात; आणि आपण कोणतेंहि कृत्य करूं लागलों असतां तें चांगलें करण्याविषयीं ते आपणांस प्रेरणा करितात.

---

पुजाऱ्यांच्या अंगांत देव येऊन ते पुढील होणाऱ्या गोष्टी सांगतात, असा त्या लोकांचा ग्रह होता. तसेंच, देवांस बळी दिलेल्या पशूंचीं आंतडीं पाहून त्यांवरून पुढील शुभाशुभ गोष्टी कळतात, असें ते मानीत. तसेंच, श्रद्धावान् लोकांस स्वप्नांत येऊन देव भावी गोष्टी सांगतात, असें ते समजत. ह्या प्रकारच्या अनेक वेड्या समजुती त्या लोकांत होत्या; व साक्रेतीस, प्लेटो ह्यांसारख्या त्या वेळच्या महान् महान् बुद्धिमान् लोकांस सुद्धां त्या गोष्टी कितीएक अंशीं खऱ्या वाटत असत.

# अध्याय पांचवा.

**सोफिस्त * मोठे ज्ञाते आहेत अशी अथेन्स शहरांतील मुलांच्या मनांतील बुद्धि साक्रेतिसानें काढून टाकिली, हा विषय या अध्यायांत आहे.**

ग्रीस देशांतील लोकांस कांहीं भलती व भलत्या विषयांवर विचार करण्याची रुचि लागली होती, व त्या विषयाची माहिती असण्यांत प्रतिष्ठा वाटत असे. ती वाईट रुचि मुलांस लागूं नये म्हणून कांहीं उपाय करणें साक्रेतिसास फार आवश्यक वाटल्यावरून त्यास पुढील कृत्य करणें भाग पडलें. साक्रेतिसाच्या वेळेस व त्याच्या अगोदर कांहीं काळ 'सोफिस्त' ह्या नांवानें कांहीं पंडित उत्कर्ष पावले होते. ते गर्विष्ठ असत; व पिताकस, वेश्यास, थेलीस इत्यादिप्रभृति जे ग्रीसांत परम विख्यात पुरुष होऊन गेले, त्यांत ते आपली गणती करीत; परंतु आचरणावरून पाहिलें असतां, त्यांत आणि ह्यांत जमीनअस्मानाचें अंतर होतें. कां कीं, ते लोकांतील थोरपणाची इच्छा व धनलोभ हीं दूर टाकून आपला वेळ मुख्यत्वेंकरून ज्ञान संपादन करण्यांत घालवीत; तसें हे करीत नसत. हे फार लोभी व लोकप्रतिष्ठेच्छु होते. हे प्रपंचांतील सर्व कृत्यें करीत; व पुष्कळ कुलंगडींहि जवळ बाळगीत. ह्यांनीं आपल्या विद्येचा उदीम माडला होता. हे शहरोशहरीं फिरत. कोठें गेलें म्हणजे, जें पाहिजे तें सांगणारे अमुक अमुक मोठे पंडित आले आहेत, असा डांगोरा तेथें पिटवीत; व शिष्यांच्या झुंडी बरोबर घेऊन वाटेनें चालत. ते शिष्य भुलून गेल्यासारखें आपल्या अभिमानी गुरूंच्या मागें फिरण्याकरितां आपले आईबाप सोडीत, व शिकविण्याबद्दल त्यांस बहुत पैसा देत. ज्यांत हे गुरु बाणा बाळगीत नसत अशी एकहि विद्या नव्हती. ईश्वरविषयक विद्या, वैद्यशास्त्र, गणितविद्या, ज्योतिःशास्त्र, व्याकरण, गायनशास्त्र, अलंकारशास्त्र, इतिहास ह्या सर्वांची आम्हांस पूर्ण माहिती आहे

---

* सोफिस्त ह्या शब्दाचा अर्थ ज्ञाता असा आहे. परंतु साक्रेतीस ह्याची नवीन शाळा झाली; आणि नवीन मत व प्राचीन मत ह्यांचा सर्वदा विरोध असतोच. त्यामुळें साक्रेतिसाचे प्लेतो वगैरे विद्यार्थी जगद्विख्यात होऊन त्यांचे ग्रंथ सर्वत्र मान्य झाले, त्या ग्रंथांत सोफिस्तांची निंदा आहे, त्यावरून हल्लीं सोफिस्त म्हणजे विद्येचें ढोंग करणारा, ढोंगी, कुतर्कवादी असा अर्थ झाला आहे.

असें ते म्हणत. इतर सर्व गोष्टींपेक्षां युक्तिबळानें कोणत्याहि वस्तूच्या तत्त्वाचा शोध काढण्यांत व सालंकार सुंदर भाषण करण्यांत ते ब्रीद मानीत असत. ते आपणांस सर्वज्ञ व सर्व शिकविण्यास समर्थ लेखीत. त्यांपैकीं बहुतेक, कोणी कसाहि प्रश्न केल्यास त्याचे धाडदिशीं उत्तर देत; आणि तेवढ्यावरच आपणांस थोर मानीत. जे मुलगे त्यांचे शिष्य होते, त्यांस त्यांच्या उपदेशांनीं दुसरें कांहींएक प्राप्त होत नसे; आपण थोर, व इतर सर्व लोक कवडीचा माल, अशी मूर्ख समजूत मात्र त्यांच्या डोक्यांत शिरे. ह्यामुळें असें होई कीं, विद्यार्थी जेव्हां शाळेंत येई, तेव्हांपेक्षां दांडगा झाल्यावांचून तो ह्यांच्या शाळेंतून गेला असें कधीं होत नसे.

हे जे गर्विष्ठ उपदेश, तें त्यांचें शब्दपांडित्य आहे व हे ज्या युक्ति सांगतात त्यांत दोष आहेत, असें अथेन्स शहरांतील मुलांस समजून देणें हें आवश्यक आहे, असें साक्रेतिसास वाटलें. त्यांच्या समोरासमोर बसून कोटी-वर प्रतिकोटी अशा रीतीनें त्यांशीं विप्रतिपत्ति करण्यास साक्रेतीस समर्थ होता. कां कीं, वक्तृत्वशक्ति व तर्कानें तत्त्व शोधून काढण्याची शक्ति, ह्या ईश्वरानें त्याच्या ठायीं पूर्ण ठेविल्या होत्या; परंतु ते मोठे वक्ते असत, व आपल्या प्रौढ वाक्चातुर्यानें श्रोत्यांस थक्क करून टाकावें, हाच त्यांचा मुख्य उद्देश असे. ह्यास्तव त्यांशीं उघड वादविवाद करणें हा त्यांचा पराजय करण्याचा मार्ग साक्रेतिसास नीट वाटला नाहीं; ह्याकरितां त्यानें दुसरा प्रकार काढला. त्यानें आपलें वास्तविक रूप झांकून टाकिलें, व अज्ञान्याचें सोंग घेऊन भोळसरपणाची मुद्रा दाखवून आपल्या अंगची उत्कृष्ट व तीक्ष्ण बुद्धि लपविण्याचा बेत केला. ज्या ईश्वरानें त्यास इतकी लोकोत्तर बुद्धि दिली होती, त्यानेंच प्रस्तुत ह्या सोंगाची बतावणी करितां यावयाजोगा त्याचा आकारहि घडविला होता. तो फार कुरूप होता; व ह्याखेरीज, त्यास कोणी पाहिलें असतां, हा फार मूर्ख आहे असें पाहणारांस वाटावें, असा त्याच्या तोंडवळ्याचाच गुण असे. त्याच्या शरीराची ठेवण तरी चांगली असावयाची होती! पण तीहि त्याच्या चेहऱ्यास जमावयाजोगीच अगदीं भिकारवाणी वाईट होती.

सोफिस्तांपैकीं एखाद्याची व साक्रेतिसाची गांठ पडली असतां, साक्रेतिसानें आपण बोलतों हें बरोबर आहे किंवा नाहीं कोण जाणें असा आपला साशंकपणा आपल्या मुद्रेनें न बोलण्याच्या स्वरानें दाखवून मोठ्या विनयानें मला अमुक विषयावर कांहीं शंका आपणांस पुसून घ्यावयाच्या आहेत, असें त्यास सांगून

त्यांस सोप्या विषयावर सोपे प्रश्न करावे व बोलण्यांत शिंप्याच्या, सोनाराच्या वगैरे अत्यंत हलक्या धंद्यांतील दाखले घेऊन व क्षुल्लक उपमा देऊन, दुसऱ्याच्या रीतीनें आपल्या मनांतील अर्थ आपणांस स्पष्ट करून दाखवितां येत नाहीं, असें त्यानें दर्शवावें. सोफिस्तानें अप्रयोजक व वडबडीसारखें त्याचें बोलणें तिरस्कारानें ऐकून त्यांवर बरोबर उत्तर न देतां आपल्या नेहमींच्या घोकीव घोकीव गोष्टी बोलून खूप बडबड करावी. त्यानें न रागवावें म्हणून साक्रेतिसानें त्यास पुष्कळ वाखाणून त्याची अशी प्रार्थना करावी कीं, पंडितबाबा, कृपा करून माझ्या अल्प बुद्धीनें कळावयाजोगें भाषण करून माझ्या शंकांचें समाधान करावें. कां कीं, महाराज, आपल्या सूक्ष्म व प्रौढ कोट्यांचें आकलन करावयाजोगी मला बुद्धि नाहीं; व त्या ध्यानांत धरावयाजोगी स्मृतिहि नाहीं. प्रश्न करण्यांत व उत्तरें देण्यांत मात्र माझी अक्कल चालते, ह्याबाहेर चालत नाहीं.

अशी गोष्ट भरसभेंत झाल्यावर त्या पंडितास मागें घेववत नसे. पोकळ शब्दपांडित्य करून धूर्तता करणें हा त्या सोफिस्तांस आपल्या अब्रूचा बचाव करण्यास मोठा आडोसा असे. तो आडोसा त्यांजकडून टाकवून त्यांस साक्रेतिसानें आपल्या प्रश्नांचीं थोडक्या शब्दांत उत्तरें द्यावयास लावावें; आणि मग असें म्हटलें असतां असें मानावें लागतें, ह्याप्रमाणें एकावरून दुसऱ्यावर, व दुसऱ्यावरून तिसऱ्यावर, असें नेत नेत ह्यानें त्यांस अत्यंत अयुक्तिक सिद्धांतांत नेऊन घालावें, व शेवटीं त्यांस मुकाट्यानें बसणें किंवा आपल्या तोंडानेंच आपलें मत खोडणें भाग पाडावें; शेवटीं, हे पंडितबावा मज मंदबुद्धीचें अज्ञान दूर करीत नाहींत म्हणून आपणच खेद करावा. साक्रेतीस ह्याप्रमाणें हलकेपणा आपणाकडे घेई; तरी त्या पंडिताभोंवतालीं जी उमेदवार मंडळी बसली असे, ती त्या आपल्या गुरूचें मौर्ख्य पाही; आणि हा मोठा विद्वान् आहे, अशी जी त्याविषयीं त्यांची समजूत असे, ती जाऊन त्याचा ते तिरस्कार करूं लागत. ह्याप्रमाणें कांहीं दिवस होतां होतां पुढें ग्रीसांत सोफिस्त हें नांव निंदाबोधक व उपहासास्पद झालें.

ही गोष्ट सर्वांच्या मनांत सहज यावयाजोगी आहे कीं, सोफिस्ताच्या योग्यतेचे मनुष्य, ज्यांची थोर लोकांत मोठी मान्यता होती, व जे अथेन्स शहरांतील उमेदवारांत मोठी विद्वत्ता मिरवीत असत, व ज्यांची बुद्धीविषयीं व विद्येविषयीं बहुत दिवस विख्याति होती, त्यांवर कोणी तुटून पडून त्यांचा पराजय करणें मोठें कठिण काम होतें.

साक्रेतीस तर विशेषेंकरून त्यांच्या कीर्तीवर व हितावर उठला होता. त्यांचे दुर्गुण व दुराचरणें उघाडीस आणण्याकरितां व त्यांचें पोकळ पांडित्य कवडीचा माल करण्याकरितां साक्रेतिसानें प्रयत्न केल्यानें, अत्यंत दीर्घद्वेषी पुरुषांपासून जितका नाश होण्याचा संभव आहे, तितका साक्रेतिसाचा नाश, त्या उन्मत्त व दुराचारी सोफिस्तांपासून × झाला. तो नाश कोणता व कसा झाला, त्याचें निरूपण आम्ही पुढील अध्यायांत करूं.

---

× या अध्यायांत सोफिस्तांचें जें वर्णन केलें आहे, तें सोलिनसाहेबाच्या ग्रंथाच्या आधारावरून केलें आहे. बहुत काळपर्यंत, ह्या अध्यायांत लिहिल्याप्रमाणेंच सोफिस्तांविषयीं सर्व ग्रंथकारांची समजूत होती; परंतु अलीकडे कांहीं वर्षांपासून प्राचीनकाळच्या इतिहासाविषयीं विशेष विचार होऊन अर्वाचीन युरोपियन ग्रंथकारांचीं मतें कितीएक गोष्टींविषयीं निराळीं झालीं आहेत; व तीं आमच्या वाचकांस समजावीं, ह्या बुद्धीनें तीं संक्षेपानें ह्या टीपेंत लिहितों. अलीकडे कांहीं वर्षांपूर्वीं ग्रोत नामक महाविद्वान् ग्रंथकारानें ग्रीस देशचा इतिहास इंग्रजींत लिहिला आहे; त्यांत तो असें लिहितो कीं, सोफिस्तांची निंदा करण्याची जी रीत पडली आहे, तीस प्राचीन ग्रंथांचा किंवा युक्तीचा योग्य आधार आहे, असें समजूं नये, सोफिस्तांविषयीं आपणास जी माहिती आहे, ती प्लेतोच्या ग्रंथांवरून मुख्यत्वेंकरून आहे; व प्लेतोचीं बहुत मतें त्या वेळच्या दुसऱ्या विद्वान् लोकांच्या ( सोफिस्तांच्या ) मतांहून निराळीं असल्यामुळें, त्यांचें व विद्वान् लोकांचें शत्रुत्व होतें. तेव्हां त्या प्लेतोच्या ग्रंथांवरून त्या सोफिस्तांस वाईट म्हणणें योग्य नाहीं.

प्लेतो त्यांस मुख्य दोष हा लावतो कीं, ते पैसा घेऊन शिकवीत असत; व त्यांस लोकांत थोरपणा मिळविण्याची इच्छा असे. पण ह्या दोन गोष्टींवरून कोणास वाईट म्हणूं लागल्यास हल्लींच्या विद्यालयांतील व शाळांतील किती गुरूंस व किती ग्रंथकारांस वाईट म्हणावें लागेल, ह्याचा विचार वाचणारांनीं करावा. आतां सोफिस्त ह्यांचे अंगीं धनलोभ कांहीं विशेष होता, असें म्हटल्यास त्या गोष्टीविषयीं प्रमाण नाहीं, असें ग्रोतसाहेब म्हणतो.

दुसरा दोष सोफिस्तांच्या अंगीं असा लाविला आहे कीं, ते मोठे गर्विष्ठ होते, तर हा दोष त्या वेळेस जे सोफिस्त नांवानें प्रसिद्ध होते त्या सर्वांच्याच अंगीं होता ह्यास प्रमाण नाहीं; व जो मोठा बुद्धिमान् व विद्वान् असतो, त्याच्या ठायीं गर्वरूप दोष बहुत वेळ दृष्टीस पडतो खरा; परंतु त्या दोषावरून तो मनुष्य म्हणजे मोठा दुष्ट झाला असें नाहीं.

तिसरा दोष ह्यांवर असा देतात कीं, ते मुलांस अनीतीच्या व खराब

# अध्याय सहावा.

देवाविषयींचीं साक्रेतिसाचीं मतें फार वाईट आहेत; तो तीं दुष्ट मतें शिकवून शहरांतील मुलांस बिघडावितो; असा मिथ्यापवाद साक्रेतिसावर आला; त्यानें न भितां व बोलण्यांत छक्केपंजे न करितां न्यायाधीशांपुढें आपणावर घातलेल्या दोषांचें निवारण केलें; तरी त्यास जिवें मारण्याची शिक्षा ठरविली; हा विषय ह्यांत आहे.

ह्याप्रमाणें लोकांशीं भाषण करून त्यांचें अज्ञान त्यांच्या पदरीं घालण्याचा व त्यांस उपदेश करण्याचा साक्रेतिसाचा क्रम सुमारें तीस वर्षे चालला होता. असें करण्यानें त्यास किती एक मित्र झाले खरे; परंतु त्यापेक्षां शत्रु फार झाले. जे लोकांत विद्वान् व थोर असे मोडत होते; त्यांचें अज्ञान त्यानें उघडकीस आणल्यावरून, ते ह्याचा अर्थातच द्वेष करूं लागले. तसेंच हा ज्या गोष्टी सांगे, त्या नवीन असल्यामुळेंच पुष्कळ लोक ह्याचा त्रास करीत; कारण एकादी गोष्ट वस्तुतः चांगली असली, तरी ती नवीन आहे एवढ्याच कारणानें तिला नांव ठेवणारे लोक सर्वकाळ व सर्व देशांत बहुत असतात. तसेंच तरुण लोक लब्धप्रतिष्ठित नसल्यामुळें निर्मत्सरपणानें त्याची बुद्धि व कल्पना चहात व मोठ्या उत्कंठेनें त्याचे उपदेश ऐकत, तें न साहून पुष्कळ लोक त्यास वाईट पहात. साक्रेतीस बहुत दिवस लोकांत संभाषण व उपदेश करीत फिरत असे, व लोकांत त्याविषयीं पुष्कळ वाईट समजूत झाली होती; ह्यास प्रमाण हेंच कीं, अरिस्तोफनीस नामक एका कवीनें एक प्रहसन * रचून इसवी

---

गोष्टी शिकवीत; परंतु ग्रोतसाहेब म्हणतो कीं, ही गोष्ट खरी मानण्यास प्राचीन काळच्या लेखांत कांहींच प्रमाण नाहीं; व धादांत वाईट व खराब ज्या गोष्टी, त्या कोणी प्रसिद्धपणें शिकवूं लागल्यास अथेन्सच्याप्रमाणें लोकसत्ताक संस्थानांत त्या शिक्षकाचा फार दिवस निभाव होणें अशक्य दिसतें. तसेंच हजारों तरुण लोक पैसे देऊन त्यांकडे विद्या शिकावयास जात व त्यांचे वडील त्यांस जाऊं देत, व त्यांची गांवोगांव मोठी प्रतिष्ठा होई; यावरूनच ते लोक त्या वेळच्या प्रतिष्ठित लोकांत मोडत होते असें सिद्ध होतें. ह्या विषयावर ग्रोतसाहेबानें फारच प्रतिपादन केलें आहे; परंतु त्याचा चांगला सारांश सुद्धां येथें जागेच्या संकोचास्तव लिहितां येत नाहीं.

* ज्या नाटकांत थट्टामस्करीच मुख्यत्वेंकरून असते, त्यास संस्कृतांत 'प्रहसन' व इंग्रजींत 'फार्स' असें म्हणतात. अशीं नाटकें अद्यापि मराठी भाषेंत फारशीं झालीं नाहींत.

सनाच्या पूर्वी ४२३ त नाटकगृहांत त्याचा अभिनय म्हणजे खेळ केला; त्यांत साक्रेतिसाचें सोंग आणून त्याची थट्टा केली आहे. आतां साक्रेतिसाचा अंतकाळ इसवी सनाच्या पूर्वी ३९९ त झाला; ह्यावरून मरावयाचे पूर्वी २५ वर्षे त्याची लोकांत प्रख्याति होऊन कितीएक लोक त्यास वाईट पाहूं लागले होते, असें सिद्ध होतें.

आतां साक्रेतिसाच्या शत्रूंनीं पैसा देऊन अरिस्तोफनिसाकडून तें वर्मी लागणारें नाटक करविलें का कसें, ह्याचा निर्णय होत नाहीं. साक्रेतीस सर्व प्रहसन–नाटकांची व विशेषेंकरून अरिस्तोफनिसानें केलेल्यांची उघड निंदा व तिरस्कार करीत असे; आणि त्या अरिस्तोफनिसाचा प्रतिस्पर्धी युरिपैदीस नामें एक कवि होता, त्यानें केलेलीं करुणरसप्रधान नाटकें तो फार वाखाणीत असे. ह्याबद्दल त्याचा सूड उगवावा म्हणून अरिस्तोफनिसानें हें त्याच्या निंदेचें नाटक बहुतकरून केलें असावें, असेंहि वाटतें. कसेंहि असो, अरिस्तोफनिसाचा साक्रेतिसावर राग होता त्यामुळें तो तें नाटक करो, किंवा शत्रूंच्या सांगण्यावरून ते * करो तें कसेंहि असलें तरी त्यानें त्या अत्यंत थोर साधूची अप्रतिष्ठा व उपहास करण्याकरितां आपली सर्व प्रतिभा व विचारशक्ति खर्चून तें नाटक करून कवितेनें दुर्जनांचें साहाय्य होऊन सज्जनांचा नाश झाला, असा कवितेला मात्र मोठा कलंक लाविला.

त्यानें जें नाटक केलें, त्याचें नांव 'मेघमाला' असें होतें. त्यांत त्यानें साक्रेतिसाचें असें सोंग आणिलें होतें कीं, तो मेघांत उंच टांगलेल्या पाटींत बसला आहे, आणि तेथून लोकांस आपले सिद्धांत, म्हणजे अत्यंत उपहासास्पद बारीकसारीक कुतर्क सांगत आहे. इतक्यांत एक कर्जभरू जर्जर म्हातारा, सावकारांच्या देण्याच्या पेंचांतून सुटावें, ह्या इच्छेनें त्याजकडे येऊन प्रार्थना करितो; महाराज, सावकार मला फार तसदी देतात, तर त्यांचें मी कांहीं लागत नाहीं, असा मजबूत पुरावा करून त्यांस दरबारांत ठकवितां येईल असें करा. सारांश, माझे खटले अगदीं खोटे आहेत, ते खरे करून दाखविण्यास

---

* आम्हांस वाटतें कीं, ह्या दोहोंतलें एकाहि कारण कल्पिण्याची गरज नाहीं. जो मनुष्य पुष्कळांचा नावडता असतो, त्याची थट्टा करून लोकांस हंसविणें, व त्यांची वाहवा मिळविणें, ही कवि, नाटककार व अर्वाचीन काळीं वर्तमानपत्रकर्ते ह्यांची चालच आहे. ह्याचप्रमाणें, अरिस्तोफनिस ह्यानें केलें असावें, त्याचें साक्रेतिसाशीं विशेष शत्रुत्व कल्पिण्याचें कांहीं प्रयोजन दिसत नाहीं.

मला चांगली युक्ति सांगा. परंतु ह्या नव्या गुरूच्या प्रौढ उपदेशापासून शहाणा होण्याची आपली योग्यता नाहीं, असें पाहून तो म्हातारा आपण जाऊन आपल्या लेकांस पाठवून देतो. मग तो मुलगा ह्या विद्वान् गुरूच्या शाळेंतून असा तरबेज होऊन बाहेर पडतो कीं, बापाची गांठ पडल्याबरोबर त्यास खूप ठोकतो, आणि तुझ्याशीं मला असेंच वागलें पाहिजे, असें त्यास मोठ्या सबळ व सूक्ष्म रीतीनें सिद्ध करून दाखवितो. * ज्या ज्या प्रवेशांत साक्रेतिसाचें सोंग येतें, तेथें तेथें अशी गोष्ट रचिली आहे कीं तो हजारों अनन्वित भाषणें करीत आहे, सर्व देवांस व विशेषेंकरून × जुपितरास लक्षावधि शिव्या देत आहे; महा अभिमानी पुरुषासारखें बोलत आहे; व सर्व लोकांचा पराकाष्ठेचा धिक्कार करीत आहे. ईश्वरानें कांहीं गोष्टी मनुष्यास न कळाव्या अशा करून ठेविल्या आहेत, त्या जाणण्याचा प्रयत्न केला असतां मनुष्यांस पातक लागतें असें आहे; तें न जुमानून स्वर्गलोकीं काय चाललें आहे, व पाताळीं काय चाललें आहे, ह्याविषयींचा त्याचा विचार चाललाच आहे; कितीहि अन्यायाचा पक्ष असला; तर तो मी उचलिला असतां त्याचा जय होईल, अशी त्यांची फुशारकी चाललीच आहे; व तो अशा दुष्ट गोष्टी आपल्या मनांत गुप्त न ठेवितां त्या दुसऱ्यांस पढवून अथेन्स शहरच्या सर्व मुलांस बिघडवीत आहे, अशी त्या नाटकांतील कथा होती. ही कथा झाल्यावर पुढें कवीनें सर्वांस हंसें आणणारी अशी याची खुबीदार थट्टा केली होती. अथेनियन लोकांसारखे शीघ्रबुद्धि व रसिक ऐकणारे, त्यांतून ज्यांस कोणाचा उत्कर्ष स्वभावतः सहन होत नसे, ते लोक हें नाटक पाहून व ही थट्टा ऐकून फारच खुष झाले. त्या कवितेनें ते इतके मोहित होऊन गेले कीं, त्यांस तो खेळ संपेतोंपर्यंतदेखील दम निघेना. त्यांनीं तत्काळ असें ठरविलें कीं, प्रहसनरचना करणारे जे कवि आहेत, त्या सर्वांच्या वर अरिस्तोफनिसाचें नांव घालावें.

आज रंगभूमींत आपलें सोंग येणार आहे, असें ऐकल्यावरून त्या दिवशीं साक्रेतीस अरिस्तोफनिसाचें तें नाटक पहावयास नाट्यशाळेंत गेला. ही गोष्ट

* ह्या स्थळीं नाटककर्त्यानें साक्रेतीस अल्पवयी मूर्ख मुलें भोंदून व त्यांस कुतर्क शिकवून त्यांची बुद्धि बिघडवितो, व त्यांस दांडगे करितो, असें सुचविलें आहे.

× ग्रीक लोकांतल्या देवांतल्या अत्यंत मुख्य देवास 'जुपितर' म्हणत; जसा आपल्या देवांत इंद्र.

त्याच्या संप्रदायास विरुद्ध होती; कां कीं, तो अशा समाजांत बहुतकरून जात नसे; गेला तर युरिपैदिसानें केलेलें एकादें नवें शोकरसप्रधान नाटक व्हावयाचें असल्यास मात्र जाई. हा युरिपैदीस त्याचा परम मित्र होता; व हा आपल्या नाटकांत नीतीच्या पुष्कळ उत्कृष्ट गोष्टी आणी, म्हणून ह्याची तो प्रशंसा करी. असें असतां एके दिवशीं युरिपैदिसानें रचलेलें नाटक नाटकगृहांत चाललें असतां त्यांत एक सोंग येऊन तें आरंभींच अभद्र भाषण बोललें. तें साक्रेतिसास सहन न होऊन, आपण उठून गेलों असतां आपल्या मित्राच्या नाटकाचा बेरंग होऊन त्याची योग्यता कमी होईल, ह्याचा कांहींच विचार न करतां तो नाटकगृहांतून निघून गेला. इतका तो नीतिमार्गाचा कैवारी होता. अल्किबैदीस व क्रीतियस ह्यांनीं जुलमानें नेलेंच तर कोण जाणें; परंतु तो स्वतः संतोषानें प्रहसनें पहावयास कधींहि जात नसे. कारण कीं, प्रहसनांत जी मनस्वी टवाळकी असे, तिचा त्यास फार त्रास येई. तसेंच आपण ज्या शहरांत राहतों, त्या शहरच्या लोकांची अब्रु सर्व लोकांसमक्ष दुष्ट सोंगाडे त्या तमाशांत घेतात, हें त्याच्यानें पाहवत नसे. असो; त्याच्या निंदेचें नाटक ज्या दिवशीं झालें त्या दिवशीं तो बुद्ध्या तेथें जाऊन तें पहात खुशाल धिमेपणें बसला होता. त्या प्रसंगीं त्याची इतकी कुटाळकी झाली असतां त्यानें तिळमात्रहि राग किंवा त्रास दाखविला नाहीं. तेथें कोणी परगांवचे लोक मौज पहावयास आले होते. त्यांनीं तमाशांत वारंवार ज्या साक्रेतिसाचें सोंग येतें, तो साक्रेतीस कोणता, म्हणून विचारलें असतां साक्रेतीस आपल्या आसनावरून उठून उभा राहून हा मी साक्रेतीस येथें आहे पहा, असें त्यांस सांगून सगळा खेळ आटोपेतोंपर्यंत तो तसाच उभा होता. त्याच्याजवळ जे बसले होते, त्यांस त्याची सहनशीलता व मानापमानाविषयीं समानदृष्टि पाहून मोठा चमत्कार वाटला. हें पाहून तो त्यांस म्हणाला, मला असें वाटतें कीं, मी आज सर्वांस हंसविण्याची मेजवानीच करीत आहे, आणि सर्व लोकांस जर संतोष वाटतो, तर ही सगळी थट्टा सोसणें मला अवश्य आहे.

अरिस्तोफनिस हा साक्रेतिसाचा मित्र नव्हता खरा; तरी तो त्याच्या शत्रूंनीं केलेल्या दुष्ट कटांत शिरला होता, किंवा त्याचा जीव घेण्याचा इरादा होता असें कल्पिण्यास कांहीं आधार नाहीं. विशेष संभवाचें कारण असें दिसतें कीं, लोकांनीं हंसावें, त्यांस गंमत वाटावी, म्हणून मुख्य मुख्य अंमलदार व सेनापति ह्यांवर सुद्धां प्रहसनें रचून त्यांचीं सोंगें आणून त्यांची जशी

तो टवाळकी करी, तशी त्यानें ह्या पंडिताचीहि केली असावी. तसें करण्यास त्यास वाईट वाटावें, तें वाटलें नाहीं इतकाच त्याचा दोष. साक्रेतिसाचा प्राण घेण्याचा वास्तविक दोष म्हटला म्हणजे तो, त्याचा जे हेवा करीत असत ते व त्याचे शत्रु ह्यांच्या माथीं होता. त्या दुष्टांनीं अरिस्तोफानिसास नाटक करण्याविषयीं चिथविलें असल्यास, त्यांची मसलत फार खोल दूरवर दृष्टि देऊन मोठ्या बेतानें रचलेली अशी होती, असें म्हटलें पाहिजे. त्यांचा मतलब असा होता कीं, एकाद्या मनुष्याचें सोंग तमाशांत आणलें म्हणजे तो तमाशा पाहून लोकांनीं हंसावें, म्हणून तमाशा करणारा त्या मनुष्याच्या आंगचे दुर्गुण व व्यंगें काढतो; तीं व्यंगें व ते दुर्गुण पाहिले म्हणजे लोकांच्या मनांत त्या मनुष्याविषयीं तिरस्कारबुद्धि उत्पन्न होते; आणि तिरस्कारबुद्धि उत्पन्न झाली म्हणजे ते त्याशीं अन्यायानें वर्तूं लागतात. कां कीं, सर्व मनुष्यांचा स्वभावच असा आहे कीं, एखादा मनुष्य एकदां सर्वांच्या तिरस्कारास पात्र झाला म्हणजे ते त्याचा वारंवार अपमान करितात, त्यास शिव्या देतात व त्यास इजा सुद्धां करितात. साक्रेतिसाच्या शत्रूंनीं त्यांवर प्रथम ही आग पाखडली, व हें करण्यांत त्यांनीं त्यांवर पुढें जे मोठे खटले करण्याचें योजिलें होतें, त्याचाहि त्यांस अजमास लागला. जी त्यांची मसलत बहुत वर्षें गुप्त राहिली होती, ती हें नाटक झाल्यावर सुमारें वीस वर्षांनीं उघाडीस आली. ती इतका वेळ गुप्त राहण्याचें कारण, त्या वेळेस अथेन्सच्या संस्थानावर मोठा कहर गुदरला होता, हें असावें. अथेनियन लोकांनीं सिसिली बेटावर स्वारी केली होती ती स्वारी त्यांस परिणामीं अशी भोंवली कीं, * स्पार्ता नामक संस्थानचा सरदार लिसांदर ह्यानें अथेन्स शहरास वेढा घालून तें घेतलें, आणि तेथील लोकसत्तात्मक राज्य मोडून तेथें त्यानें ३० जुलमी अंमलदार नेमिले. ह्या सर्व गोष्टी त्या वीस वर्षांतच घडल्या. त्या अंमलदारांस हांकून दिल्यावर पुढें लागलीच साक्रेतिसावर खटले चालू झाले. ×

---

* स्पार्ता नामें ग्रीस देशांत एक प्रख्यात संस्थान असे. ह्या संस्थानची व अथेन्स संस्थानची मोठी स्पर्धा असे.

× वास्तविक पहातां वीस वर्षें साक्रेतिसाचे शत्रु त्याचा जीव घेण्याच्या मसलतींत होते, ही गोष्ट खरी दिसत नाहीं; कारण तो मोठा राज्यकारस्थानी मनुष्य नव्हता; ह्यास्तव त्यापासून राज्यव्यवस्था करणाऱ्यांस कांहीं भय होतें असें म्हणतां येत नाहीं. व सिसिलीच्या लढाईंत अथेनियन लोक गुंतले म्हणून

मिलितस नामें एक मनुष्य होता. त्यानें आपण फिर्यादी होऊन साक्रेतिसा-वरःकायद्याबरहुकूम फिर्याद केली. फिर्यादींतील कलमें दोन होतीं. एक कलम हें कीं, साक्रेतीस हा ह्या संस्थानांतील लोक जे देव मानितात, ते मानीत नाहीं, दुसरे नवे देव मानितो. दुसरें कलम हें होतें कीं, हा भलत्या भलत्या गोष्टी शिकवून ह्या शहरांतील मुलांस बिघडवितो. ह्या दोन अपराधांबद्दल ह्यास जिवें मारण्याची शिक्षा व्हावी, हें योग्य आहे, असें त्या अर्जाच्या शेवटीं सुचवून अर्जी संपविली होती.

लिवेनिअस ह्यानें एक ग्रंथ केला आहे. त्यास "अपॉलजी ऑफ् साक्रेतीस" असें म्हणतात. ह्या ग्रंथांत असें लिहिलें आहे कीं, मिलितसानें साक्रेतिसावर कांहीं आधार नसतां व कांहींच संभव नसतां जसा दोषारोप केला आहे, तसा कधीं कोणीं कोणावर केला नसेल. साक्रेतिसानें अथेन्सांतील मुलांस उपदेश करण्याचें काम एक दोन दिवस नव्हे, चाळीस वर्षें एकसारखें चालविलें होतें. तो आपलें मत लोकांस गुप्तपणें सांधीकोंदींत सांगत नसे; तर हजारों लोक ऐकत असतां उघड सांगे. तो दुसऱ्यास वागण्याचे नियम शिकवी, व त्या नियमांप्रमाणें स्वतः वागत असे. असें असतां मिलितसानें चाळीस वर्षांनीं फिर्याद केली, ह्याचें काय बीज असावें? लोकांचें कल्याण करण्याची इतकी कळकळ जर मिलितस ह्यास होती, तर ती इतके दिवस कोठें गेली होती? व त्या प्रसंगींच ती एकाएकीं उत्पन्न होऊन इतकी कशानें वाढली? मिलितसासारखा कळकळीचा व योग्य मनुष्य शहरांत असून त्यानें, कोणीं मनुष्य त्या शहराच्या मुलांच्या मनांत लोकसत्ताक राज्यप्रकाराविषयीं तिरस्कार व त्रास उत्पन्न करून फंदफितूर करण्याविषयीं उत्तेजन देणाऱ्या गोष्टी शिकवून त्या सर्वांस बिघडवीत असतां, त्या अनर्थाचा प्रतिबंध होण्याकरितां कांहींच उद्योग न करतां, उगीच मुकाट्यानें राहावें, हें त्यास योग्य होतें कीं काय? कां कीं, असें आहे कीं, जो मनुष्य अंगीं सामर्थ्य असतां उपद्रव मना

---

जें कारण लिहिलें आहे, तेंहि बरोबर दिसत नाहीं. कारण ती लढाई अरिस्तोफनिसाचें नाटक झाल्यावर कितीएक वर्षांनीं पुढें उत्पन्न झाली, व ती चालू असतां साक्रेतिसास शिक्षा करण्यास अथेनियन लोकांस कांहीं भय होतें असेंहि दिसत नाहीं. ह्यावरून साक्रेतिसावर ह्याच वेळेस इतका गहजब गुदरावयास कांहीं विशेष कारणें झालीं असावीं व त्यांचें उल्लेखन त्या वेळच्या इतिहासकारांनीं केलें नाहीं, असें ग्रोतसाहेबांचें मत आहे, व तें मत सयुक्तिक दिसतें.

करीत नाहीं, तो मनुष्य व उपद्रव करणारा मनुष्य, हे दोन्ही एकसारखे गुन्हेगार आहेत. बरें असो, विसराळूपणामुळें अथवा उदासीनपणामुळें, किंवा एकाद्या मोठ्या कामांत गुंतल्यामुळें मिलितसास साक्रेतिसावर फिर्याद करण्यास सुचलें नसेल; परंतु अथेन्ससारखें शहर, जें मोठमोठ्या न्यायाधीश लोकांनीं भरलें होतें, व जे न्यायाधीश लोकहितार्थ रात्रंदिवस जपत असत, व जेथें मोठमोठे धीट मुदाईम असत, जे मत्सराच्या किंवा दुष्टपणाच्या योगानें लोकांचे दोष काढण्यास टपून बसलेले असत, अशा त्या शहरांत साक्रेतिसावर मिलितसानें ह्या प्रसंगीं जो अपराध घातला, तसला सर्वजनप्रसिद्ध अपराध तसल्या न्यायाधिशांच्या व तसल्या मुदाइमांच्या नजरेस आला नाहीं, ही गोष्ट झाली तरी कशी ? ह्यावरून ती अर्जी अगदीं खोटी होती; व तींत युक्तीचा लेश देखील नव्हता, असें स्पष्ट होतें. अर्जी होऊन त्याच्या शत्रूंची मसलत बाहेर पडतांच साक्रेतिसाच्या मित्रांनीं त्याचा बचाव करण्याची तयारी केली. लिसियस म्हणून एक विख्यात दरबारांत बोलणारा असे. त्यासारखा वस्ताद वक्ता त्या वेळीं दुसरा कोणी नव्हता; त्यानें स्वतः विचार करून त्या अर्जीवर एक खासें नामी उत्तर लिहून साक्रेतिसाकडे आणिलें. त्या उत्तरांत त्यानें साक्रेतिसाच्या पक्षास अनुकूल जीं कारणें होतीं, तीं स्पष्ट करून दाखविलीं होतीं. त्या सर्व पत्रभर असे कोमल व चित्तवेधक शब्द घातले होते, व त्यांतील शब्दरचना अशी सुंदर होती कीं, तें पत्र वाचलें असतां केवळ पाषाणहृदय जे असतील, त्यांस देखील कळवळा यावा.

साक्रेतिसास तें पत्र वाचून फार संतोष झाला, व त्यानें त्याची फार स्तुति केली; परंतु तो लिसियसास म्हणाला कीं, हें पत्र अलंकारशास्त्रांतील नियमांस जितकें अनुसरून आहे, तितकें पंडिताच्या धैर्यास व अभिप्रायास अनुरूप नाहीं; म्हणजे हें मला शोभायाजोगें नाहीं. हें भाषण ऐकून लिसियसानें पुसलें कीं, हें पत्र चांगलें लिहिलें आहे, व तुमच्या उपयोगीं नाहीं, ह्या परस्परविरुद्ध गोष्टी संभवतात कशा ? साक्रेतिसानें आपल्या चालीप्रमाणें एक प्राकृत दाखला देऊन त्याच्या प्रश्नाचें असें उत्तर दिलें कीं, बाबा, एकाद्या उत्तम कारागिरानें एक शानदार पोषाक, किंवा वर सोनेरी काम केलेला जोडा मजसारख्या गरिबाकडे आणिला, तर तो पोषाक किंवा जोडा त्यांत कांहीं खोड नसतांहि माझ्या उपयोगीं पडणार नाहीं.

अथेन्सांतील राज्य लोकसत्ताक होतें, ह्यास्तव ज्याकडे अधिक लोकांचें मत, तो पक्ष खरा होत असे; म्हणून तेथें तंटा होत असे; म्हणून तेथें कांहीं

तंटा उत्पन्न झाला असतां वादी व प्रतिवादी आपापल्या वतीनें खटला तुटण्याकरितां मान्य मान्य लोकांच्या घरोघर संमति मागत फिरत असत. साक्रेतिसानें असा निर्धार केला होता कीं, आपण हलकेपणानें व दीनपणानें संमतीची भीक मागावयाची नाहीं, आणि हा त्याचा निर्धार ढळला नाहीं. तसेंच, लोक वादांत प्रौढ व गूढ भाषण करून न्यायाधीशांस दिपवून मोहित करीत; व बायकांमुळें सभेंत आणून त्यांच्या रडण्यानें व दीन मुद्रेनें चौकशी करणाऱ्यांस आपणाविषयीं दया उत्पन्न करीत, तसेंहि साक्रेतिसानें केलें नाहीं; व ह्या प्रकारचा दुसरा कोणताहि कावा केला नाहीं. मग त्यानें कोणाची पायधरणी किंवा आर्जव केलें नाहीं, हें कशास सांगावयास पाहिजे? आपणावरचा दोष उडविण्याकरितां आपल्यावांचून दुसऱ्यास बोलूं द्यावयाचें नाहीं, व न्यायाधीशांपुढें अर्जदारासारखें दीन मुद्रेनें उभें रहावयाचें नाहीं, असा दृढनिश्चय करून त्यानें त्याप्रमाणें केलें; परंतु ती गोष्ट त्यानें गर्वानें किंवा न्यायसभेच्या तिरस्कारानें केली असें नव्हे; तर असें करण्याचें कारण हेंच कीं, आपला पक्ष खरा आहे, व आपण अगदीं निर्दोष आहों असें त्याची मनोदेवता त्यास सांगत असे; ह्यामुळें तो निर्भय होता. त्यानें जें उत्तर दिलें, त्यांत भित्रेपणा किंवा लेचेपेचेपणा अगदीं नव्हता. त्याचें भाषण पंडिताच्या प्रमाणें निःस्पृह, खडखडीत, दिलदार असें होतें. त्यांत सत्यता हाच अलंकार होता. ह्याखेरीज प्रौढ रचना आणून त्यास शोभा आणली नव्हती. बोलतांना तो गोंधळला नाहीं, आणि त्याच्या बोलण्यावरून असें दिसलें कीं, तो अगदीं निरपराधी आहे.

साक्रेतिसाच्या चौकशीच्या वेळीं प्लेटो तेथें होता. त्यानें त्याचें हें सर्व भाषण उतरून काढिलें आणि त्यांत आपल्या पदरचें कांहींएक न घालितां त्याचा एक ग्रंथ रचिला. त्या ग्रंथास "अपॉलॉजी ऑफ साक्रेतीस" असें म्हणतात. प्राचीन काळचे जे जे उत्कृष्ट ग्रंथ आहेत, त्या ग्रंथांत हा ग्रंथ मोडतो. आम्हीं ह्या ग्रंथांतील कांहीं सारांश पुढें लिहिला आहे

नेमलेल्या दिवशीं कायद्याप्रमाणें खटला सुरूं झाला. पक्षकार न्यायाधीशासमोर आल्यावर मिलितस पहिल्यानें बोलूं लागला. त्याचा पक्ष जितका वाईट होता व त्याचा पुरावा जितका कमी होता, तितके छक्केपंजे त्याला आपला दुर्बळपणा झांकण्यासाठीं अधिक करावे लागले. ज्या ज्या योगानें प्रतिवादीवर लोकांचा द्वेष होण्याचा संभव होता, तें तें त्यानें सर्व केलें. तो आपल्या पक्षास साधक युक्ति जर सांगूं लागता, तर तो निखालस तोंडघशी

पडता, परंतु त्या न सांगतां तो मोठमोठ्या प्रौढ व सुंदर शब्दांनीं पोकळ पांडित्य करूं लागला. साक्रेतिसावर आळ घेणारे एक देखील खरा शब्द बोलले नाहींत; तथापि त्यानें शब्दचातुर्यानें खरेपणाचा असा डौल आणिला होता कीं, साक्रेतिसानें स्वतः असें कबूल केलें आहे कीं, मिलितस वगैरे ह्यांचें बोलणें ऐकून न्यायाधीशांच्या मनांत काय आलें असेल, तें माझ्यानें सांगवत नाहीं; पण मी आपली गोष्ट सांगतों कीं, मी तर इतका चकित झालों होतों कीं, माझें देहभान मी विसरलों.

आम्हीं मागेंच लिहिलें आहे कीं, साक्रेतिसावर जी फिर्याद झाली होती, तींत दोन कलमें होतीं. पहिलें धर्माविषयीं होतें. तें असें कीं, साक्रेतीस पापदायक जिज्ञासा * मनीं धरून, स्वर्गांत व पाताळीं काय चाललें आहे, ह्याचा उगीच शोध करितो, व ह्या सर्व ग्रीस देशांतील लोक ज्या देवांस भजतात, ते देव हा मानीत नाहीं व नवे देव स्थापण्याविषयीं प्रयत्न करितो; व तो असें सांगतो कीं, मी जें जें कृत्य करितों तें तें करतांना एक अप्रसिद्ध देव माझ्या मनांत संचार करितो, आणि मला चांगल्या चांगल्या गोष्टी सांगतो. सारांश, तो देव मुळींच नाहींत असें म्हणतो.

दुसरें कलम संस्थानचा अंमल व वजन ह्यांविषयीं होतें. तें असें कीं, साक्रेतीस देवांविषयीं भलत्या भलत्याच गोष्टी मुलांच्या मनांत भरवितो. ह्या संस्थानानें राज्याची जी व्यवस्था केली आहे ती, व संस्थानचे कायदेहि

---

* सृष्टीच्या क्रमांत मनुष्यास समजत नाहींत अशा असंख्यात गोष्टी आहेत. त्या समजण्याविषयीं सर्व काळ सर्व देशीं बुद्धिमान् व विद्वान् पुरुषांचा यत्न चालला आहे, ह्या गोष्टीचें जें मनुष्यास ज्ञान झालें आहे, त्यासच विद्या असें म्हणतात. हें ज्ञान जसजसें वाढत जातें, तसतशा जुन्या कितीएक समजुती खोट्या पडत जातात. ह्यामुळें जुन्या समजुतीचे लोक व अज्ञान लोक विद्येचा द्वेष करितात बहुत लोकांचें मत असें होतें कीं, सृष्टींतील कितीएक गोष्टी मनुष्यानें जाणूं नयेत, अशी देवाचीच इच्छा आहे. आणि म्हणूनच ह्या गोष्टी मनुष्यास न समजण्यासारख्या त्यांनीं करून ठेविल्या आहेत. त्या गोष्टी घडणें किंवा न घडणें, हें केवळ देवांनीं आपल्या हातीं ठेविलें आहे. ह्यास्तव त्या जाणण्याविषयीं यत्न करणें, व त्याविषयीं भाकित करणें, हें देवांच्या गुप्त गोष्टी कळण्यासाठीं यत्न करणें होय; व तो यत्न देवास मान्य नसल्यामुळें तो करणें पाप होय, अशी ग्रीक लोकांची समजूत होती. फार काय, ह्याप्रमाणें साक्रेतिसाची सुद्धां समजूत होती, असें जेनोफनाच्या लेखावरून स्पष्ट समजून येतें. ह्यास्तव साक्रेतिसावरचा हा आरोप अगदीं खोटा होता.

अनर्थकारक आहेत असें तो त्यांस शिकवितो; चिठ्या टाकून ज्यांच्या नांवाच्या चिठ्या निघतील, त्यांस न्यायाधीश नेमण्याची ह्या संस्थानची चाल आहे, ती मूर्खपणाची आहे, असें हा उघड बोलतो. तो स्वतः ज्या सभांस जात नाहीं, त्या सभांची तो निंदा करितो; अगदीं दुर्बल जरी कोणाचा पक्ष असला तरी तो चांगला करून दाखविण्याच्या युक्ति शिकवितो. विद्या शिकविण्याचें मिष करून आपली मोठी प्रतिष्ठा असावी ह्या बुद्धीनें मुलें आपणास नेहमीं चिकटून राहतील, असें करितो; व तुम्ही आपल्या आई-बापांची अवज्ञा करा, त्यास मारा, ठोका, त्याबद्दल तुम्हांस कांहीं शिक्षा व्हावयाची नाहीं, असें त्यांस सिद्ध करून देतो; अशा दुष्ट उपायांनीं तो अथेन्स शहरांतील सर्व मुलें बिघडवून टाकीत आहे. ह्यापासून संस्थानास मोठा अपाय घडेल. साक्रेतिसासारखा ज्ञाता भूमंडळावर नाहीं, असा देल्फाय येथील देवानें कौल दिला, असें ढोंग माजवून तो त्या कौलावर मनस्वी फुशारून गेला आहे. संस्थानांतील व्यवस्था काढून टाकून तें ताळ्यावर आणण्याचा, व येथील सर्व लोकांचे दोष उघडकीस आणून त्यास चांगल्या मार्गास लावण्याचा नसता अधिकार आपल्या डोईवर घेऊन तो इतर सर्व लोकांस मूर्ख म्हणतो; व त्यांच्या आचरणास व रीतीस कांहीं भीड न धरतां दोष लावितो. आतां हा एवढा आव घालितो खरा; परंतु ह्याच्या उपदेशानें विद्यार्थी कसे काय तयार होतात, हें पहावयाचें असल्यास क्रोतियस आणि अल्किबैदीस हे ह्यांचे जिवलग मित्र आहेत, त्यांची वृत्ति पहावी म्हणजे स्पष्ट ध्यानांत येईल. ह्या दोघांनीं मोठमोठे घात केले आहेत, व ह्यांसारखे दुष्ट पुरुष सर्व शहरांत दुसरे कोणी नसतील; व साक्रेतिसासारखा दुराचारी तर सगळ्या जगांत कोणी निघणार नाहीं.

ह्याप्रमाणें फिर्याद करून मिलितसानें शेवटीं न्यायाधीशास अशी विनंति केली कीं, महाराज, साक्रेतीस शब्दपांडित्यानें आपणांस मोहित करील, तर आपण फार सावध असावें; व तो आपणांस फसविण्यासाठीं गोड गोड मोहक भाषणें करील तर आपण त्याचें बोलणें बहुतकरून खरें मानूं नये.

साक्रेतिसानें न्यायाधीशांस असें सांगितलें कीं, हरकोणाशीं संभाषण करीत असतां मी जसें बोलतों, तसें तुम्हांपुढें बोलेन. माझ्या बोलण्यांत अगदीं साधे शब्द येतील. स्तुति वगैरे अगदीं असणार नाहीं. असें प्रथमतः सांगून मग त्यानें कलमवार अर्जाचीं उत्तरें देण्यास आरंभ केला, तीं उत्तरें येणेंप्रमाणें:—

ज्याम आपल्या घरीं व देवळांत संस्थानच्या चालीप्रमाणें देवांस वळी देतांना बहुत लोक हरहमेश पाहतात, तो मी संस्थानच्या लोकांचे देव मानीत नाहीं, असें म्हणण्यास आधार काय? अहो, मला अमुक देवता बुद्धिवाद सांगते, म्हणून हा अफवा उठवितो, असा ज्यावर गुन्हा घातला आहे; व ह्यावरून जो नवे देव स्थापितो असें अनुमान केलें आहे. तो मनुष्य ( मी ) देव मानितो किंवा नाहीं, अशी शंका तरी घेतां येते काय? अहो, जे लोक शकुनविद्येवर विश्वास ठेवून उडणारीं पांखरें व होमाकरितां मारलेल्या पशूंचीं आंतडीं, व यदृच्छेनें कोणाच्या तोंडांतून जे शब्द निघतील, व जे पदार्थ दृष्टीस पडतील, ते शब्द व ते पदार्थ,* इत्यादिकांवरून, व देवांनीं मनुष्यास पुढें घडून येणाऱ्या गोष्टींचें ज्ञान होण्याकरितां जे निरनिराळे उपाय दिले आहेत त्याच्या प्रयोगानें भाकितें करतात, त्या लोकांपेक्षां शकुन पाहण्यानें मीं कांहीं नवा मार्ग पाडिला, असें नाहीं. मिलितस माझ्यावर दोष घालतांना असें म्हणाला कीं, साक्रेतीस दीमन म्हणजे उपदेव जे देवांचीं अपत्यें होत, तें मानितो, तेव्हां त्याच्या ह्या बोलण्यावरूनच स्पष्ट सिद्ध होतें कीं, नवे देव किंवा जुने, परंतु मी कसे तरी देव मानितों. आणि ह्यावरून मी अगदींच देव मानीत नाहीं, हें त्याचें बोलणें अगदीं खोटें आहे; कां कीं, जो देवांचीं अपत्यें मानितो, तो देव मानीत नाहीं हें संभवत नाहीं.

सृष्टींतील ज्या गोष्टींचा विचार केला असतां पातक आहे, त्या गोष्टींचा हा विचार करितो; असा मजवर दोष घातला आहे. त्याविषयीं माझें उत्तर असें आहे कीं, सृष्ट वस्तूंचा ज्यांत विचार आहे असें जें सिद्धपदार्थविज्ञानशास्त्र त्याचा अभ्यास जे सर्वकाळ करितात, त्यांची मी निंदा करीत नाहीं, किंवा जें ते करितात तें वाईट करितात, असा त्यांस दोष लावीत नाहीं खरा; परंतु मी स्वतः इतर सर्व विचार सोडून सदाचरण कोणतें व दुराचरण कोणतें, अंमल कोणत्या प्रकारें करावा, इत्यादि विषयांवर विचार करीत असतों. ह्या विषयांचें ज्ञान इतर सर्व ज्ञानापेक्षां फार उपयोगी आहे. मी जर कांहीं खोटें बोललों असलों, तर माझ्या श्रोत्यांपैकीं पुढें होऊन माझा लबाडपणा काढावा.

अथेन्सकरहो, देवांविषयीं व राज्य करण्याच्या नियमांविषयीं मोठे अनर्थकारक सिद्धांत मनांत भरवून देऊन हा मुलें बिघडवितो, म्हणून मजवर वादी गुन्हा घालतो; तर तुम्हां सर्वांस विदितच आहे कीं, मुलांस शिकवून पोट भरण्याचा

---

* शेवटच्या रीतीनें शकुन पाहण्याची रीत ह्या देशांत प्रसिद्ध आहे.

रोजगार मीं कधीं केला नाहीं; व कोणी किती जरी माझा वैरी असला तरी तो ह्यानें अमक्या वेळेस अमक्यास उपदेश करून त्यापासून पैसा घेतला, असा मजवर दोष ठेवूं शकणार नाहीं. ह्याविषयीं मजपाशीं मजबूद पुरावा आहे. तो हा कीं, मी फार भिकारी आहे. मी जर शिकविण्यावर पैसा मिळवितों तर आज गबर असतों. आपण सदाचरणी व्हावें अशा इच्छेनें जो मजकडे आला, तो गरीब असो किंवा मातबर असो, त्या दोघांसहि आपलीं मतें कळवून त्यांस सुज्ञ करण्याविषयीं मला सारखा उत्साह आहे. मातबर मला अधिक आवडतात, आणि गरीब कमी आवडतात, असें नाहीं; व मी त्यांस प्रश्न करावयास व माझ्या प्रश्नांचीं उत्तरें द्यावयास पाहिजे तितकी फुरसत देतों; घाई कदापि करीत नाहीं. माझे जे श्रोते आहेत, त्यांपैकीं कोणी जर सदाचरणी किंवा दुराचरणी निघाले, तर पहिल्याचें सदाचरण किंवा दुसऱ्याचें दुराचरण ह्याचा आरोप मजवर नसावा; कां कीं, मी त्याजवर कोणतीहि गोष्ट करण्यास जबरी करीत नाहीं. त्यांच्या मनास जें भावतें, तें ते करितात. माझा सगळा उद्योग इतकाच कीं, मी लहान मुलें आणि थोर मनुष्यें ह्या सर्वांस सर्वदा असें सांगतों कीं, बाबांनों, शरीर, संपत्ति व त्यांसारखे दुसरे जे जे अशाश्वत पदार्थ आहेत, त्यांवर फार ममता ठेवूं नका; तर आपल्या आत्म्याविषयीं मुख्यत्वेंकरून कळकळ बाळगा; तोच तुमच्या प्रीतीस मुख्यत्वेंकरून पात्र होण्यास योग्य आहे; व त्यास मी रात्रंदिवस असा आग्रह करितों कीं, संपत्तीनें चांगुलपणा प्राप्त होत नाहीं, तर उलट चांगुलपणानें संपत्ति प्राप्त होते; आणि ह्या मानवी संसारांतील सर्व घरगुती किंवा बाहेरील सुखाचें मूळ एक सदाचरण होय, दुसरें नाहीं.

ह्याप्रमाणें मुलांस शिकविणें हें जर त्यांस बिघडविणें आहे, तर मग महाराज, न्यायाधीशहो, मी गुन्हेगार व नशिहत भोगावयास योग्य आहे, असें मीं आपल्या तोंडानेंच कबूल करतों! मी बोलतों हें जर लटकें असेल, तर मजवर लबाडीचा दोष शाबीत करणें फार सोपें आहे. ह्या सभेंत माझे पुष्कळ श्रोते आहेत; त्यांनीं पुढें येऊन तसें बोलावें, म्हणजे झालें. त्यांस मीं मोहित केल्यामुळें, व त्यांची मजवर प्रीति असल्यामुळें, ते कदाचित् माझ्याविरुद्ध बोलणार नाहींत. ते नाहीं बोलले तरी त्यांचे बाप, भाऊ, चुलते, ह्यांस संबंधाच्या धर्मानें, व ज्या शहरांत आपण राहतों त्या शहराचें आपण कल्याण करावें असा सर्वांचा धर्म आहे त्या धर्मानें, पुढें सरून आपल्या पुत्रांना,

भावांना, व पुतण्यांना बिघडविणाऱ्यावर फिर्याद करून त्याचें पारिपत्य करणें आवश्यक आहे; परंतु ते तसें करीत नाहींत; उलट त्यांस माझ्या पक्षाचा जय व्हावा ह्याविषयीं फार कळकळ आहे.

महाराज, आपल्या मर्जीस येईल तो हुकूम आपण मला करा. मी तर आपल्या आचरणाबद्दल कदापि पश्चात्ताप करणार नाहीं, किंवा त्यांत फेरफार देखील करणार नाहीं. देवानें साक्षात् जी कामगिरी माझ्या माथीं मारून दिली आहे, ती मला सोडतां येत नाहीं, व तहकूबहि करतां येत नाहीं. त्यानें माझ्या गांवकऱ्यांस उपदेश करण्याचें काम माझ्या दिमतीस दिलें आहे तें मला अवश्य केलें पाहिजे. पोतिदिया,* आंफिपोलिस, व दालियम ह्या गांवीं लष्कर असतां आपल्या सेनापतींनीं जीं ठाणीं मला नेमून दिलीं होतीं, तीं तीं इमानें इतबारें राखिलीं, सोडून गेलों नाहीं. आणि तूं विद्याभ्यासांत जन्म घालवून आपणांस व दुसऱ्या लोकांस सज्ञान कर, असा ईश्वरानें साक्षात् मला हुकूम करून उपदेश करावयाची जी जागा दिली आहे, ती जर मी आज मरणाच्या भयानें सोडीन, तर हा माझा मोठा अपराध होईल, आणि तेणेंकरून देव न मानण्याचा व त्यांची निंदा करण्याचा दोष मजवर येऊन देवाज्ञाभंगाच्या अपराधाबद्दल ह्या सभेचें बोलावणें होण्यास मी वास्तविक योग्य होईन. इतःपर पुढें मीं मुकाटें रहावें, कोणास कांहीं शिकवूं नये, अशी अट करून घेऊन मला ह्या खटल्यांतून मुक्त करण्याचा तुमचा निश्चय असल्यास त्याचें उत्तर मी आतांच तुम्हांस सांगतों, ऐकाः—मी तुम्हां अथेन्सच्या लोकांना थोर मानतों, व तुम्हांवर प्रीति करितों खरा; पण तुमच्यापेक्षां देवांची आज्ञा मला अधिक पाळली पाहिजे; यास्तव माझ्या जिवांत जीव आहे तों मी तुम्हांस उपदेश करण्याचें कदापि सोडणार नाहीं; किंवा तुम्हांपैकीं हरएक कोणी मला भेटला असतां माझ्या सांप्रदायाप्रमाणें त्यास पुढील हितवाद केल्यावांचून, किंवा दोष दिसल्यास नांव ठेवल्यावांचून कदापि राहणार नाहीं; हें पक्कें समजा. तो हितवाद असा कीं, माझे मित्रहो, सर्व जगांत शहाणपणाविषयीं अत्यंत विख्यात जें हें अथेन्स शहर, येथील तुम्ही राहणारे असतां, पैसा जमा करणें व प्रतिष्ठा, अब्रू व मोठमोठ्या पदव्या; हीं मिळविणें ह्यांवांचून तुमच्या मनांत कसलाहि विचार येत नाहीं.

---

* ह्या तीन गांवीं ज्या लढाया झाल्या, त्यांत अथेन्स संस्थानच्या चालीप्रमाणें साक्रेतीस लढावयास गेला होता.

शहाणपण, विवेक व विद्या ह्यांच्या प्राप्तीकडे तुम्ही अगदीं लक्ष देत नाहीं; व तुमच्या आत्म्याच्या ठायीं जितकी पूर्णता व चांगुलपणा येण्याची तुमच्या अंगीं योग्यता आहे तितकी पूर्णता व चांगुलपणा त्याच्या ठायीं आणण्यासाठीं तुम्ही कांहींच श्रम करीत नाहीं; ह्याची तुम्हांस लाज वाटत नाहीं काय ?

हा प्रत्येकास बाहेर बुद्धिवाद करण्याविषयीं इतका झटत असतां न्याया-धीशांच्या * मंडळींत येऊन स्वदेशकल्याणाच्या विचारांत बुद्धिवाद सांगण्यास नेहमीं अळंटळं करितो, ह्यावरून हा फार भित्रा आहे, असा दोष वादीनें मला लाविला आहे; परंतु तुम्हां अथेन्सकरांबरोबर मी बहुत वेळ शत्रूंशीं लढाई करावयास गेलों आहे; व मी जेव्हां मागें मुख्य न्यायाधीश झालों होतों, त्या वेळीं थार्गिनुसे नामक बेटाजवळ समुद्रांत झालेल्या लढाईत पड-लेल्या व बुडून मेलेल्या लोकांचीं त्यांनीं प्रेतें उचलून आणून पुरलीं नाहींत, म्हणून तुम्ही फौजेच्या सरदारांवर गुन्हा ठेवून त्यांस ठार मारण्याचा यत्न करीत असतां, तो यत्न ह्या संस्थानच्या कायद्यास विरुद्ध आहे. असा मी एकट्यानें सर्वांविरुद्ध अभिप्राय दिला; व त्या वेळेस सर्व लोकांच्या विरुद्ध बोलेल तो जिवास मुकेल, असें भय होतें; परंतु तें भय मीं जुमानलें नाहीं; ह्यावरून मला वाटतें कीं, आपल्या अंगचा शूरपणा व हिम्मत हीं मीं तुम्हां सर्वांना पुरतेपणीं दाखविलीं आहेत. व लिसांदर ऽ ह्यानें आपल्या शहरात जे जुलमी तीस अंमलदार नेमिले होते, ते अंमलदार दुष्टपणानें जुलमी हुकूम करीत, त्या हुकमांना मी एक वेळा नव्हे, बहुत वेळां अडवा आलों आहे. ह्यावरून मी भितरा आहे कीं काय, ह्याविषयीं सर्वांच्या मनाची खात्री झाली असेलच. आतां असें असतां तुमच्या सभेंत येण्यास मला कशानें अटकाव झाला असावा बरें ? मला माझ्या दीमनानें अटकाव केला. ज्या दीमनाविषयीं बोलतांना तुम्हीं सर्वांनीं मला बहुत वेळ ऐकिलें आहे, व ज्या दीमनाचा मिलितसानें

---

* अथेन्सच्या लोकसत्ताक संस्थानांत आपणांस बुद्धिमान व शहाणे म्हण-विणारे जे लोक असत, ते बहुतकरून सरकारी कामांत शिरत, तसेंच साक्रे-तिसानें केलें नाहीं. तीच गोष्ट त्याच्या शत्रूनें येथें लबाडीनें त्याच्या विरुद्ध करून दाखविली आहे.

ऽ हा स्पार्तन् लोकांचा मुख्य सेनापति होता. स्पार्तन लोक व अथेनियन् लोक ह्यांची लढाई चालली असतां लिसांदर ह्यानें अथेनियन लोकांचा पराभव करून, त्यांची मुख्य राजधानी अथेन्स काबीज करून तेथील लोकसत्ताक राज्य मोडून महाजनसत्ताक राज्य स्थापिलें होतें.

बहुत वेळां उपहास केला, तो दीमन, मी जेव्हां लहान होतों तेव्हांपासून मजवर सर्व लोकांशीं वाकडा होईल व आपल्या अमलांतील शहरांत अन्यायाचें काम कदापि होऊं देणार नाहीं, व कायदा कधीं मोडूं द्यावयाचा नाहीं अशा निग्रहानें रात्रंदिवस आपलें काम चालवील, त्याला लवकरच मोठा अपाय होईल ह्यांत संशय नाहीं; ह्यास्तव, न्यायपक्षपाती जो मनुष्य आहे त्यास आपण जिवंत असावें अशी यत्किंचित् इच्छा असेल, तर त्यास सरकारी कामांत कदापि शिरतां उपयोगीं नाहीं.

अथेन्सकरहो, आतां मजवर हा जो गहजब गुदरला आहे, ह्यापेक्षां कमी संकटांत असूनहि कांहीं लोक जसें न्यायाधीशांची पायधरणी करून त्यांचे आर्जव करितात, व त्यांस आपली दया येण्यासाठीं सभेंत आपलीं बायकामुलें आणितात, तसें मी केलें नाहीं; परंतु हें न करण्याचें कारण गर्व किंवा हट्ट किंवा तुम्हांविषयीं तिरस्कारबुद्धि हीं आहेत असें अगदीं समजूं नका, तर तुमच्या ह्या संस्थानचा थोरपणा राखण्याकरितांच मी तसें केलें नाहीं. तुम्हांस माहीत आहेच कीं, आपल्या शहरांत असेहि कांहीं पुरुष आहेत कीं, जे मरण, म्हणजे अनिष्ट गोष्ट आहे, असें मानीत नाहींत; तर अप्रामाणिकपणा व अपकीर्ति ह्यांस मरण ही संज्ञा देतात. अहो, मृत्यु काय ? तुच्छ पदार्थ आहे, त्यास शहाण्यानें भिऊं नये, याविषयीं नाना प्रकारच्या गोष्टी आजपर्यंत सांगून आज माझ्यासारख्या उतार वयांत, खरी खोटी कशी तरी माझी कीर्ति लोकांत झाली आहे. ती झाली असतां आज मरणास भिऊन मी भलतेंच करावें, आणि तेणेंकरून आजपर्यंत आपण त्याप्रमाणें वागून आचरणाचे जे नियम व ज्या गोष्टी लोकांना शिकविल्या, त्या सर्व नियमांवर व त्या गोष्टींवर आपण जातीनें त्यांस विरुद्ध वागून पाणी घालावें, हें कृत्य मला योग्य आहे काय ? छी ! छी ! ही गोष्ट कदापि मी करणार नाहीं.

असो. आतां माझ्या अब्रूची गोष्ट एकीकडे असूं द्या; तीस तर मी मरणास भिऊन तुमची काकुळती केल्यानें बट्टा लागेलच लागेल ह्यांत कांहीं संशय नाहीं. परंतु दुसरी गोष्ट मला अशी वाटते कीं, वादीनें किंवा प्रतिवादीनें न्यायाधीशांचे आर्जव करून व त्यांच्या हातांपायां पडून दोषनिर्मुक्त करून घेणें, हें काम वाजवी नाहीं. वाजवी म्हटलें म्हणजे त्यांनीं आपला वाका त्यांच्या मनांत भरवून देऊन त्या वाक्याच्या खरेपणाविषयीं त्यांची खातरी करावी. न्यायाधीश जे न्यायासनावर बसतात, ते कायदे मोडून लोकांवर

मेहेरबानी करावयास बसत नाहींत; तर त्या कायद्याप्रमाणें वागून न्याय करावयास बसतात. ते जी शपथ घेतात, ती, आपल्या मर्जीस येईल त्यास पारिपत्य केल्यावांचून मोकळा करूं व वाटेल त्यास अपराधावांचून शिक्षा करूं, अशी घेत नाहींत; तर आम्ही योग्य न्याय करूं अशी घेतात. ह्यास्तव, तुमचे आर्जव करून तुम्हांस तुमची शपथ लटकी करण्याची संवय लावूं नये, व तुम्हीहि आम्हांस आपणांला अशी दुष्ट संवय लावूं देऊं नये; कां कीं, तसें केल्यानें तुमच्या व आमच्या दोघांच्या हातून धर्म व न्याय मोडून दोघांसही पाप लागेल.

अथेन्सकरहो, ह्यास्तव, जे उपाय मला गैरवाजवी व बेकायदेशीर वाटतात, ते उपाय मरण टाळण्याकरितां ह्या सभेंत मी करीन, असें कदापि मनांत येऊं देऊं नका. त्यांतून ह्या प्रसंगीं मिलितसानें मजवर नास्तिकपणाचा आळ घातला आहे. ह्याकरितां ह्या प्रसंगीं तर मुख्यत्वेंकरून मी तसें करणार नाहीं. तुमची प्रार्थना करून तुमचें मन वळवून घेऊन तुम्हांकडून जर मीं तुम्ही वाहिलेल्या शपथा मोडविल्या, तर ह्यावरून मीं तुम्हांस देव मानूं नका असें शिकविलें, असें सिद्ध होईल; व मी आपल्यावरचा दोष उडवून आपला बचाव करावयास गेलों, आणि उलट मी शत्रूंचा पक्ष बळकट करून आपणच आपणांस नास्तिक ठरविलें, असा मूर्खपणाहि मजवर येईल; ह्यास्तव अशा पापाच्या विचारापासून मी फार दूर आहें. असो. मजवर तुफान रचणाऱ्यांपेक्षां ईश्वराच्या अस्तित्वाविषयीं माझी खातरी अधिक झाली आहे. ती खातरी इतकी कीं, मीं आपला सर्व भार ईश्वरावर व तुम्हांवर टाकला आहे. माझा हेतु असा आहे कीं, ज्या रीतीनें माझा निवाडा केला असतां तुमचें व माझें दोघांचें कल्याण आहे असें तुम्हांस वाटेल, त्याचप्रमाणें तुम्ही निवाडा करावा.

साक्रेतीस आपला निर्भयपणा व दृढनिश्चय ऐकणारांच्या स्पष्ट लक्षांत यावयाजोग्या स्वरानें भाषण बोलला. त्याचा आकार, मुद्रा व अंगचेष्टा हीं फिर्याद झालेल्या पुरुषाच्यासारखीं नव्हतीं. तो इतक्या दिलदारपणानें व उदारपणानें बोलला कीं, त्यावरून तो त्या सभेंतील न्यायाधीशांचा गुरुच आहे, असें दिसलें. तरी त्याच्या बोलण्यांत मर्यादा तिळमात्र देखील सुटली नव्हती. त्याचें तें प्रौढीचें व थोरवीचें आचरण पाहून न्यायाधीशांना मोठा राग आला. बहुतकरून सर्व

न्यायाधीशांची हीच गोष्ट आहे कीं, त्यांच्यासमोर जे वादीप्रतिवादी येतात,- त्यांना जीवदान देण्यास, किंवा मारण्यास आपण अगदीं मुखत्यार आहों, असें ते मानितात; व त्यामुळें त्यांना मनांतून असें वाटत असतें कीं, आपणांपुढें त्यांनीं मोठ्या गरिबीनें, अत्यंत विनयानें व फार मोठ्या धाकानें यावें; व असें करून घेणें हें, सर्वांहून श्रेष्ठ जो आमचा अधिकार त्याचा हक्कच आहे.

असो. मिलितसाकडे पहिल्यानें पांचवा हिस्साहि संमति नव्हत्या. इतिहासांच्या आधारावरून असें वाटतें कीं, ह्या प्रसंगीं चौकशी करण्यासाठीं सगळे मिळून ५५७ न्यायाधीश जमले होते. ह्या संस्थानचा कायदा असा होता कीं, फिर्यादीस आपण केलेल्या फिर्यादीचा पुरावा करितां न आल्यास त्यानें अडीचशें रुपये दंड दिला पाहिजे. हा कायदा शहाण्या पुरुषांनीं बालंटखोरांना दाबांत राखण्याकरितां केला होता. अनितस आणि लिक्रन हे दोघे मिलितसास सामील होऊन, आम्हीहि साक्रेतिसावर फिर्यादी आहों, असें न म्हणते, तर मिलितसास हा दंड खचित द्यावा लागता. त्या दोघांनीं आपल्या वजनदारीनें बहुत न्यायाधीशांच्या संमति आपणाकडे ओढल्या. त्यामुळें साक्रेतिसाच्या पक्षास प्रतिकूळ मत देणारे दोनशें एक्यायशीं न्यायाधीश झाले, व त्यास अनुकूळ मत देणारे जे होते, त्यांपेक्षां तीन किंवा अधिक मिळते, तर साक्रेतिसाच्या वतीनें खटला तुटून तो दोषापासून मुक्त होता, असा प्राचीन लेख आहे; त्यांवरून त्याच्या अनुकूळ पक्षास २७६ न्यायाधीश असावे असें अनुमान होतें.

अथेन्सच्या संस्थानांत अशी रीत होती कीं, ज्या मनुष्यावर दोषारोप झाला असेल, तो गुन्हेगार आहे कीं नाहीं, इतकाच प्रथम न्यायाधीशांनीं निर्णय करावा. नंतर कैदी गुन्हेगार असें ठरल्यावर, त्यास अमुक शिक्षा असावी म्हणून वादीनें सांगावें, व मला अमुक शिक्षा योग्य आहे असें कैदीनें सांगावें आणि त्या दोन्ही म्हणण्याचा विचार करून न्यायाधीशांनीं त्या दोहींतून एक शिक्षा ठरवावी. त्यावरून त्यांनीं साक्रेतिसास सांगितलें कीं, ठार मारण्याच्या जागीं मला हद्दपार जाणें, दंड देणें, किंवा कैदेंत राहणें, ह्यांतून एखादी शिक्षा द्यावी असा सभेस तूं अर्ज केल्यास, सभा तो अर्ज मान्य करून तुझ्या इच्छेप्रमाणें करील. त्यावर त्यानें असें मोठें दिलदारीचें उत्तर दिलें: कीं, तुम्हीं सांगितलेल्या शिक्षांपैकीं एकहि शिक्षा मी मान्य करीत.

नाहीं; कां तर, तसें करण्यांत मी आपल्या तोंडानें आपणांस दोषी ठरविलें असें होईल. अहो अथेन्सकरहो, ज्या अर्थी तुम्हीं मजकडूनच माझ्या अपराधानुरूप मला शिक्षा ठरवीत आहां, त्या अर्थी आतां तुम्हांस मी फार वेळ ताटकळत ठेवीत नाहीं; सावधान चित्त होऊन ऐका. मीं आपला सर्व जन्म तुम्हांस व तुमच्या मुलांस शिकविण्यांत घालविला, व त्याकरितां सर्व घरगुती कामें सोडून दिलीं, व सर्व सरकारी चाकऱ्या व पदव्या ह्यांकडे दुर्लक्ष केलें, व आपल्या शहरच्या लोकांना सदाचरणी करण्यासाठीं रात्रंदिवस श्रम करून स्वदेशाचें कल्याण केलें. हीं कृत्यें केल्याबद्दल मी आपणास अपराधी ठरवितों, व ह्या अपराधाबद्दल मी आपणास अशी शिक्षा ठरवितों कीं, जन्मपर्यंत माझा खर्च सरकारांतून चालवून मला ह्या तुमच्या प्रितानियम नामक न्यायसभेंत सर्व न्यायाधीशांचा अध्यक्ष करून ठेवावें; ह्या माझ्या अपराधास ही शिक्षा असावी असें माझें मत आहे! हें त्याचें शेवटलें वाक्य ऐकून न्यायाधीशांचें पित्त असें खवळलें कीं, त्यांनीं तत्काळ हेम्लाक नामक विष पाजून त्यास ठार मारावें, असा हुकूम दिला!

सभेचा असा कडक हुकूम झाला, तरी तेणेंकरून साक्रेतिसाचें धैर्य तिळमात्रहि ढळलें नाहीं! तो यत्किंचितहि न घाबरतां स्वस्थपणें न्यायाधीशांना असें म्हणाला कीं, महाराज, आपल्या आज्ञेनें मी मरणाची शिक्षा भोगावयाला जातों, पण ही एक शिक्षा आपण मला अपूर्व केली असें नाहीं. ही मी जन्मास आलों त्या वेळेस माझ्या कपाळीं देवानेंच लिहून ठेविली होती; परंतु मजवर हकनाहक ज्यांनीं बालंट घेतलें आहे, त्यांचा, सत्यपक्षपाती जो ईश्वर त्याच्या सत्तेनें ह्या अन्यायापासून व अपकीर्तीपासून माझ्यापेक्षां कमी नाश होणार नाहीं; अधिक होईल. अहो, तुम्हांस असें वाटत होतें काय, कीं मी तुमच्या हातून मोकळा होण्याकरितां लोकांसारखें तुमचें आर्जव करीन; व करुणा यावयाजोगीं दीन भाषणें बोलेन, व शरणागतासारखा फार भिऊन हलकेपणानें तुमच्या पुढें वागेन?

तुम्हांस काय वाटत असेल तें वाटो; परंतु मला तर असें वाटतें कीं, जो मनुष्य भला आहे, त्यास लढाईंत जसें अयोग्य उपायांनीं पळून शत्रूंस पाठ दाखवून आपल्या जिवाचा बचाव करणें योग्य नाहीं, तसें न्यायसभेंतील चौकशींतहि तसें करणें योग्य नाहीं. मजवर जसें सांप्रत संकट पडलें आहे, असें संकट आलें असतां, लोक आर्जव करून डोळ्यांत आंसवें आणून, व ह्याच

प्रकारचे दुसरे पाजीपणाचे उपाय योजून, आपले जीव वांचवितात, असें ह्या सभेंत नेहमीं आढळतें; परंतु असें करणें जसें खऱ्या शूरास अपमानदायक आहे, तसें नेकीच्या सर्व पुरुषांनाहि अपमानदायक आहे.

आपालोढारेन म्हणून एक साक्रेतिसाचा परम मित्र व शिष्य होता. तो त्यास असा हुकूम झालेला ऐकून त्याच्या जवळ जाऊन त्यास म्हणाला, 'अहो, निरपराध तुम्ही मरतां हें पाहून मला खेद होतो.' साक्रेतिसानें हंसून त्यास उत्तर दिलें, तर, बाबा, तुझ्या मनांत काय मीं अपराधी असून मरावें?

प्लूतार्क नामक ग्रंथकारानें, आपणा मनुष्याचा शरीररूप जो अत्यंत क्षुल्लक भाग आहे, त्यावर मात्र दुसऱ्याचा अंमल चालतो; परंतु आपला दुसरा भाग जो जीव आहे, तो पहिल्या भागापेक्षां फारच श्रेष्ठ आहे; त्याचा नाश करीन ही कोणाची धमकी चालावयाची नाहीं; व तो कोणास उपद्रव करण्यास सांपडावयाचा नाहीं; हा अर्थ सिद्ध करून दाखविण्याकरितां साक्रेतिसानें ह्या प्रसंगीं बोललेलीं उत्कृष्ट वाक्यें आपल्या ग्रंथांत लिहून ठेविलीं आहेत, तीं वाक्यें साक्रेतीस आपणावर फिर्याद करणाऱ्यांस लक्षून बोलला आहे; परंतु तीं वाक्यें फिर्याद करणाऱ्यांपेक्षां न्यायाधीशांस चांगलीं लागूं आहेत. तीं वाक्यें येणेंप्रमाणें:—अनितस आणि मिलितस हे मला ठार मारोत; परंतु त्यांस मला उपद्रव करण्याचें सामर्थ्य नाहीं. ह्या वाक्याचा अभिप्राय असा कीं, नशीब हें धन, दौलत, आरोग्य, जीवन, इत्यादि जी माझ्या शरीराची क्षणभंगुर संपत्ति तिचें हरण करील; परंतु ह्यांत माझा फारसा तोटा नाहीं. कां कीं, मी शरीर नव्हे, तर मी अजरामर आत्मा आहें; व सदाचरण, निर्दोषपणा, औदार्य, इत्यादि जी माझी अंतरंग उत्तम संपत्ति आहे, ती बलात्कारानें मजपासून हरून घेण्यास बाहेरील नशीब वगैरे कोणीहि समर्थ नाहींत.

हा थोर मनुष्य, गड्यांनो, ज्ञात्यानें पापावांचून दुसऱ्या कशास कदापि भिऊं नये, असें आपल्या शिष्यांना वारंवार पढवीत असे, व त्याविषयीं त्याची पक्की खातरी होऊन गेली होती; ह्यास्तव त्यानें असा विचार केला कीं, लोक आपणास न्यायाधीशांची पायधरणी करायास सांगतात, त्यांचें ऐकून तसें नीच आचरण करावें, आणि तेणेंकरून चिरकालपर्यंत आपला अपमान करून घेऊन, इतकीं वर्षें नीट वागून मिळविलेल्या प्रतिष्ठेस एका पाव घटकेंत काळोखी आणावी, ह्यापेक्षां आपण आजपासून पुढें जीं कांहीं थोडीं वर्षें वांचूं असें वाटतें, त्या वर्षांची आशा सोडून देऊन आजच मरावें हें फार चांगलें आहे!

आजचे लोक मला पुरतेपणें जाणत नाहींत, परंतु पुढील लोक ह्या माझ्या स्वरूपाची पुरतेपणीं पारख करतील असा त्याचा निश्चय होता. ह्या प्रकारें

त्या सुज्ञ व चतुर पुरुषानें फार उतार झालेल्या वयाचा थोडासा अवशेष उदारपणें खर्चून असें दिव्य यश मिळविलें कीं, जेणेंकरून पुढील लोकांस त्याची मोठी वाहवा होऊन गेली.

---

# अध्याय सातवा.

**साक्रेतिसानें तुरुंगांतून पळून जाणें नाकबूल केलें; आत्मा नित्य आहे; ह्या विपयांवर आपल्या मित्राबरोबर संभाषण करून त्यांत त्यानें आयुष्याचा शेवटचा दिवस घालविला; तो विष प्याला; तो मृत्यु पावल्यानंतर त्यावर मिथ्या अपवाद घेणाऱ्याचे उगीच आळ घेतल्याबद्दल पारिपत्य झालें; आणि मेल्यावर त्यास मोठी प्रतिष्ठा मिळाली; हा विपय ह्या अध्यायांत आहे.**

हा हुकूम साक्रेतिसास झाल्यावर तो जशा निर्भय मुद्रेनें, त्या जुलमी अंमलदारांना * धाकांत राखीत असे, तशा निर्भय मुद्रेनें तो तुरुंगांत गेला. सिनेका नामें रोमन ग्रंथकार असें लिहितो कीं, साक्रेतीस तुरुंगांत गेल्यापासून त्याचें तुरुंग हें नांव जाऊन, सदाचरण व प्रामाणिकपणा ह्यांचें स्थान, असें नांव त्यास प्राप्त झालें. साक्रेतिसाच्या मागून त्याचे मित्रही तुरुंगांत गेले, व हा हुकूम झाल्या दिवसापासून पुढें तीस दिवसांनीं साक्रेतिसास विष पाजलें, तितके दिवस ते त्यास भेटावयास नेहमीं तेथें जात असत. हुकूम अंमलांत आणावयास इतका विलंब होण्याचें कारण असें होतें कीं, देलोस नामें एक बेट असे, तेथील देवास बळी देण्यास अथेन्सकर दरसाल सर्व सामुग्री आंत भरून एक गलबत पाठवीत असत. व त्या लोकांचा कायदा असा होता कीं, हें गलबत तयार होऊन रवाना झाल्यापासून पुनः परत येईपर्यंत शहरांत कोणा एकासहि जिवें मारूं नये.

साक्रेतिसास ही शिक्षा सांगितल्याच्या आदल्या दिवशीं तें गलबत रवाना झालें होतें; ह्यास्तव, तें परत येण्यास तीस दिवस लागले. तितके दिवस हा हुकूम बजावावयाचें तहकूब करणें अगत्य पडलें.

हा जो मध्यें बहुत वेळ गेला, या वेळांत साक्रेतिसास आपला सर्व भयंकरपणा दाखविण्यास मृत्यूस चांगली सवड सांपडली होती.. इतक्या वेळांत त्याच्या अंगचें धैर्य खूप कसोटीस लागलें असावें; व ही पारख, केवळ

---

* अथेन्सांत लिसांदरानें जुलमी तीस अंमलदार नेमले होते म्हणून सांगितलें, ते अंमलदार साक्रेतिसास त्याच्या निःस्पृहतेमुळें फार भीत असत.

त्यास अंधारकोठडींत हाल भोगावे लागले, व पायांत बिड्या पडल्या होत्या त्या सोसाव्या लागल्या, तेवढ्यानेंच झाली असें नाहीं; तर प्राण्यास ज्या गोष्टीचा तिटकारा स्वभावतः नेहमीं येतो; अशी जी गोष्ट ( मरण ), ती त्याच्या रात्रंदिवस डोळ्यांपुढें दिसत होती; ती आपणास आतां घडती, मग घडती; असें त्यास वाटत होतें, तेणेंकरूनही झाली. असा प्रसंग आला असतांही त्याच्या मनाची रोजची जी आनंदवृत्ति असे ती होती तशीच होती; तींत काडीमात्रहि अंतर पडलें नाहीं. तो आपल्या मित्रांशीं संभाषण करीत असतां नेहमीं जी आपली समाधानवृत्ति प्रकट करी, तशाच समाधानवृत्तीनें तो त्यांशीं तशा प्रसंगींहि संभाषण करी. क्रेतो म्हणून त्याचा एक मित्र होता, त्यानें असें सांगितलें आहे कीं, उद्यां मरावयाचें तरी साक्रेतीस आज रात्रीं नित्याप्रमाणें खुशाल गाढ निजला होता. त्यानें त्या दिवशीं अपालो नामक देवाचें व दायेना नामक देवीचें एक स्तोत्र रचिलें, व इसापनीतींतील एका गोष्टीचे श्लोक बांधिले. देलोस येथून गलबत येऊन पोहोंचणार त्या दिवशीं किंवा त्याच्या आदल्या दिवशीं, त्याचा जिवलग मित्र जो क्रेतो, तो मोठ्या सकाळीं त्याजकडे गेला, आणि त्यास तें गलबत येण्याचें वाईट वर्तमान कळवून म्हणाला कीं, हा तुरुंग सोडून आपला प्राण वांचवावयाचें केवळ आपल्या हातीं आहे. आम्हीं तुरुंगावरचा मुख्य कामगार अनुकूल करून घेतला आहे. आपण जाल त्या वेळेस तुरुंगाचे दरवाजे खुले असतील. आपण येथून निघून गुपचिपपणें थिसली प्रांतीं जाऊन तेथें स्वस्थ रहावें. वाटेनें जातांना आपल्या केंसास सुद्धां धक्का लागणार नाहीं, याप्रमाणें आम्हीं सर्व तयारी यथास्थित केली आहे. आपण कृपा करून आमची विनंति अवश्य मान्य केली पाहिजे. हें क्रेतोचें भाषण ऐकून साक्रेतिसास हसूं आलें, आणि तो म्हणाला, 'बाबा क्रेतो, ह्या आतिका* प्रांताबाहेर जेथें लोक मरत नाहींत, अशी एकादी जागा तुला विदित आहे काय ?' हें विनोदाचें भाषण ऐकून क्रेतोस हंसूं आलें नाहीं. तो म्हणाला, 'महाराज, ही गोष्ट ऐकिलीच पाहिजे; सोन्यासारखी ही सवड आली आहे, ही आपण फुकट घालवूं नये.' असा त्यानें त्याच्या गळीं पडून त्यास फारच आग्रह केला; व आपण सांगतों ह्या मसलतीस रुकार देऊन तुरुंग सोडण्यास त्यानें राजी व्हावें, ह्याविषयीं खूप प्रमाणावर प्रमाणें दाखविलीं. तो असें म्हणाला कीं, तुमच्यासारखा अमोलिक मित्र गमावल्याबद्दल जो मोठा शोक मला होईल, त्याविषयीं तर बोलावयास नकोच. ह्याखेरीज असें आहे कीं, क्रेतो जर साक्रेतिसास वांचवितां, तर तें त्याच्या स्वाधीन होतें; पण

---

*ज्या प्रांताची अथेन्स शहर राजधानी होती, त्या प्रांतास आतिका म्हणत.

जवळ इतका पैसा असतां ह्या गोष्टीकरितां त्यास थोडाहि पैसा खर्चावा असें वाटलें नाहीं, अशी जी माझी निंदा असंख्यात लोक करतील, ती मी कशी बरें सोसावी? आपण तुरुंग सोडला असतां आपणांस व दुसऱ्या कोणास उपद्रव होण्याचा अगदीं संभव नाहीं, असें दिसत असतांहि साक्रेतिसासारख्या ज्ञात्या पुरुषानें तुरुंग सोडला नाहीं, असें कोणास खरें तरी वाटेल काय? आपणास कदाचित् भय वाटत असेल कीं, न जाणों, एक करितां एक होऊन सरकारानें आपणाकरितां आपल्या मित्रांचीं घरेंदारें लुटलीं, त्यांस बंदींत घातलें, किंवा जिवें मारलें, तर काय करावें? परंतु, महाराज, मी आपणांस असें विचारतों कीं, आपल्या जिवापेक्षां अधिक मोलाची अशी आपल्या मित्रांना दुसरी कांहीं गोष्ट आहे काय? व असावी काय? मग इतके प्रिय जे आपण, ते गेल्यावर त्यांस घरदार, स्वातंत्र्य व प्राण ह्यांना घेऊन काय करावयाचें आहे? आपणावांचून तीं सर्व त्यांना व्यर्थ आहेत!

परदेशचे लोकसुद्धां, साक्रेतिसाचा जीव वांचविण्याचें यश तुम्हांसच घेऊं देणार नाहीं, आम्हीहि घेऊं, असें आम्हांशीं भांडत आहेत. त्यांतून पुष्कळ लोक तर, जें द्रव्य पडेल तें देऊन आपणांस गुपचिपपणें ह्या तुरुंगांतून काढून न्यावें ह्याच हेतूनें पैक्याच्या मोठमोठ्या थैल्या घेऊन येथें आले आहेत; व ते उघड असें बोलतात कीं, साक्रेतीस आमच्या देशांत येऊन त्याचा जर आमच्या हातून सन्मान झाला, व त्यास ज्या ज्या गोष्टीची गरज लागेल त्या त्या गोष्टीचा जर आमच्या हातून मनमुराद पुरवठा झाला, तर आम्ही मोठी प्रतिष्ठा मिळविली असें होईल. आपणांस ही ठार मारण्याची गैरवाजवी शिक्षा व्हावयास जे दुष्ट कारण झाले आहेत, त्या शत्रूंस हस्तगत होऊन बसून आपला खरा पक्ष बुडवावा, हें आपणांस उचित तरी आहे काय? आपल्या गांवकऱ्यांच्या हातून एकाद्या अनपराध्याचा वध होत आहे, तर तो दोष त्यांच्या हातून घडूं न देण्याची तजवीज आपल्या हातीं असल्यास ती करणें हा सदाचरणी व वाजवी मनुष्यांचा धर्म नव्हे काय? परंतु मी जीं हीं सर्व कारणें सांगितलीं, त्यांनीं जर आपलें मन फिरत नाहीं, व आपलें संरक्षण करण्याविषयीं आपणांस कांहींच कळकळ वाटत नाहीं, तर न वाटो; परंतु आपणांस मुलें आहेत, त्यांच्या हिताकडे तरी आपण लक्ष दिलें पाहिजे. खरेंच पहा, आपण जर आज मेलां, तर आपल्या मागें त्यांची काय अवस्था होईल बरें? पंडितपणाचा लौकिक मिळविण्यासाठीं बापाचा धर्म आपणांस मुळींच सोडतां येत नाहीं.

क्रेतोचें हें भाषण साक्रेतिसानें लक्ष लावून ऐकून घेतलें, आणि आपणाविषयीं ह्यास इतकी ममता आहे हें पाहून त्याविषयीं त्याची त्यानें स्तुति

केली, व त्याचा आपणांवर मोठा उपकार मानला; परंतु त्याचें म्हणणें मान्य करण्यापूर्वी तो असा विचार करूं लागला कीं, अथेन्सकरांच्या परवानगी-वांचून तुरुंगांतून निघून जाणें हें आपल्या प्रामाणिकपणास उचित आहे कीं नाहीं ? आणखी साक्रेतिसास विचार करावयाची गोष्ट इतकीच होती कीं, एकाद्या मनुष्यास ठार मारण्याची शिक्षा झाली आहे, परंतु ती शिक्षा अन्यायानें झाली आहे; आणि तो मनुष्य शिक्षा टाळण्याकरितां पळून गेला, तर तो अपराधी आहे कीं नाहीं ? ह्या स्थलीं विचार करण्याजोगी कांहीं गोष्ट आहे असें मनांत आणणारे लोक ह्या काळांत पाहूं गेल्यास फारच थोडे सांपडतील, असें आम्हांस वाटतें.

साक्रेतिसानें प्रकृत विषयास गैरलागू अशा सर्व गोष्टी एकीकडे काढून टाकून प्रकृत विषयाच्याच विचारास आरंभ केला. तो म्हणाला, " क्रेतो, मी हा तुरुंग सोडावा असें जर तूं मला सिद्ध करून दाखविलें तर मला खरोखरी मोठा आनंद होईल; परंतु तसें करणें नीट आहे अशी माझी खातरी तुमच्याकडून झाल्याखेरीज माझ्यानें ही जागा सोडवत नाहीं. आपणास एकादी गोष्ट करावयाची असतां, तीविषयीं लोक काय म्हणतात ह्याची काळजी वाळगण्याची आपणास अगदीं गरज नाहीं; तर ती गोष्ट वाजवी किंवा गैरवाजवी आहे, हा निवाडा करण्याचा अधिकार ज्यावांचून दुसऱ्या कोणास नाहीं असा जो एक सत्यपक्षपाती ईश्वर, तो, ही गोष्ट केली असतां आपणास काय म्हणेल ह्याची मात्र आपण काळजी करावी. द्रव्य, अब्रू, मुलें व बायका ह्यांचा नाश होईल म्हणून तूं मला बहुत सबबी सांगितल्या त्या खऱ्या; परंतु तुम्ही जी गोष्ट करायाला सांगतां, ती गोष्ट वाजवी आहे, असें तुम्ही मला दाखविल्यावांचून त्या सबबी नाहींसारख्याच आहेत. आपणां सर्वांस हा नियम मान्य आहे ( व हा कदापि फिरणार नाहीं ) कीं, जें काम गैरवाजवी आहे, त्याविषयीं मनुष्यें कांहीं म्हणोत, व त्यापासून कोणतेंहि कल्याण होवो, तें काम जो कोणी करील त्याची दुष्कीर्ति व नाश हीं झाल्यावांचून कदापि राहणार नाहींत. हा नियम मूळ धरून आपण आजपर्यंत वादविवाद करीत आलों व ह्यापासून कधीं तिळमात्रहि ढळलों नाहीं. लहान मुलांना एक व निश्चित मत नसतें, ह्यास्तव तीं जसें एकदम होय व नाहीं दोन्ही म्हणतात, तसें आपण उतार वयांत गंभीर विषयावर बोलत असतां करावें हें आपणांस योग्य आहे काय ? माझ्या जिवलगा क्रेतो, तर आपणांस कांहीं स्थिर व निश्चित नियम असावे हें बरें नव्हे ? असो.

" बरें आतां, क्रेतो, आपण इतके दिवस जे नियम ठरविले आहेत, त्या नियमांस, तुम्ही सांगतां ही गोष्ट अनुसरून आहे किंवा नाहीं, ह्याचा आपण

विचार करूं. आपणां सर्वांचा असा सिद्धांत आहे कीं, दुसऱ्यांशीं अन्यायानें वागणें, मग तें कोणत्याहि सबबीनें कां असेना, किंवा जे आपणांस उपद्रव देतात त्यांशीं कां असेना, कसें असलें तरी अन्यायानें वागणें, म्हटलें म्हणजे निषिद्ध आहे. तसेंच दुसऱ्यानें आपलें वाईट केलें म्हणून त्याचें आपण वाईट करणें हेंहि निषिद्धच आहे. 'अमुक करितो' असा शब्द आपल्या तोंडांतून एकदां निघून गेला, म्हणजे ती गोष्ट करण्याकरितां आपण शब्दानें बांधलें गेलों. कोणतें व कसेंहि हित असलें तरी त्याच्यासाठीं आपणांस दिलेलें वचन मोडतां येत नाहीं. असें मनांत आण कीं, मी तुरुंगांतून पळून जावयास सिद्ध झालों, आणि त्या संधीस ह्या संस्थानचे सर्व कायदे एकत्र गोळा होऊन मजपुढें मूर्तिमंत येऊन उभे राहिले, आणि मला जर त्यांनीं हे पुढील प्रश्न केले, तर त्यांस मीं काय उत्तरें द्यावीं बरें ? क्रेतो, ते प्रश्न असे कीं, 'साक्रेतिसा, हें तूं काय करतोस ? अरे, न्यायास भिऊन पळून जाणें म्हणजे, हें संस्थान व येथील कायदे जे आम्ही, त्यांस सफई बुडवून टाकणें नव्हे काय ? अरे, ज्या संस्थानांत न्यायाचें प्राबल्य नाहीं, इतकेंच नव्हे, तर उलट जेथील लोक न्यायाचा धिक्कार करून त्यांस मोडून टाकितात, तें संस्थान टिकेल, असें तुला वाटतें काय ?' आतां, त्या कायद्यांना द्यावयास मला एक उत्तर आहे कीं, ह्या संस्थानच्या सरकारनें मला ठार मारावें अशी गैरवाजवी शिक्षा ठरवून हें सरकार मजशीं अन्यायानें वागलें म्हणून मी तें सोडतों, असें मी म्हणेन खरें. परंतु कायदे ह्यावर असें म्हणतील कीं, 'ह्या संस्थानांत तूं ज्या अर्थीं राहिलास, त्या अर्थीं, येथील सरकार जो इनसाफ ठरवील, तो इनसाफ आपल्या स्वतःच्या विचारास विरुद्ध असला तरी मी आपला विचार एकीकडे ठेवून सरकारचा इनसाफ कबूल करीन अशी तुझी बोली संस्थानाशीं आहे, असें स्पष्ट सिद्ध होतें; तर ही बोली तूं विसरलास काय ? सर्व रयतेनें असें कबूल केल्यावांचून सरकारी अंमल चालावयाचा नाहीं. आम्ही कायदे व आमच्या संस्थानची अंमल करण्याची रीत जर तुला आवडत नव्हती, तर हा खटला तुजवर होण्यापूर्वी तूं हें संस्थान सोडून दुसऱ्या पाहिजे त्या ठिकाणीं जाऊन रहावयास मुखत्यार होतास; परंतु आज सत्तर वर्षें येथें तुझी वस्ती आहे, ह्यावरून स्पष्ट सिद्ध होतें कीं, येथील कायदे तुला वाईट वाटले नाहींत, तर त्वां पुऱ्या माहितीनें व स्वतःच्या अनुभवावरून आपण होऊन कायदे मान्य केले आहेस असें दिसतें. वस्तुगत्या पाहिलें असतां विद्या, धन वगैरे जें जें तुजपाशीं आहे, तें तें आम्हां कायद्यांमुळें तुजपाशीं आलें आहे व राहिलें आहे. साक्रेतिसा, तूं ह्या संस्थानाशीं जे संकेत केले आहेस व जे मी

पाळीन म्हणून अनेक शपथा वाहिल्या आहेस, ‘ते संकेत व त्या शपथा मोडण्यास तूं मुखत्यार आहेस काय ? ह्या संस्थानच्या सरकारानें तुझा नाश करावयाचें जरी योजिलें, तरी त्यानें आपलें वाईट केलें, व आपणास उपद्रव दिला, म्हणून त्याचें वाईट करणें व त्यास उपद्रव देणें तुला उचित आहे काय ? असें तूं आपल्या आईशीं किंवा बापाशीं वागशील ? तुला हें माहीत नाहीं काय, कीं ईश्वराच्या मतें, व सर्व मनुष्यांच्या मतें, मनुष्यास जन्मदेश आईबापांपेक्षां, किंबहुना सर्व सोयऱ्यांधायऱ्यांपेक्षां थोर व मान्य आहे, व त्यानें त्यास गौरविलें पाहिजे, आणि त्यानें मनस्वीपणानें जरी कांहीं सांगितलें, तरी तें ऐकिलें पाहिजे ? फार तर काय, पण त्यानें पीडा दिली असतांहि त्यांशीं ममतेनें व कृपाळूपणानें वागलें पाहिजे ! सारांश, आपला देश आपणाशीं अन्यायानें वागतो आहे, तर आपण मोठ्या विनयानें त्याची कानउघाडणी करून, व त्यास शहाणपणाच्या चार गोष्टी सांगून त्यास शुद्धीवर आणावें; शुद्धीवर न येईल तर तो जो हुकूम करील तो निमूटपणें शिरसा मान्य करावा हाच आपला धर्म होय. साक्रेतिसा, तूं आपल्या मुलांविषयीं जर काळजी करीत असशील, तर ती तूं करूं नको. तुझे मित्र आहेत, ते आपल्या हातून होईल तितकें त्यांचें कल्याण करितील आणि त्यांनीं कदाचित् न केलें तरी निदानचा जो सर्वपालक विश्वंभर, तो त्यास कधीं अंतर देणार नाहीं. ज्या देशानें तुला जन्म दिला, जेथें तूं लहानाचा मोठा झालास व जेथें तुला विद्या प्राप्त झाली, त्या देशांतील कायदे तुला जो बुद्धिवाद सांगतात, तो ऐकून त्यांवर भार ठेव. साक्रेतिसा, ह्या जगांत मुलेंबाळें वगैरे ज्या ज्या आपणांस प्रिय वस्तु आहेत, त्या तर काय, पण आपला प्राणसुद्धां प्रामाणिकपणापेक्षां मोठा मानूं नको. साक्रेतिसा, तूं असा वागलास, म्हणजे प्लूतोच्या * सभेंत तुझी चौकशी चालली असतां तेथील न्यायाधीशांस उत्तरें देण्यास तुला अडचण पडणार नाहीं; परंतु जर अन्यथा वागशील, तर आम्ही तुझे वैरी होऊन तुझ्या जिवांत जीव आहे तोंपर्यंत तुला क्षणभर देखील चैन पडूं देणार नाहीं; आणि तूं मेल्यावर, परलोकीं आमचे भाऊबंद जे दुसरे कायदे आहेत, ते तूं आमचा अपमान केला असें जाणून तुजवर कदापि अनुग्रह करणार नाहींत; तर तुझा नाशच करतील. ” ह्याप्रमाणें बोलून साक्रेतीस क्रेतोस म्हणाला, “ मला वाटतें कीं, मी जें बोललों, ह्याचा तुला पूर्ण बोध झाला व मीं जे हेतु दाखविले, ते तुझ्या मनांत चांगले पक्के ठसून आतां तुला ह्या विषयावर शंका काढावयास जागा उरली नाहीं. ” क्रेतोनें

---

* हिंदु लोक जसा यम हा नरकलोकाधिपति मानतात, तसें ग्रीक लोक प्लूतो नामें एक नरकाधिपति देव मानीत असत.

उत्तर केलें, " होय, खरोखरी नाहीं; तुम्ही म्हणतां हें सर्व वास्तविक आहे. " असें म्हणून तो निरुत्तर होऊन तेथून उठून आपल्या घरीं गेला.

शेवटीं, साक्रेतिसाच्या मृत्यूची पताकाच कीं काय असें जें देलोस बेटास गेलेलें गलबत, तें अथेन्स शहरास येऊन पोहोंचलें. तेव्हां दुसऱ्या दिवशीं मोठ्या सकाळीं प्लेतोखेरीज साक्रेतिसाचे सर्व मित्र त्याच्या भेटीस गेले. प्लेतो आजारी होता, म्हणून तो मात्र गेला नव्हता; परंतु तुरुंगवाल्यानें त्यांस सांगितलें कीं, तुरुंगाचे अकरा अंमलदार, तुला आज मरावयाचें, असें कैदीस कळविण्याकरितां आंत आले आहेत, म्हणून तुम्ही अंमळ बाहेर बसा. नंतर ते लवकरच आंत गेले आणि पाहतात तों साक्रेतिसाच्या पायांतल्या बिड्या काढल्या आहेत आणि तो व त्याची बायको जांतपी हीं शेजारीं बसलीं आहेत व तिनें आपल्या हातांवर मूल घेतलें आहे, असें त्यांच्या दृष्टीस पडलें. त्यांना पाहतांच तिनें मोठी किंकाळी फोडली आणि मोठ्यानें स्फुंदत, केंस तोडीत व हातानें तोंड बडवीत 'साक्रेतिसा, हे तुझे मित्र शेवटची भेट घ्यावयास आले आहेत ! ' असें म्हणून मोठ्यानें रडून तिनें सगळा तुरुंग दणाणून दिला ! नंतर साक्रेतिसानें, हिला येथून न्याल तर बरें होईल, असें म्हटल्यावरून त्याच्या मित्रांनीं तिला घरीं पोंचती केली.

साक्रेतिसानें नेहमींसारखें संतोषवृत्तीनें व स्वस्थपणें आपल्या मित्रांबरोबर संभाषण करून तो सर्व दिवस घालविला. त्या दिवसाचें संभाषण जीवाच्या नित्यत्वाविषयीं होतें. हा विषय फार उपयोगीं व त्या दिवसाच्या प्रसंगास उचित असा होता. हा विषय निघण्याचें कारण असें झालें कीं, ते बोलत असतां, सहज एकानें असा प्रश्न केला कीं, खरा जो पंडित आहे, त्यानें मरणाची इच्छा करणें व तें प्राप्त होण्याविषयीं श्रम करणें योग्य आहे किंवा कसें ? ह्या प्रश्नाचा केवळ अक्षरार्थ घेतला असतां त्या पंडितानें आत्महत्या करावी असा अर्थ स्पष्ट गर्भित होतो. साक्रेतिसानें उपपादन करून दाखविलें कीं, त्यानें असें करावें हें मत अत्यंत विरुद्ध आहे; कां तर, मनुष्यास ईश्वरानें स्वतः घडलें आहे, हा त्याचा आहे, व ह्या जगांत त्यास जी अवस्था प्राप्त झाली आहे, तींत त्यानें ह्यास स्वहस्तें ठेविलें आहे. ह्याकरितां त्याच्या परवानगीवांचून ह्यास ती अवस्था सोडतां येत नाहीं व त्याच्या आज्ञेवांचून हा लोक टाकतां येत नाहीं. जर टाकला, तर अन्यायानें वागल्याचा दोष त्याच्या माथ्यावर येईल. सर्व मनुष्यांची अशी गोष्ट असतां, पंडितांच्या मनांतच मरणाची आवड योग्य होण्यास कारण काय ? ह्या आवडीचें कारण म्हणून एकच आहे; आपण मरून परलोकीं गेल्यावर तेथें आपणांस अलौकिक सुख होईल, अशी त्यास आशा असते. आणि ह्या आशेस आधार म्हटला

म्हणजे, जीव नित्य आहे, त्याचा नाश कदापि होत नाहीं, हें मतच होय; दुसरा कांहीं आधार नाहीं. ह्याप्रमाणें जीवाच्या नित्यत्वावर त्याच्या भाषणाचा ओघ आला असतां, प्रौढ व अत्यंत उपयुक्त अशा ह्या विषयांवरील संभाषणानें आपल्या मित्रांस रंजवून साक्रेतिसानें आपल्या आयुष्याचा सरते शेवटचा दिवस घालविला. प्लेतोनें फीदन नामें जो संवादरूप एक चमत्कारिक ग्रंथ केला आहे, तो सर्व साक्रेतिसाच्या ह्या वेळच्या संभाषणांतील अर्थ घेऊन केला आहे. त्या ग्रंथांत साक्रेतिसानें आत्मा नित्य आहे ह्या मतास साधक जीं प्रमाणें दिलीं आहेत, तीं स्पष्ट करून दाखविलीं आहेत व ह्या मतावर ज्या शंका आहेत त्या सर्व खोडून टाकिल्या आहेत. ह्या ग्रंथांत ज्या शंका केल्या आहेत त्या आणि आज लोक त्या मतावर ज्या शंका घेतात त्या, बहुतकरून एकच आहेत. शंकांचीं उत्तरें देण्याच्या पूर्वीं साक्रेतिस म्हणाला आहे कीं, अहो, ही गोष्ट केवढी वाईट आहे कीं, कांहीं अज्ञानी पुरुष, कोणी जें कांहीं बोलेल, त्यास विरुद्ध बोलतात व प्रत्येक गोष्टीविषयीं संदेह घेतात, तेवढ्यावरून कांहींच निश्चित नाहीं, असें सर्व लोक म्हणतात! तो फिदनास म्हणतो, गड्या, ही दुर्दैवाची गोष्ट नव्हे काय ? ह्या जगांत असे कांहीं लोक आहेत कीं, ज्यांनीं कांहीं पोरकट भाषणें ऐकिलीं असतात, ज्या भाषणांत सर्व गोष्टी कधीं खऱ्या व कधीं खोट्या दिसतात आणि तशीं भाषणें ऐकल्यावरून चांगलीं सबळ व सहज समजण्याजोगीं प्रमाणें असतां त्यांना कोणतीहि गोष्ट खरीच वाटत नाहीं ! हे अप्रामाणिक आणि असमंजस पुरुष ह्यांनीं अज्ञानाबद्दल आपणांस दोष लावावा व आपण आमच्या बुद्धीच्या अल्पतेमुळें आम्हांस ही गोष्ट समजत नाहीं, असें त्यांनीं मनांत मानावें; तसें न करतां उलटें तीं प्रमाणें कोतीं आहेत, त्यामुळें आमची खातरी होत नाहीं, असें म्हणून शेवटीं त्या प्रमाणांचा तिरस्कार करूं लागतात. त्यांस असें वाटतें कीं, वस्तुमात्राचे ठायीं स्वभावतः वास्तविकपणा व निश्चयार्हता हीं कांहींच नाहींत व ही गोष्ट आम्हांसच समजली, दुसऱ्या कोणास समजली नाहीं, ह्याकरितां इतर लोकांच्यापेक्षां आमची विचारशक्ति व आमचें ज्ञान हीं फार मोठीं आहेत.

पुढें साक्रेतिसानें असें मानणें अन्याय होय, असें सिद्ध करून दाखविलें आहे. तो असें म्हणतो कीं, जर दोन गोष्टी आहेत व दोहींचाहि निश्चय होत नाहीं, तर तेथें शहाणपणा हाच कीं, जी गोष्ट स्वीकारली असतां हित फार व विपक्षीं अहित होण्याचा संभव कमी, ती गोष्ट स्वीकारावी. आतां आत्मा नित्य आहे; ह्याविषयीं मी ज्या प्रमाणांचा उपन्यास करितों, तीं खरीं असल्यास मी म्हणतों हें मानणें हितावह आहे; परंतु माझ्या मरणानंतर जरी तीं खोटीं झालीं, तरी हें मत अंगीकारल्यापासून इहलोकीं मला मोठा लाभ होईल. तो असा कीं, ह्या संसारांत मनुष्यमात्रास जीं दुःखें सामान्यतः प्राप्त

होतात, तीं तितकीं मला जाणवणार नाहींत. आत्मा नित्य आहे, ह्या मताची उपपत्ति करून साक्रेतीस थांबला नाहीं, तर तें मत सिद्ध झाल्याच्या पोटीं आचरणाचे जे उपयुक्त नियम सिद्ध होतात, त्यांचें निरूपण त्यानें केलें आहे; व परलोकीं अक्षय सुख होण्याची आशा पूर्ण होण्यासाठीं मनुष्यानें काय केलें पाहिजे, जें केलें असतां त्या आशेचा भंग होणार नाहीं, व मेल्यावर दुष्टास जो दंड होईल म्हणून सांगितलें आहे, तो दंड भोगावे लागणार नाहीं, ह्या विषयाचें चांगलें विवरण केलें आहे. मग परलोकीं मनुष्याच्या पापपुण्याचा निवाडा होतो; अक्षय्य नरकप्राप्तिरूप शिक्षा होते; व जे जीव निर्दोष व निष्पाप राहतात, किंवा जे पश्चात्तापेंकरून व समाधानवृत्तीचें अवलंबन करून स्वकृत अपराधाची निष्कृति करितात, त्यांस अनंत सुख व अक्षय शांति हीं प्राप्त होतात. ज्यांनीं लहान लहान पातकें केलीं असतात व ज्यांनीं त्यांचें प्रायश्चित्त केलें नसतें, अशा जीवांस धड सुखाची नव्हे व धड दुःखाची नव्हे, अशी एक अवस्था आहे तींत रहावें लागतें; तेथें राहण्यानें त्यांच्या पापाचें क्षालन होऊन ते शुद्ध होतात, इत्यादि अत्यंत महत्त्वाच्या गोष्टी त्या पंडितशिखामणीनें स्पष्ट करून दाखविल्या आहेत. तो आपल्या मित्रांस म्हणतो, गड्यांनो, तुम्हांस अजून एक गोष्ट सांगावयाची आहे, ती मानणें फार योग्य आहे. ती गोष्ट अशी कीं, आत्मा जर नित्य आहे, तर त्यास इहलोकीं व जेथें त्यास अनंत काळ रहावें लागेल त्या परलोकीं सुखप्राप्ति व्हावी म्हणून त्यास चांगल्या मार्गास लावण्यासाठीं आपणास फारच जपलें पाहिजे; कां कीं, ह्या गोष्टीची तिळमात्र उपेक्षा केल्यास त्या उपेक्षेचे जे घोर परिणाम भोगावयास लागतील, त्यास अंतपारच नाहीं. मनुष्य एकदां मेला म्हणजे गेला, त्याचें पुढें कांहींच उरत नाहीं, असें जर असतें, तर दुष्ट मोठे दैववान् झाले असते; कां तर ते मेले म्हणजे त्याबरोबर ते आपलें शरीर, आत्मा व पातकें ह्या सर्वांपासून मुक्त होते; परंतु ज्या अर्थी आत्मा नित्य आहे, त्या अर्थी सदाचरण केल्यावांचून व सद्विद्या प्राप्त करून घेतल्यावांचून स्वकृत पापापासून मुक्त होण्यास त्यांस दुसरा उपाय नाहीं. कां कीं, मनुष्य मेल्यावर त्याजबरोबर दुसरें कांहीं येत नाहीं. त्यानें केलेलें सदाचरण किंवा दुराचरण व त्याचे दुर्गुण हीं मात्र त्याबरोबर येतात. सदाचरणादिक हीं, मनुष्यास जी बरी वाईट शिक्षा लावली असते, तिचीं फळें होत. तींच परलोकीं त्याला अक्षय्य सुख किंवा दुःख प्राप्त होण्याचीं कारणें होतात. जीव देहांतून निघून गेल्यावर ते सर्व एकत्र जमण्याची एक जागा आहे, तेथें त्यास दीमन ( यमदूतासारखे कोणी देवयोनिविशेष आहेत, ते ) घेऊन जातात. मग ते तेथें पोहोंचल्यानंतर त्यांची चौकशी होते. ज्या माणसांनीं आपलें आयुष्य

केवळ धड सदाचरणांत घालविलें नाहीं व दुराचरणांतहि नाहीं, त्यांस एका स्थळीं पाठवितात. तेथें त्यांस त्यांच्या अपराधानुरूप दुःखें भोगावीं लागतात; आणि शेवटीं दुःखें भोगल्यानें त्यांच्या अंगचे सर्व दोष जाऊन ते शुद्ध झाले म्हणजे त्यांस स्वातंत्र्य प्राप्त होऊन, त्यांनीं ह्या मानवी शरीरांत जीं चांगलीं कर्मे केलीं असतात, त्यांचें चांगलें फळ त्यांस मिळतें. जे देवस्वापहार करितात, किंवा ह्यासारखे मोठमोठे घोर अपराध जाणूनबुजून व इच्छापूर्वक करितात आणि ह्यामुळें, हे कदापि शुद्ध व्हावयाचे नाहींत, असें ज्यांच्या चौकशीअंतीं ठरतें, त्यांस, अत्यंत निष्ठुर असा जो जीवमात्राचा न्यायकर्ता प्लुतो ( यम ), तो तार्तरसांत ( नरकांत ) झुगारून देतो. तेथून त्यांची सुटका कदापि होत नाहीं; व ज्यांचे अपराध तर फार मोठे आहेत, परंतु ते कांहीं पारिपत्य करून माफ करावयाजोगे आहेत, म्हणजे असें कीं, मोठ्या त्वेषानें वेडे होऊन ज्यांनीं आईबापांस मोठें दुःख दिलें आहे, किंवा त्यांस ठार मारलें आहे; पण ज्यांस पुढें आपल्या पातकाचा मोठा पश्चात्ताप झाला आहे, अशा मनुष्यांस, मागें सांगितलेल्या मनुष्यांस जो नरक प्राप्त होतो म्हणून सांगितलें तोच नरक प्राप्त होतो; परंतु त्यांनीं तेथें हाल व यातना भोगून व ज्यांस त्यांनीं पूर्वी पीडा केली असते त्यांची प्रार्थना करून त्यापासून ते मुक्त होतात.

आतां जे सुज्ञ पुरुष शुद्ध आचरणांत आपलें सर्व आयुष्य घालवितात, ते मरणानंतर जसें एखाद्या कारागृहांतून सुटावें तसें या नीच शरीरांतून सुटून देवलोकीं जाऊन तेथें देवांनीं सत्कारिले होत्साते वास करितात; आणि ते विद्येनें पवित्र झाले असतात, म्हणून ते त्या लोकीं निःशरीर होत्साते सर्वोत्कृष्ट आनंदाचा अनुभव घेतात; त्या आनंदाचें वर्णन करणें अशक्य आहे व ह्या वेळेस त्याचें विशेष विवरण करण्यास मला अवकाशहि नाहीं.

गड्यांनो, मला वाटतें कीं, मी इतका वेळ जें तुम्हांशीं भाषण केलें, हें इतकें पुष्कळ झालें. एवढ्यानें, मनुष्यमात्रानें जन्मभर क्षणमात्रहि हयगय न करितां सद्गुण व सद्विद्या हीं प्राप्त होण्याविषयीं अंतःकरणपूर्वक झटावें ही गोष्ट स्पष्ट सिद्ध होते. कां कीं, पहा बरें, ईश्वरानें असें वागण्याबद्दल आपणांस केवढें मोठें बक्षीस देण्याची योजना केली आहे! व तें बक्षीस प्राप्त होण्याबद्दल आपणांस केवढी मोठी आशा असावी! आतां आत्म्याची नित्यता तर स्पष्ट दिसते; परंतु तशी नसता ती संदिग्ध जरी असती, तरी जो ज्ञाता म्हणून आहे, त्यानें आपल्या मनाची अशी खात्री करावी कीं, ह्या विषयाचा पक्का निश्चय नाहीं; तरी सर्वदा ध्यास करून ही गोष्ट खरी मानणें व तदनुसार वागण्यास जे श्रम पडतील, ते भोगणें मला फार उचित दिसते. आपण बहुत वेळ धाडस करितों; परंतु आत्मा नित्य मानून सदाचरण

करण्याविषयीं धाडस करणें जसें प्रतिष्ठा देणारें आहे, तसें प्रतिष्ठा देणारें धाडस दुसरें कोणतें आहे बरें ? एरवीं आशा वाईट खरी; परंतु आपला जीव अमर आहे, व सदाचरण केलें असतां आपणांस अक्षय सुखप्राप्ति होईल, अशी जी आशा आहे ती फारच उत्तम आहे. ह्या आशेस आपण सर्वांनीं भुलावें ही गोष्ट तुमच्या मनांत चांगली बिंबवून द्यावी म्हणून मीं संभाषण इतकें लांबाविलें.

साक्रेतिसानें सांगितलेल्या गोष्टी सिसरोनें आपल्या लिहिण्याच्या चालीप्रमाणें फार रस आणून लिहिलेल्या आहेत; सिसरो आपल्या ग्रंथांत लिहितो कीं, ज्या वेळीं साक्रेतिसानें तो प्राणघातक विषाचा पेला हातीं घेतला त्या वेळेस त्यानें जें भाषण केलें त्यावरून असें दिसलें कीं, हें विष पाजून हे दुष्ट अथेन्सकर मजवर मोठा जुलूम करितात असें नाहीं; तर हे लोक मजवर कृपा करून मला आनंदलोकीं जाण्यास हा मृत्युरूप मार्ग खुला करून देतात, असें त्यास वाटलें. तो म्हणाला कीं, आपण हा लोक सोडला म्हणजे आपल्या आत्म्यास दोन मार्ग लागतात, एक मार्ग असा कीं, ज्या मार्गानें, जे जीव इहलोकीं, कुत्सित विषयसुखास लंपट होऊन किंवा मोठमोठीं पापकर्में करून आपणांस भ्रष्ट करितात, ते अक्षय्य नरकास जातात, दुसरा जो मार्ग आहे, त्यानें जे जीव येथें पृथ्वीवर सदाचरण करितात व आपला पवित्रपणा राखतात ते सुखमय देवलोकास जातात. साक्रेतिसाचें बोलणें आटपल्यानंतर क्रेतोनें त्यास विचारलें, महाराज, मला व आपल्या दुसऱ्या मित्रांस आपल्या मुलाबाळांविषयीं व घरगुती कामांविषयीं जें काय सांगावयाचें असेल, तें सांगावें; म्हणजे आपला हा शेवटचा हुकूम बजावून आम्हीं आपल्या मर्जीप्रमाणें वागून आपणास संतुष्ट केलें, असें चित्ताचें समाधान करण्यास आम्हांस जागा होईल. साक्रेतीस म्हणाला, बाबांनो, आजपर्यंत जें तुम्हांस सांगत आलों त्यापेक्षां अधिक कांहीं मला सांगावयाचें नाहीं. आपणांस चांगलें जपा, म्हणजे झालें. तुम्हांस आपलें कल्याण करून घेण्यास किंवा मला संतोष वगैरे देण्यास असें करण्यापेक्षां दुसरा कोणताहि मार्ग नाहीं. नंतर क्रेतोनें पुनः विचारलें कीं, आपणास कशी काय मूठमाती द्यावी ? साक्रेतिसानें उत्तर केलें, तुमच्या मर्जीस येईल तशी; परंतु हातांतून निसटून जाऊं न देतां तुम्हांस मला पकडतां आलें तर ! असें विनोदी भाषण करून तो आपल्या मित्रांकडे अवलोकन करीत होत्साता हंसत हंसत म्हणाला, काय करावें, तुम्हांबरोबर जो बोलतो, व जो आपल्या भाषणाच्या निरनिराळ्या भागांची रचना करितो, तो साक्रेतीस होय. हें हाडामांसाचें शरीर साक्रेतीस नव्हे, ही गोष्ट मला क्रेतोच्या मनांत भरवून देतां येत नाहीं; कां कीं, ह्यास सर्वदा असें वाटतें कीं, अंमळशानें मरून जमिनीवर पडणारा जो देह, हाच साक्रेतीस होय ! हा वेडा मला हाडा–

मांसाचा गोळा समजतो, आणि विचारतो कीं, तुम्हांस कसें काय पुरावें? असें बोलून तो उठला. आणि शेजारींच एक खोली होती तेथें स्नानास गेला. त्याचें स्नान झाल्यावर त्याचीं मुलें त्यास भेटावयास आणिलीं; तीं तीन होतीं. त्यांपैकीं एक चांगलें जाणतें होतें, व दोन अज्ञान होतीं; तो कांहीं वेळ त्यांजबरोबर बोलल्यावर त्यानें त्यांचें पालन करणाऱ्या बायांस त्याविषयीं सांगावयाचें होतें तें सांगून त्यांस घरीं लावून दिलें. नंतर आपल्या खोलींत येऊन तो बिछान्यावर पडला.

इतक्यांत तुरुंगाच्या अंमलदाराचा चाकर येऊन त्यानें त्यास कळविलें कीं, विष पिण्याची वेळ आली!

ह्या प्रसंगीं तो चाकर दुःखानें अत्यंत व्याकुळ होऊन पाठमोरा होऊन ढळढळां रडूं लागला. साक्रेतीस तें पाहून म्हणाला, पहा, हा मनुष्य किती सुजन आहे! मी कैदी झाल्यापासून हा मला भेटावयास व माझ्याशीं संभाषण करावयास वारंवार येत असतो. येथें ह्याच्या बरोबरीचे जे दुसरे कामावर आहेत, त्या सर्वांपेक्षां हा फारच योग्य आहे. हा बापडा मजकरितां कसा मनापासून रडतो आहे पहा!

ही चाकराची गोष्ट चांगली लक्ष्यांत ठेवण्याजोगी आहे. ज्यांस ह्या मनुष्यासारखीं कामें असतील, त्यांनीं सामान्यतः कैद्यांशीं व प्रसंगवशात् थोर मनुष्य त्यांच्या ताब्यांत आलें असतां विशेषेंकरून त्यांशीं आपण कसें वर्तावें, हें ही गोष्ट वाचून शिकावें. असो. नंतर तो प्राणघातक विषाचा पेला आल्यावर, आतां हें विष प्याल्यानंतर काय केलें पाहिजे, असें साक्रेतिसानें त्या चाकरास पुसलें. चाकरानें सांगितलें कीं, महाराज, कांहीं नको. आपण हें विष प्याला कीं लागलेंच इकडे तिकडे फिरावें, आणि पाय दमले असें वाटूं लागलें म्हणजे आपल्या अंथरुणावर पडावें, म्हणजे झालें! मग साक्रेतिसानें स्वस्थपणें तो विषाचा पेला उचलून हातीं घेतला, आणि चाकरास विचारलें, काय बाबा, कसें काय? ह्या विषांतून कोणी एखाद्यानें लिबेशन* केलें, तर त्यास परवानगी आहे कीं नाहीं? परंतु, हें आपणांस घेण्यापुरतें मात्र आहे, अधिक नाहीं, असें चाकरानें सांगितल्यावरून तो म्हणाला, बरें, लिबेशन नाहीं तर नाहीं, निदान आपला धर्म आहे त्याप्रमाणें देवाची प्रार्थना करून त्यांनीं आपला शेवट गोड करावा, अशी त्यापाशीं प्रार्थना करण्यास काय चिंता आहे? हें खुशाल करावें. असें बोलून तो कांहीं वेळ स्तब्ध राहिला आणि

---

* लिबेशन म्हणजे हल्लीं ब्राह्मणांत जशा चित्राहुति घालण्याचा विधि आहे, तसा प्राचीन ग्रीक लोकांत ते कांहीं पदार्थ पिऊं लागले म्हणजे त्या द्रव्यांतून कांहीं थोडेंसें देवतोद्देशानें जमिनीवर ओतण्याचा विधि असे, त्या ओतण्यास लिबेशन म्हणतात.

मग विष प्याला. भावनामात्रेंकरून अंगावर रोमांच आणणारा जो हा प्रसंग, ह्या प्रसंगीं त्या गंभीर व लोकोत्तर पुरुषानें आपल्या शांत मुद्रेनें जी अंतः-करणाची स्वस्थता प्रकट केली, ती शब्दांनीं सांगणें लांबच आहे, परंतु तिची मनांत कल्पना करणें सुद्धां फार कठीण आहे!

इतका वेळपर्यंत त्याच्या मित्रांनीं मोठ्या जुलुमानें अश्रु थांबवून धरले होते; पण त्यानें विष प्राशन केल्यावर त्यांचें देहभान अगदीं सुटून ते उच्च स्वरानें रडूं लागले. त्या मित्रमंडळींत त्याला दोरस नामें एक मित्र होता. त्याची अशी अवस्था झाली होती कीं, साक्रेतिसाचा वर लिहिलेला संवाद चालला असतां सर्व संवादभर त्या दोरसाच्या डोळ्यांवाटे एकसारखें पाणी चाललें होतें. तो ह्या प्रसंगीं मोठ्यानें किंकाळ्या फोडून असा कांहीं अतिशय विलाप करूं लागला कीं, तो ऐकून त्या सर्व मंडळींचीं अंतःकरणें फुटून गेलीं. परंतु त्या सर्व समाजांत ज्याच्या चित्तास कांहींएक व्यथा झाली नव्हती असा एक साक्रेतीस मात्र होता. त्यानें उलट आपल्या मित्रांस शोक करितांना थांबविलें. आतां हें त्याचें थांबविणें इतरांच्यासारखें कठोरपणाचें नव्हतें. तर त्याच्या चालीप्रमाणें गोडीगुलाबीचें होतें. तो त्यास म्हणाला, गड्यांनो, तुम्हीं हें मांडलें आहे तरी काय? तुमचें हें वर्तन पाहून मला चमत्कार वाटतो. अरे, तुमचें धैर्य गेलें तरी कोठें? बायकांस मनोनिग्रह नसतो, म्हणून त्या असल्या प्रसंगीं गोंधळ करितात. तो गोंधळ होऊं नये म्हणून मीं मघां-शींच त्यांस घरीं लावून दिलें. मीं बहुतांच्या तोंडून ऐकिलें आहे कीं, मनु-ष्यानें देवांचे उपकार आठवून त्यांची स्तुति करीत होत्साता मोठ्या स्वस्थपणें प्राण सोडावे. ह्याकरितां माझें तुम्हां सर्वांपाशीं मागणें हेंच आहे कीं, तुम्ही उगे रहा; आणि आपल्या अंगचा धीरपणा अंमळ अधिक प्रगट करा. म्हणजे मी स्वस्थ होईन. साक्रेतिसाच्या तोंडचे हे शब्द ऐकून सर्व लज्जित झाले; आणि त्यांस उगेंच राहणें-भाग पडलें.

हें भाषण चाललें असतां साक्रेतिसाचें इकडून तिकडे आणि तिकडून इकडे फिरणें चाललें होतें. मग आपले पाय दमले असें पाहून तो सांगितल्याप्रमाणें बिछान्यावर उताणा निजला. मग तें विष उत्तरोत्तर अधिक अधिक आपला गुण करूं लागलें. नंतर तें काळजांस भिनूं लागलें असें पाहून, मरावयाच्या वेळीं आपणांस त्रास होऊं नये म्हणून तो क्रेतोस म्हणाला, क्रेतो, आपण एसक्युलेप्यसास ( धन्वंतऱ्यास ) मरते वेळेस एक कोंबडा बळी द्यावा असें आहे; ह्याकरितां तुला सांगतों कीं, तूं तेवढा बळी माझ्या नांवें दे, विसरूं नको बरें. साक्रेतिसाचें हें सरते शेवटचें भाषण होतें; हें बोलणें झाल्यानंतर त्यानें लवकरच देह सोडला. नंतर क्रेतोनें जवळ जाऊन त्याचे डोळे व तोंड झांकलें. ह्याप्रमाणें साक्रेतिसाचा शेवट झाला. ही गोष्ट शालिवाहन

शकाच्या पूर्वी ५५७ व्या वर्षी घडली. त्या वेळेस साक्रेतिसाचें वय ७० वर्षांचें होतें. सिसरो म्हणतो कीं, प्लेतोनें केलेल्या साक्रेतिसाच्या मरणाचें वर्णन वाचतांना डोळ्यांस आंसवें आल्यावांचून रहात नाहींत, डोळ्यांस पाणी येतेंच येतें.

साक्रेतीस मेल्यावर, त्याला मारूनहि त्याच्यावर आळ घेणारांचा कोप शांत झाला नाहीं, तेव्हां ते आपलाहि नाश करतील असें भय वाटून प्लेतो व साक्रेतिसाचे दुसरे मित्र अथेन्स शहर सोडून मैगारा संस्थानांत युक्लिदाच्या घरीं गेले, आणि उठलेलें वादळ शांत होईपर्यंत तेथेंच राहिले होते. ह्याप्रमाणें सर्व भ्याले, एक युरिपैदीस मात्र भ्याला नाहीं. त्यानें अथेन्सच्या लोकांस सर्वांत अत्यंत उत्तम मनुष्य जो साक्रेतीस ह्यास असल्या क्षुल्लक सबबीवरून तुम्ही मरणाची शिक्षा केली हा मोठा अन्याय केला, असा दोष लावावा ह्या हेतूनें पालामिदीस नामक एक शोकरसप्रधान नाटक रचिलें. त्या नाटकांतील नायक जो पालामिदीस ह्यासहि नीच लोकांनीं त्याजवर खोटा आळ घेऊन मारिलें होतें. हा पुरुष उगीच पुढें करून कवीनें त्या नाटकांत वस्तुतः आपला मित्र साक्रेतीस ह्याच्या मरणाविषयीं खेद केला होता. त्या नाटकांत सोंगाड्यानें वतावणी करतां करतां,—

"अवघ्या ग्रीकांमाजीं नाहीं न्यायानुवर्ति ज्या ऐसा,
त्यातें मारायाची शिक्षा तुम्ही समस्त देत असा!"

ही आर्या उच्चारितांच रंगमंडपांतील सर्व लोकांस प्रसिद्ध न्यायानुवर्तित्वगुणावरून साक्रेतिसाचें स्मरण होऊन त्यांच्या डोळ्यांवाटे शोकाश्रूंच्या धारा चालूं लागल्या; आणि साक्रेतीस फार चांगला मनुष्य होता, त्यास सरकारनें व्यर्थ मारिलें, असा गवगवा इतका मोठा झाला कीं, साक्रेतिसाचें नांव कोणीं प्रसिद्धपणें काढूं नये, काढल्यास दंड होईल, असा सरकारास नवा कायदा करावा लागला!

कोणी असें म्हणतात कीं, युरिपैदीस हा साक्रेतिसाच्या अगोदर मरण पावला होता, ह्याकरितां त्यानें नाटक केलें, वगैरे सर्व गोष्ट खोटी आहे.

आतां हें काय असेल तें असो, इतकें खरें कीं, साक्रेतीस मेल्यावर कांहीं दिवसपर्यंत अथेन्सच्या लोकांचे डोळे उघडले नाहींत. पुढें कांहीं दिवसांनीं त्याविषयीं त्यांच्या मनांत जो द्वेष होता तो सर्व गेल्यावर, व त्यांनीं स्वस्थपणें त्याविषयीं विचार केल्यावर आपण त्या सज्जनास मारिलें हा आपल्या हातून मोठा घोर अन्याय घडला, असें त्यांस स्पष्ट दिसूं लागलें. मग कांहीं दिवसपर्यंत त्या शहरांत साक्रेतिसाच्या स्तुतीखेरीज दुसरी कांहीं गोष्ट ऐकूं येईनाशी झाली. विद्यालयांत, लोकांच्या घरोघर, लोकांचे सहल करावयास जाण्याचे जे रस्ते असत तेथें बाजारांत, जेथें जावें तेथें साक्रेतिसाच्या तोंडचा प्रिय व गोड असा सूर तोच, अद्यापि घुमत आहे असें लोकांस वाटूं लागलें. अहो, ह्या स्थळीं साक्रेतिसानें आपल्या शहराच्या उमेदवार लोकांत चांगल्या रीतीनें वागण्याच्या चाली लावून तरबेज केलें; ह्या स्थळीं त्यानें आपल्या लहान लहान

मुलांस आपल्या देशावर प्रीति करण्यास व आपल्या आईबापांस सन्मान देण्यास शिकविलें. ह्या जागीं त्यानें आम्हांस मोठ्या चमत्कारिक व उत्कृष्ट गोष्टींचा उपदेश केला; व येथें तो आमच्या अंतःकरणांत सदाचरण करण्याची व सद्गुण संपादन करण्याची विशेष हौस उत्पन्न व्हावी ह्या हेतूनें योग्य प्रसंग आला असतां कधीं कधीं आम्हांस दोषहि लावीत असे; आणि जो आमच्या इतका उपयोगी पडला, त्यास त्या उपकारांचें आम्हीं फारच चांगलें बक्षीस दिलें ! आम्हां दुष्टांत राहून बापडा प्राणास मुकला ! हाय ! हाय ! आम्ही केवढे हो कृतघ्न आहों ! आमच्या ह्या पापाचें ईश्वर आम्हांस काय दारुण फळ देईल तें देवो ! ह्याप्रमाणें सर्व अथेन्स शहरचें शहर पराकाष्ठेचें भय पावून मोठा विलाप करूं लागले. सर्व लोकांनीं आपलीं कामें तहकूब केलीं, साक्रेतिसांवर ज्यांनीं तुफान घेतलें होतें, त्यांस तुम्हीं निरपराधी मनुष्यास मारविलें. ह्याचें कारण काय तें सांगावें म्हणून सरकारांतून बोलावणें झालें; त्यांपैकीं मिलितसास जिवें मारण्याची शिक्षा झाली, व इतरांस हद्दपार करून दिलें. प्लुतार्क नामें ग्रंथकार असें लिहितो कीं, साक्रेतिसावर आळ घेण्याच्या दुष्ट व नीच कामांत ज्यांचें ज्यांचें म्हणून अंग होतें, त्यांचा अथेन्सचे लोक इतका राग करूं लागले कीं, त्यांस त्यांनीं विस्तव सुद्धां देऊं नये; त्यांनीं कांहीं विचारलें असतां त्याचें उत्तर करूं नये; फार तर काय, ते ज्या हमामखान्यांत न्हात त्यांत हे न्हात नसत. कदाचित् आपल्या हमामखान्यास त्यांचा स्पर्श झाला तर त्या जाग्यास आपण शिवलों तर आपणास विटाळ होईल म्हणून हमामखाना धुवून ते स्वच्छ करीत ! असें सर्व लोक वागूं लागल्यामुळें ते दुष्ट असे त्रासून गेले कीं, त्यांनीं लवकरच आपल्या हातांनीं आपणांसच मारून घेतलें.

अथेन्स शहराच्या लोकांचें साक्रेतिसाच्या वैऱ्यांचें पारिपत्य करून समाधान झालें नाहीं; त्यांनीं लिसिपस नामें एक मोठा विख्यात कारागीर होता, त्याजकडून साक्रेतिसाची पितळेची एक मूर्ति करवून शहरांत अत्यंत प्रसिद्ध जीं ठिकाणें होतीं त्यांपैकीं एके ठिकाणीं ती मूर्ति स्थापिली. इतक्यानेंच झालें नाहीं, तर त्या सज्जन पुरुषाविषयीं त्यांची सन्मानबुद्धि व कृतज्ञता इतकी वाढली कीं, ते त्यास देवासारखा पूज्य मानूं लागले. त्यांनीं त्याच्या नांवें एक देऊळ बांधून त्याचें नांव ' साक्रेतिसाचें देऊळ ' असें ठेविलें.*

---

* अथेन्सच्या लोकांच्या मनांत ... त्याविषयीं त्यांच्या मनांत मोठी प्रीति व भ[illegible] ... त्याच्यावर दोषारोप करणारास शिक्षा दिली, ... अलीकडले इतिहासकार खरी मानीत नाहींत.

IRBK-0101898